भारतीय राज्यघटनेचा परिचय

प्रकरणाची रचना–

उद्दिष्टे

प्रस्तावना

१.१ भारतीय राज्यघटनेची ऐतहासिक पार्श्वभूमी

१.२ भारतीय राज्यघटनेतील सरनामा

१.३ भारतीय राज्यघटनेची वैशिष्ट्ये

१.४ आपली प्रगती तपासा – प्रश्न

१.५ संदर्भ सूची

उद्दिष्टे

माणूस हा सामाजिक प्राणी आहे. समाजामध्ये जीवन जगत असताना त्याचा अनेक संस्था, संघटनांशी संबंध येत असतो. सामाजिक जीवन हे विशिष्ट अशा नियमांनी बद्ध असते. सामाजिक संस्थांप्रमाणेच मनुष्याचा राज्य संस्थेशी संबंध येत असतो. राज्य ही राजकीय संघटना आहे. सामाजिक संस्थांप्रमाणेच राज्यसंस्थाही नियमांनी बद्ध असते. माणसाच्या नियमबद्ध राजकीय जीवनाचा अविष्कार म्हणजे राज्यघटना होय. राज्याचा कारभार हा राज्यघटनेनुसार चालतो. आपल्या देशाच्या राज्यघटनेची प्रत्येक नागरिकाला ओळख असणे आवश्यक आहे. जागरूक नागरिक घडण्यासाठी राज्यघटनेची ओळख आवश्यक आहे.

प्रस्तावना

भारतीय राज्यघटनेचा अभ्यास हे जागृत नागरिकांचे लक्षण आहे. प्रत्येक सुजाण नागरिकाने संविधानाचा अभ्यास करणे आवश्यक आहे. सदर प्रकरणातून आपल्याला खालल गोष्टी समजून घेता येतील.

१) भारतीय राज्यघटनेची ऐतहासिक पार्श्वभूमी

२) भारतीय राज्यघटनेची वैशिष्ट्ये

३) भारतीय राज्यघटनेचे तत्वज्ञान

४) भारतीय राज्यघटनेची आधारस्थाने

१.१ भारतीय राज्यघटनेची ऐतहासिक पार्श्वभूमी

भारतीय राज्यघटनेचे स्वरूप समजावून घेताना ऐतहासिक पार्श्वभूमी लक्षात घ्यावी लागते. इ.स. १६०० मध्ये इंग्लंडची राणी एलिझाबेथ पहिली हिने ईस्ट इंडा कंपनीला हिंदुस्थानात व्यापार करण्यास परवानगी दिली. १७६५ पर्यंत कंपनी व्यापारी म्हणून कार्यरत होती. १७५७ पासून कंपनीने

munotes.in

व्यापाराबरोबरच राजकारणाला प्रारंभ केला. १७७३ मध्ये रेग्युलेटिंग ॲक्ट पास करून ब्रिटीश संसदेने ईस्ट इंडिया कंपनीवर नियंत्रण प्रस्थापित केले. पुढे १९५८ मध्ये ब्रिटीश संसदेने कायदा करून ईस्ट इंडिया कंपनी संपुष्टात आणली. या कायद्यानुसार भारत सचिव पार्लमेंटचा सदस्य असेल व भारतीय प्रशासकासंबंधी तो पार्लमेंटला जबाबदार राहील असे ठराविण्यात आले. १८५८ मध्ये राणीने भारतीयांसाठी जाहिरनामा प्रसिद्ध करून काही आश्वासने दिली परंतु ब्रिटिशांनी ती पाळली नाहीत. त्यानंतरच्या काळात १८६१ व १८९२ मध्ये इंडियन कौन्सिल ॲक्ट पास केले. या कायद्यानुसार विधीमंडळातील बिनसरकारी सभासदांची संख्या वाढविण्यात आली. विधिमंडळाचे अधिकार वाढविण्यात आले. सभासदांना प्रश्न विचारण्याचा, चर्चा करण्याचा अधिकार देण्यात आला. भारतात संसदीय शासन पद्धती सुरू करणे हा १८९२ च्या कायद्यामागे हेतू नव्हता परंतु जबाबदार शासनाची ही थोडी सुरूवात होती.

१.१.१ मोर्ले मिंटो सुधारणा (१९०९)

इ.स. १८८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय सभेची स्थापना झाली. अर्ज, विनंत्या, शिष्टमंडळे या मार्गांनी ब्रिटिशांकडून आपल्या मागण्या मंजूर करून घेण्याचे धोरण स्वीकारले गेले. काँग्रेसमधील जहाल व मवाळ गट आपापल्या परीने संघर्ष करीत होते. दरम्यान ब्रिटीशांनी ''फोडा अणि झोडा'' या तंत्राचा अवलंब केला. त्यातच १९०५ मध्ये बंगालची फाळणी झाली. त्यामुळे भारतीयांमध्ये निर्माण झालेला असंतोष शमविण्यासाठी ब्रिटीश शासनाने काही सुधारणा घोषीत केल्या मात्र १९०९ मध्ये ब्रिटीश पार्लमेंटने मोर्ले-मिंटो सुधारणा कायद्याला मंजूरी दिली. या इंडिया कौन्सिल ॲक्टप्रमाणे केंद्रीय व प्रांतीय विधीमंडळाच्या सदस्यसंख्येत वाढ करण्यात आली. ही संख्या १६ वरून ६९ वर नेण्यात आली. कायदेमंडळाच्या अधिकारांत वाढ करण्यात आली. या कायद्यानुसार मुस्लीमांना स्वतंत्र प्रतिनिधित्व देण्यात आले.

१.१.२ १९१९ चा भारत प्रशासन कायदा (मॉटेग्यु-चेम्सफर्ड) सुधारणा

ब्रिटीश सत्तेविषयीचा भारतीयांचा असंतोष कमी करण्यांत मोर्ले-मिंटो सुधारणा कायदा अपयशी ठरला आणि पुढे दहा वर्षाच्या आतच शासनाला मॉटेग्यू-चेम्सफर्ड कायदा करावा लागला.

या सुधारणांनी प्रथमच केंद्रीय आणि प्रांतीय विषय अशी विभागणी करण्यात आली व प्रांतीय स्वायत्तेचे पहिले पाउल म्हणून प्रांताकडे काही विषय सोपविण्यात आले. महत्वाची खाती गव्हर्नरकडे (राखीव) तर तुलनेने कमी महत्वाची (सोपीव) खाती लोकनियुक्त मंत्र्याकडे देण्यात आली. मंत्रीमंडळात्मक जबाबदारीच्या प्रांतिक पातळीवर संसदीय पद्धतीचा मर्यादीत पाया घालण्यात आला. मतदानाचा हक्क मात्र मालमत्ता धारकांपुरताच मर्यादीत होता. साधारणत: ३ टक्के भारतीयांना हा हक्क प्रथमच प्राप्त झाला.

मॉटेग्यु चेम्सफर्ड सुधारणांमुळे प्रथमच देशाचा कारभार कसा करावा यांचा भारतीयांना प्रांतिक पातळीवर अनुभव मिळाला. हा अनुभव मर्यादीत क्षेत्रात असला तरी सुरूवात या नात्याने या अनुभवाचे महत्व होते. विशेष म्हणजे जनतेच्या विचार जागृतीच्या दृष्टीने या सुधारणांची महत्वाची कामगिरी बजावली. या कायद्यान केंद्रीय शासनांत मात्र काहीच बदल झाले नाहीत. गव्हर्नरची अमर्याद सत्ता तशीच होती. या कायद्यानुसार प्रांतिम शासनात द्विदल पद्धतीचा अंगिकर केला असला तरी प्रत्यक्ष शासन मात्र ब्रिटीशांच्या पठडीत तयार झालेल्या सनदी नोकरवर्गाच्या हातात होते. त्यांच्या वृत्तीत फरक पडला नाही. राखीव आणि सोपीव खात्यातली विभागणी प्रत्यक्ष प्रशासनाच्या दृष्टीने फायद्याची ठरली नाही.

munotes.in

सायमन कमिशन (१९२७)

१९१९ च्या कायद्याने घडवून आणलेल्या सुधारणांची तपासणी करण्यासाठी १९२७ साली ब्रिटिशांनी सायमन कमिशनची नेमणूक केली. या कमिशनमध्ये एकाही भारतीयांचा समावेश न झाल्याने काँग्रेसने त्यावर बहिष्कार घातला. १९३० मध्ये सायमनने आपला अहवाल सादर केला. प्रांतात पूर्णत: जबाबदार शासन स्थापन करणे आणि भारतीय संघराज्य स्थापन करणे या सायमन कमिशनने सुचविलेल्या प्रमुख सुधारणा होत्या.

१९३५ चा भारत प्रशासन कायदा

सायमन कमिशनला झालेला विरोध व त्याच धर्तीवर १९२९ मध्ये काँग्रेसने लाहोर अधिवेशनात संपूर्ण स्वातंत्र्याचे उद्दीष्ट जाहीर केले. दरमानच्या काळात भारताचा घटनात्मक प्रश्न सोडविण्यासाठी ब्रिटीश सरकारने तीन गोलमेज परिषदा भरविल्या. परिषदेतील चर्चेच्या आधारे मार्च १९३३ मध्ये श्वेतपत्रिकेवर चर्चा करून अहवाल सादर केला. ब्रिटीश शासनाने श्वेतपत्रिकेवर विचार करून प्रवर समिती नेमली. प्रवर समितीच्या अहवालावर आधारित विधेयक भारत सचिव सर सॅम्युअल होर यांनी ब्रिटीश पार्लमेंटपुढे मांडले. पार्लमेंटच्या मंजुरीने १९३५ च्या भारत प्रशासन कायदा तयार करण्यात आला. या कायद्यात ३२१ कलमे आणि १९ परिशिष्टे होती. या कायद्याची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. संघराज्य:

ब्रिटीश गव्हर्नरच्या नियंत्रणाखाली प्रांत आणि संस्थाने यांचे संघराज्य करण्याची तरतूद या कायद्यात होती. प्रांतिक संघराज्याच्या घटक सभासदाचे स्थान सहजपणे प्राप्त झाले. परंतु संस्थानांना मात्र संघराज्यात सामील व्हायचे की नाही हे ठरविण्याची मूभा होती. प्रांतामध्ये काही प्रमाणात जबाबदार शासनपद्धतीची सुरुवात झाली. परंतु संस्थानात काही अपवाद वगळता प्रतिनिधीक शासनाचा लवलेश नव्हता. सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यासाठी विषयांची विभागणी करण्यात आली होती. महत्वाचे विषय केंद्राकडे सोपवून केंद्रशासन बळकट करण्यात आले होते.

२. द्विदल केंद्रशासन:

१९१९ च्या कायद्यानुसार प्रांतामध्ये द्विदल शासनाची सुरूवात करण्यात आली होती. १९३५च्या कायद्यान्वये याच धर्तीवर केंद्र शासनात द्विदल पद्धतीचा अवलंब करण्यात आला. संरक्षण, परराष्ट्र, धार्मिक व्यवहार यांसारखे विषय राखीव ठेवण्यात आले. त्यांचा कारभार कौन्सिलर्सच्या सल्ल्याने गव्हर्नर जनरलने करावयाचा होता. कौन्सिलर्स विधीसभेला जबाबदार नव्हते. सोपीव विषयांचा कारभार मंत्रीमंडळाच्या सल्ल्याने गव्हर्नर जनरलने करावयाचा होता. सोपीव खात्यांबाबत गव्हर्नर जनरलला महत्त्वाचे अधिकार होते. केंद्राच्या विधीमंडळाने संमत केलेल्या कायद्यांवर नकाराधिकार वापरणे आणि वटहुकूमांच्या सहाय्याने प्रशासन चालविणे हे महत्वाचे अधिकारही त्यांच्याकडेच होते. व्यवहारत: केंद्र शासन त्यांच्याच हाती होते असे म्हटल्यास गैर ठरणार नाही.

३. प्रांतिक स्वायत्ता:

प्रांताची कार्यकारी सत्ता गव्हर्नर आणि मंत्रीमंडळ यांच्याकडे सोपविण्यात आली. मंत्रीमंडळ हे प्रांतिक विधीमंडळाला जबाबदार होते आणि गव्हर्नरने मंत्रीमंडळाच्या सल्ल्यानुसार कारभार करावा अशी अपेक्षा होती. सामान्य परिस्थितीत प्रांताना स्वायत्ता देण्यात आली तरी पूर्णतया

munotes.in

जबाबदार शासन मात्र निर्माण झाले नाही. महत्वाच्या विषयांच्या बाबतीत 'व्यक्तीगत न्यायबुद्धीनुसार' वागण्याचा गव्हर्नरला खास अधिकारी होता. नकाराधिकार तसेच अधिवेशन चालू नसेल त्यावेळी वटहुकूमांद्वारे शासन चालविण्याचा अधिकार त्याला होता. खास विषयांबाबत गव्हर्नरने केंद्राच्या मार्गदर्शनाखाली कारभार करावा अशी अपेक्षा होती. आणिबाणीच्या परिस्थितीत ९३ व्या कलमांनुसार गव्हर्नर सर्व सत्ता आपल्या हाती घेवू शकत असे.

४. संघ न्यायालय:

केंद्र व प्रांतिक शासन यांच्यातील वाद सोडविण्यासाठी संघ न्यायालयाची तरतूद होती. मॉरीस ग्वायर (१९३५ च्या कायद्याचे उद्‌गाते) हे या न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश होते.

१.२.५ क्रिप्स योजना

ऑगस्ट घोषणेच्या अपयशानंतर ११ मार्च १९४२ रोजी ब्रिटिश सरकारने सर स्ट्फर्ड क्रिप्स यांना भारतात पाठवले. भारतीय नेत्यांबरोबर चर्चा केल्यानंतर सादर योजनेत पुढील प्रमुख तरतुदी होत्या.

१. युद्ध समाप्तीनंतर भारताला वसाहतीचा दर्जा (डोमीलीयन) देण्यात येईल.

२. युद्ध समाप्तीनंतर भारतीय संघराज्याची घटना निर्माण करण्यासाठी एक घटना समिती बोलावण्यात येईल.

३. घटना समितीने निर्माण केलेल्या राज्यघटना स्वीकारण्याचे बंधन ब्रिटीश सरकारवर राहील.

४. नवीन राज्यघटना तयार होईपर्यंत युद्धकाळात भारताच्या संरक्षणाची जबाबदारी ब्रिटीश सरकारवर राहील.

अशा प्रकारे या योजनेत भारताच्या भावी स्वातंत्र्याची कल्पना अभिप्रेत होती. परंतु सत्तांतर केव्हा होईल याची निश्चित तारीख नव्हती. दिवाळे निघालेल्या बँकेवर काढलेला पुढील तारखेचा चेक अशा शब्दांत म. गांधीनी क्रिप्स योजनेवर टीका केली. काँग्रेस व मुस्लीम लीगन ही योजना फेटाळून लावली.

कॅबिनेट मिशन योजना (त्रिमंत्री योजना)

१९४६ साली ब्रिटिनचे पंतप्रधान लॉर्ड ॲटली यांनी भारतातील राजकीय पेचप्रसंग सोडविण्यासाठी आपल्या मंत्रीमंडळातील तीन मंत्री सर पॅथीक लॉरेन्स, सर स्टॅफर्ड क्रिप्स व अल्बर्ट अलेक्झांडर यांना भारतात पाठवले. या समितीने पुढील महत्वाच्या सूचना केल्या होत्या.

१. ब्रिटीश भारत व संस्थानांचे मिळून संघराज्य निर्माण करण्यात येईल.

२. संघराज्यासाठी स्वतंत्र कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ निर्माण केले जावून त्यात प्रांत व संस्थाने यांचे प्रतिनिधी असतील.

३. प्रांतिक कायदेमंडळांनी एक घटनासमिती निर्माण करावी. त्यात ३८९ सदस्य असतील.

४. भारतातील (A-B-C-) प्रांताचे असे तीन गट पाडून प्रत्येक गटाने आपल्या प्रांतासाठी घटना तयार करावी. नंतर गटांच्या प्रतिनिधींनी एकत्र येवून संघराज्याची घटना तयार करावी असे ठरविण्यात आले.

५. दर १० वर्षांनी घटनेत दुरूस्ती करण्याचा अधिकार प्रांतांना देण्यात आला.

६. भारताला ब्रिटिश राष्ट्रमंडळातून बाहेर पडण्याचा अधिकार देण्यात आला.

munotes.in

या योजनेनुसार घटनासमिती सदस्यांची निवड झाली. ९ डिसेंबर १९४६ रोजी तिची पहिली सभा झाली.

लॉर्ड माउंटबॅटन योजना

हिंदुस्थानचे अखंडत्व कायम राखून सत्तांतर करणे कठीण आहे. यांची जाणीव माउंटबॅटन यांना होती. त्यांच्या योजनेत पुढील तरतुदी होत्या.

१. पंजाब व बंगाल या दोन प्रांतांचे विभाजन करून हिंदू लोकांचा भाग भारताला व मुस्लिमांचा भाग पाकिस्तानला जोडण्यात येतील. भारतात की पाकिस्तानात सामील व्हायचे हे ठरविण्याचा अधिकार त्यांना असेल.

२. सिंध प्रांताची विधानसभा सिंध प्रांतासंबंधी निर्णय येईल.

३. फाळणी झाल्यास एक सीमा आयोग नेमून दोन्ही देशांच्या सीमा निश्चित करण्यात येतील.

४. देशी राज्यांना स्वयंनिर्णयाचा अधिकार देण्यात आला.

५. सत्तांतर १५ ऑगस्ट १९४७ पूर्वी होईल.

काँग्रेस व लीगने ही योजना स्वीकारली.

भारतीय स्वातंत्र्याचा कायदा (१९४७)

१. १५ ऑगस्ट १९४७ पासून दोन स्वंतत्र राज्य अस्तित्वात येतील.

२. त्यांना घटना निर्मिती व सार्वभौमत्वाचे अधिकार देण्यात येतील.

३. या राज्यांवरील पार्लमेंटचे नियंत्रण उठवले व भारत सचिव पद बरखास्त केले.

४. राज्यघटना तयार होईपर्यंत १९३५च्या कायद्यानुसार कामकाज-आवश्यकतेनुसार बदल.

५. संस्थानांवरची सत्ता संपुष्टात-स्वयंनिर्णयाचा अधिकार देण्यात आला.

घटना समितीचे स्वरूप आणि कामकाज

कॅबीनेट मिशन योजनेनुसार भारतातील २९२, संस्थानांचे ९३, कमिशन प्रांताचे ४ असे ३८९ प्रतिनिधी निवडण्यात येणार होते. कॅबीनेट योजनेनुसार जुलै १९४६ मध्ये २९२ प्रतिनिधी निवडले, संस्थानांच्या ९३ जागा पूर्णपणे भरल्या नाहीत.

घटना समितीत सर्व वर्ग, जाती, धर्माला प्रतिनिधीत्व होते. घटना समितीत राजेंद्र प्रसाद, पं. नेहरू, डॉ. आंबेडकर, डॉ. खरे, अल्लादी कृष्ण अय्यर, आचार्य कृपलानी, पुरूषोत्तमदास टंडन, बॅ. जयकर, शकरराव देव, फ्रॅंक ॲथनी, रामनाथ गोयंका इ. प्रसिद्ध व नामवंत व्यक्ती होत्या.

घटनासमितीची पहिली बैठक ९ डिसेंबर १९४६ रोजी झाली. डॉ. सच्चिदानंद सिन्हा यांच्याकडे तात्पुरते अध्यक्षपद देण्यात आले. ११ डिसेंबर १९४६ रोजी **डॉ. राजेंद्र प्रसाद यांची स्थायी अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली.**

कामकाज:

घटना समितीचे कामकाज २ वर्षे ११ महिने व १८ दिवस चालले. घटना परिषदेच्या एकूण ११ बैठका झाल्या. या कामकाजावर एकूण ६३,९६,७२९ रू. खर्च झाले.

munotes.in

२९ ऑगस्ट १९४७ रोजी मसुदा समितीची निवड झाली. डॉ. आंबेडकर अध्यक्ष झाले. मुन्शी, अय्यंगार, खैतान, अय्यर इ. सदस्य होते.

मूळ भारतीय घटनेत ३९५ कलमे व ९ परिशिष्टे आहेत. सद्यस्थितीत भारतीय राज्यघटनेत ४४८ कलमे २५ प्रकरणे १२ परिशिष्टे आहेत.

भारतीय घटनेची आधारस्थाने

भारतीय घटनेची निर्मिती करतांना घटनाकारांना विविध देशांच्या राज्यघटनांचा आणि शासनपद्धतींचा अभ्यास करावा लागला. विविध राज्यघटनांमधील चांगल्या तत्वांची, पद्धतींची स्वीकृती करताना सखोल अभ्यास करुन त्यांची शहानिशा करून निर्णय घ्यावे लागले. घटनासमितीचे कार्य ९ डिसेंबर १९४६ ला सुरू होवून २६ नोव्हेंबर १९४९ ला संपले. घटनापरिषदेच्या एकूण बैठका झाल्या. अशा रीतीने २ वर्षे ११ महिने १८ दिवस घटना समितीचे कामकाज चालले. भारताचा इतिहास, आर्थिक, सामाजिक व राजकीय परिस्थिती, देशापुढील समस्या, देशातील नागरिक इ. गोष्टींचा सखोल विचार घटना समितीत करण्यात आला. साधारणत: भारतीय राज्यघटनेची उगमस्थाने पुढीलप्रमाणे सांगता येतात.

१. विविध देशांच्या घटनांचा प्रभाव

ब्रिटिशांनी भारतावर जवळपास दिडशे वर्षे राज्य केले. त्यामुळे त्यांचा प्रभाव येथील घटनेवर पडणे अपरिहार्य होते. संसदीय शासन, नामधारी राज्यप्रमुख, पंतप्रधान, मंत्रीमंडळाची सामूहिक जबाबदारी इ. राज्यघटनेतील बाबी या इंग्लंडच्या प्रभावाच्या निदर्शक मानल्या जातात.

लिखित राज्यघटना, उददेशपत्रिका, मूलभूत अधिकार, संघराज्य शासनपद्धती, न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार, सर्वोच्च न्यायालय, राष्ट्रपतींचे आणिबाणीविषयक अधिकार, घटनादुरुस्ती इ. बाबी आपण अमेरिकन राज्यघटनेच्या आधारे स्वीकारल्या आहेत.

अमेरिका व इंग्लंडखेरीज कॅनडा, आयर्लंड व ऑस्ट्रलियन घटनांचा प्रभावही भारतीय राज्यघटनेवर पडलेला दिसून येतो. राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे, राष्ट्रपती पदासाठी निर्वाचन मंडळाची पद्धती अशा गोष्टी आयर्लंडच्या घटनेतून घेण्यात आल्या आहेत. तर संसदेच्यया दोन्ही सभागृहांची संयुक्त बैठक घेणे, सामाईक सूची आणि त्यासंबंधीचे केंद्राचे कायदे घटक राज्यांपेक्षा श्रेष्ठ मानण्याची प्रवृत्ती इ. तरतुदींचा समावेश आस्ट्रेलियाच्या घटनेवरुन करण्यात आला आहे.

भारतीय घटनेवर विविध घटनांचा प्रभाव पडल्यामुळे त्यात अधिक गुंतागुंत झाल्याची टीका केली जाते. परंतु ती निरर्थक आहे. भारतीय घटनाकारांनी विविध घटनांमधील तरतुदींचा स्वीकार करण्यापूर्वी त्यांचा सखोल अभ्यास केला होता.

२. १९३५ चा कायदा

भारतीय राज्यघटनेच्या २/३ भाग १९३५ च्या भारत सरकारच्या कायद्याच्या आधारे केलेला दिसतो. अर्थात १९३५ च्या कायद्यातील तरतुदी जशाचा तशा न स्वीकारता गरजेनुसार व परिस्थितीनुसार त्यात बदल करण्यात आले आहेत. संघराज्य पद्धती, केंद्रीय मंत्रीमंडळ, अधिकारांची विभागणी, सर्वोच्च न्यायालय इ. भाग १९३५ च्या कायद्याच्या आधारे स्वीकारण्यात आल्या आहेत.

३. भारतीय संसदेचा प्रभाव

भारतीय घटनेच्या स्वीकृतीनंतरच्या काळात भारतीय संसदेने विविध स्वरूपाचे कायदे व घटनादुरूस्त्या केल्या आहेत. त्यामुळे भारतीय संसद हे घटनेचे मुख्य उगमस्थान आहे. संसदेने

mynotes.in

अनेक महत्वाचे कायदे केले आहेत. उदा. प्रतिबंधक स्थानबद्धता कायदा (१९५०), भारतीय नागरिकत्वाचा कायदा (१९५५), राज्यपुनर्रचनेचा कायदा (१९५६), अंतर्गत सुरक्षा कायदा (१९७१), भारतीय घटनेच्या काही तरतुदींमध्ये दुरूस्त्याही केल्या आहेत. आत्तापर्यंत भारतीय घटनेत १०३ घटनादुरूस्त्या करण्यात आल्या आहेत.

४. घटना परिषद व मसुदा समिती

भारतीय घटना निर्माण करण्यापूर्वी जी घटना परिषद व मसुदा समिती निर्माण केली होती त्या समित्यांमध्ये विविध क्षेत्रांतील नामवंत व अनुभवी व्यक्ती होत्या. या परिषदेत जी चर्चा झाली त्याचा प्रभाव घटनेवर झाला आहे. घटनात्मक वाद जेव्हा निर्माण झाले तेव्हा या परिषदेतील चर्चेचा आधार घेतला गेला.

५. न्यायालयीन निर्णय

भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी घटनेतील वादग्रस्त कलमांवर जे निर्णय घेतले ती घटनेची उगमस्थानेच आहेत. उदा. गोपालन विरूद्ध मद्रास राज्य, चंपाकन विरूद्ध मद्रास राज्य, गोलकनाथ खटला, संस्थानिकांचा तनखेबंदी संबंधीचा खटला इ. खटल्यांच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निर्णय महत्वाचे आहेत.

६. टीकाग्रंथ

घटना तज्ञ, कायदेपंडीत किंवा टीकाकार यांनी घटनेवर जे भाष्य केले किंवा टीकात्मक ग्रंथ लिहिले ते घटनेचे आधार किंवा उगमस्थाने ठरू शकतात. असे टीकाग्रंथ घटनेचा अर्थ लावण्यास सहायकारी ठरतात. जेनिंग, डी. डी. बसू, टोपे, मेनन, डायसी, नाना पालखीवाला इ. विचारवंतांनी भारतीय राज्यघटनेवर टीकाग्रंथ लिहिले आहेत.

७. भारतीय जनता

भारतीय राज्य घटनेचे खरे उगमस्थान भारतीय जनता आहे. घटनच्या उद्देश्पत्रिकेत सुरुवातीलाच ''आम्ही भारतीय जनता'' असे म्हटले आहे. भारतीय घटना, घटना समितीकडून निर्माण झालेली असली तरी घटना समितीतील सदस्य भारतीय जनतेचे प्रतिनिधी होते. तेव्हा जनतेच्या इच्छेतून, संमतीतून भारतीय घटना तयार झाली आहे असे म्हणता येईल. आत्तापर्यंत झालेल्या निवडणुका व राज्य प्रशासन यांना जनतेने दिलेला पाठिंबा व सहकार्य पाहिले असता जनतेला ही घटना मान्य आहे हे स्पष्ट होते.

१.२ भारतीय राज्यघटनेतील सरनामा

भारतीय संविधानांत असलेली उद्देशपत्रिका (सरनामा) ही पं. नेहरूंनी १३ डिसेंबर १९४६ रोजी घटना परिषदेत मांडलेल्या उद्दिष्टांच्या ठरावावर आधारलेली आहे. संपूर्ण सरनामा काळजीपूर्वक वाचल्यास आपल्याला राज्यघटनेचे उगमस्थान व तिची उद्दिष्टे लक्षात येतात.

उद्देशपित्रकेच्या सुरूवातीलाच ''आम्ही भारतीय लोक'' असा उल्लेख आहे. त्यातच भारतीय घटनेचे उगमस्थान सापडते. आम्ही भारतीय लोकांनी राज्यघटना मान्य करून तिला कायद्याचे स्वरूप प्राप्त करून दिले आहे. या वाक्यांतून तीन गोष्टी स्पष्ट होतात. १. भारतीय लोक सार्वभौम आहेत. २. घटनासमितीचे सभासद हे खरेखुरे लोक प्रतिनिधी होते. ३. राज्यघटनेला लोकांची मान्यता आहे. भारतीय लोक सार्वभौम आहेत याचाच अर्थ राज्याच्या सत्तेचे उगमस्थान लोकांमध्ये सापडते. भारत अंतर्गत व बाह्यदृष्ट्या सार्वभौम आहे. भारतीय घटनेच्या संदर्भात एक आक्षेप असाही घेतला जातो

munotes.in

की, घटनासमितीचे सभासद खऱ्या अर्थाने लोकप्रतिनिधी नव्हते. परंतु या आक्षेपांत काहीही तथ्य नाही. कारण घटनासमितीच्या सभासदांची निवड प्रांतिक विधानसभांनीच केली होती. शिवाय घटना निर्मितीनंतर जी सार्वत्रिक निवडणूक झाली होती त्या निवडणुकीत तेच सभासद पुन्हा निवडून आले होते. याचा अर्थ लोकांचा त्यांच्यावर विश्वास होता व त्यांनी निर्माण केलेल्या राज्यघटनेला लोकसंमती होती.

भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यातून भारत हे सार्वभौम राज्य असल्याचे घोषीत झाले आहे. भारतीय लोक देशाच्या अंतर्गत बाबतीत सर्वश्रेष्ठ आहेत. तसेच भारत हा कोणत्याही बाह्य देशाच्या नियंत्रणाखाली नाही. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय धोरण उठविण्याचा त्याला पूर्ण अधिकार आहे.

भारत हे समाजवादावर विश्वास व्यक्त करणारे राष्ट्र आहे. ४२ व्या घटना दुरूस्तीने समाजवाद ही संकल्पना सरनाम्यांत अंतर्भूत केली गेली. त्यामुळे राज्याचे आर्थिक उद्दिष्ट अधिक स्पष्ट झाले आहे. ४२ व्या घटनादुरूस्तीने सरनाम्यांस ''धर्मनिरपेक्ष'' ही संकल्पनाही समाविष्ट केली आहे. राज्याचा कोणताही अधिकृत धर्म असणार नाही. तसेच सर्वांना समान वागणुकीची हमी या शब्दाने दिली आहे.

भारतीय राज्यघटनेने प्रौढ मतदानपद्धतीवर आधारीत प्रतिनिधीक लोकशाहीचा स्वीकार केला आहे. लोक नियुक्त प्रतिनिधींच्या हाती येथील शासनाचा कारभार असतो. त्यांची निवड विशिष्ट काळासाठी मुक्त वातावरणात न्याय पद्धतीने होते. देशांत कायद्याचे राज्य अस्तित्वात असून घटनात्मक तरतुदींनुसार राज्यकारभार चालावा म्हणून स्वंतंत्र व अधिकार संपन्न न्यायमंडळाची स्थापना करण्यात आली आहे. नागरिकांना मूलभूत हक्क देण्यात आले असून त्यांना न्यायालयीन संरक्षण आले आहे.

भारतीय घटनाकारांनी सरनाम्यातून प्रजासत्ताक गणराज्याची घोषणा केली आहे. म्हणजेच राज्याच्या सर्वश्रेष्ठ अधिकार लोकांच्या हाती देण्यात आला आहे. त्यामुळे विशिष्ट काळासाठी लोकप्रतिनिधी निवडले जातात व लोकांची मर्जी असेपर्यंत ते सत्तेवर राहतात. तसेच भारतातील सर्वोच्च अधिकारपद वंशपरंपरागत नाही. येथील राष्ट्रपती हा लोकनियुक्त आहे. म्हणून भारत हे प्रजासत्ताक गणराज्य आहे.

याशिवाय स्वातंत्र्य, समता बंधुता व न्याय या तत्वांचा पुरस्कार भारतीय राज्यघटनेत करण्यात आला आहे. न्यायाचा पुरस्कार करताना सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रांत न्याय प्रस्थापित करण्याची हमी दिलेली आहे. सामाजिक न्यायांतर्गत सामाजिक समतेची अपेक्षा करण्यात आली आहे. कोणताही भेद अमान्य करण्याबरोबरच पददलीत, मागास व दुर्बल घटकांना न्याय उपलब्ध करून देण्याची जबाबदारी राज्यावर टाकण्यात आली आहे. आर्थिक न्याय प्रस्थापित करतांना येथील आर्थिक विषमता दूर करण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवण्यात आले आहे. व्यक्तीच्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी सरकारने प्रयत्न करावेत अशी अपेक्षा व्यक्त केली गेली आहे. लोकांना राजकीय न्याय उपलब्ध करून देतांना प्रौढ मताधिकार देण्यात आला आहे. येथील नागरिकांना मतदानाचा, निवडणूक लढविण्याचा, अधिकार पद ग्रहण करण्याचा अधिकार देण्यात आला आहे.

व्यक्ती विकासासाठी स्वातंत्र्याची आवश्यकता असते. भारतीय राज्यघटनेत विधायक अर्थाने स्वातंत्र्याची संकल्पना स्वीकारली आहे. भारतीय राज्यघटनेत मूलभूत हक्क विस्ताराने सांगितलेले आहे. या अर्थाने हे स्वातंत्र्य अमर्यादपणे उपभोगता येत नाही. सामाजहिताला बाधा आणणारी कोणतही कृती त्याज्य ठरविण्यात आली आहे.

समतेची संकल्पना न्यायाशी संबंधित आहे. कारण समानतेची अपेक्षा राजकीय, आर्थिक व सामाजिक स्वरूपाची आहे. सर्व नागरिक समान आहेत. राज्याच्या दृष्टिने सर्व नागरिकांना समान प्रतिष्ठा

munotes.in

आहे. कोणत्याही बाबतीत (जात, धर्म, भाषा, लिंग, प्रदेश इ.) भेदभाव करून कोणतीही संधी नाकारली जाणार नाही.

भारतीय समाजात विविधता आढळते. हिंदू, मुस्लीम, शीख, बौद्ध, ख्रिश्चन, ज्यू इ. धार्मिक भेद आहेत. शिवाय उत्तर भारतीय व दक्षिण भारतीय असाही भेद आढळतो. देशाच्या विविध भागांत चालीरीती, रूढी, परंपरा भिन्न आहेत. अशा स्थितीत भारतीय समाज एकात्म होण्यासाठी बंधुतेची आवश्यकता आहे. विविधतेत एकता निर्माण करण्यासाठी या तत्वाचा सरनाम्यांत अंतर्भाव करण्यात आला आहे.

१.२.१ सरनाम्याचे मूल्यमापन

१५० वर्षे पारतंत्र्यात असलेल्या आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या, सांस्कृतिक बाबतीत विविधता असलेल्या भारतात लोकशाहीचा प्रयोग संपूर्णपणे यशस्वी झाला आहे. स्वत:चे राजकीय भविष्य निश्चित करण्यासाठी राज्यघटना निर्माण केली. तसेच राज्याचे स्वरूप व उद्दिष्ट ठरविण्यासाठी अर्थपूर्ण सरनामाही समाविष्ट करण्यात आला. सरनामा म्हणजे भारतीय राज्यघटनेचे तत्वाज्ञान व्यक्त करणारी एक राजकीय कुंडली आहे असे श्री के. एम. मुन्शी यांनी म्हटले आहे. अर्नेस्ट बार्कर या इंग्लिश विचारवंताने आपल्या Principles of Social & Political Theory या ग्रंथाच्या सुरूवातीला भारतीय राज्यघटनेचा सरनामा छापला आहे. असे जरी असले तरी सरनाम्यावर अनेक आक्षेप घेतले जातात ते पुढीलप्रमाणे सांगता येतात.

१. भारतीय राज्यघटना लोकांनी तयार करून स्वीकारली आहे. असे म्हणणे वस्तुस्थितीला सोडून आहे. राज्यघटना लोकांनी निर्माण केलेली नसून घटनासमितीने निर्माण केली आहे. घटना समितीचे सदस्य लोकनियुक्त नव्हते. परंतु या आक्षेपांत फारसे तथ्य नाही, कारण घटना समितीची निर्मिती प्रांतिक विधानसभांच्या सदास्यांनी केली होती व ते सदस्य लोकनियुक्त होते.

२. घटनेच्या सरनाम्यांतून राज्याचे आर्थिक उद्दिष्ट व्यक्त होत नाही. हा आक्षेपही योग्य नाही. कारण सरनाम्यात एक तर आर्थिक न्यायाचे उद्दिष्ट आहे. शिवाय ४२ व्या घटना दुरूस्तीने समाजवाद हे राज्याचे उद्दिष्ट स्पष्ट केले आहे.

३. सरनामा हा राज्यघटनेचा भाग नसून तो एक प्रस्तावनेचा भाग आहे. त्यामुळे तो बंधनकारक नाही. परंतु घटनेतील कलमांचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी सरनाम्याचा उपयोग होतो. शिवाय त्याचे कायदेशीर नसले तरी नैतिक बंधन मान्य करावेच लागते.

१.३ भारतीय राज्यघटनेची वैशिष्ट्ये

भारतीय राज्यघटनेची निर्मिती करताना घटनाकारांनी विविध देशांच्या राज्यघटनांचा आणि शासनपद्धतीचा अभ्यास करुन भारताच्या संदर्भात एक आगळेवेगळे असे संविधान निर्माण केले आहे. त्यामुळे त्यांच्या प्रमुख वैशिष्ट्यांचा आढावा घेणे आवश्यक आहे. भारतीय राज्यघटनेची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१.३.१ लिखित व विस्तृत राज्यघटना

भारताची राज्यघटना विस्तृत स्वरुपाची आहे. मूळ राज्यघटनेत ३९५ कलमे व ८ परिशिष्टे तर सध्या जवळपास ४४८ कलमे व १२ परिशिष्टे आहेत. त्यामुळे भारताची राज्यघटना सर्वात मोठी राज्यघटना समजली जाते. राज्यघटना विस्तृत बनण्याचे महत्वाचे कारण म्हणजे राज्यघटनेतील तत्वे अधिक स्पष्टपणे नोंदविण्यात आली आहेत. केंद्र-राज्य संबंध, संसदीय शासनपद्धती, सनदी सेवा, निवडणुका, अल्पसंख्यांकांसाठीच्या तरतुदी, लोकसेवा आयोग, भाषा आयोग, अनुसूचित

muhotes.in

जाती-जमातींसाठीचे आरक्षण, लेखापाल इ. भाग तपशीलवार स्पष्ट कण्यात आला आहे. त्यामुळे भारताची राज्यघटना अधिक विस्तृत झाली आहे.

१.३.२ अंशत: परिदृढ आणि अंशत: परिवर्तनीय राज्यघटना

भारतीय राज्यघटना अंशत: परिदृढ व अंशत: परिवर्तनीय आहे. कारण भारतीय घटनेत कही बाबतीत साध्या बहुमताने तर महत्वाच्या बाबतीत विशेष बहुमताने दुरुस्ती करता येते. भारतीय घटनेत दुरुस्ती करण्याची विशेष पद्धत आपण स्वीकारली आहे. भारतीय घटनेत तीन प्रकारे दुरुस्ती करता येते. १. साध्या बहुमताने. २. विशेष बहुमताने ३. विशेष बहुमताने आणि निम्म्यापेक्षा जास्त घटकराज्यांच्या संमितीने. पहिल्या दोन पद्धतींपेक्षा तिसरी पद्धत अधिक क्लिष्ट आहे. भारतीय राज्यघटनेत काही कलमे मूलत: इतर कलमांपेक्षा वेगळी असल्याने त्यांत सहजासहजी बदल केला जावू शकत नाही. उदा. राष्ट्रपतींची निवडणूक पद्धत, केंद्रीय कार्यकारी सत्तेच्या मर्यादा, उच्च न्यायालयाबाबतचे नियम, घटनादुरुस्ती इ. या तरतुदींच्या बदलासाठी निम्म्यापेक्षा जास्त घटक राज्यांच्या विधानसभांची मान्यता असणे आवश्यक आहे. मात्र याशिवाय इतर विषयांत संसदेतील साध्या बहुमताने दुरुस्ती होत असल्यामुळे काही अंशी लवचिक स्वरुप प्राप्त झाले आहे. म्हणून अंशत: परिदृढ व अंशत: परिवर्तनीय हे भारतीय घटनेचे वैशिष्ट्य आहे.

१.३.३ जनता सार्वभौमत्व

भारतीय राज्यघटनेने जनतेच्या सार्वभौमत्वाचा पुरस्कार केला आहे. घटनेच्या उद्देशपत्रिकेतच ''आम्ही भारतीय जनता ही घटना आमच्यासाठी निर्माण करुन मान्य व स्वीकृत करीत आहोत'' असे स्पष्ट केले आहे. आम्ही भारतीय जनता असे म्हणून घटनाकारांनी घटनेची निर्मिती, मान्यता व स्वीकृती यांची जबाबदारी भारतीय जनतेवर टाकली आहे. भारतीय घटनेने नागरिकांना प्रौढ मताधिकार देवून प्रातिनिधिक पद्धतींचा स्वीकार केला आहे. आतापर्यंतच्या निवडणुकांचा या विश्लेषणात्मक दृष्टिने विचार केल्यास असे दिसते की, भारतीय जनतेने खऱ्या अर्थाने घटनेचा स्वीकार केला आहे.

१.३.४ सार्वभाम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य

१९५० साली अस्तित्वात आलेल्या भारतीय घटनेत ''सार्वभौम, लोकशाही, गणराज्य'' या शब्दांचा उल्लेख होता. १९७६ साली ४२ व्या घटनादुरुस्तीने ''समाजवाद'' व ''धर्मनिरपेक्ष'' हे शब्द भरीस घालण्यांत आले.

भारत हे सार्वभौम राज्य आहे म्हणजेच भारतावर कोणतेही अंतर्गत वा बाह्य दडपण नाही. जनतेने निवडलेल्या प्रतिनिधींकडून देशाचा कारभार चालतो. ''प्रजासत्ताक, गणराज्य, लोकशाही'' हे शब्द समानार्थी वाटले तरी ते विशिष्ट अर्थाने वापरले आहेत. प्रजासत्ताक गणराज्य म्हणजे जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींचे राज्य होय. भारतीय जनता सार्वभौम असून लोकप्रतिनिधींकडून राज्याचा कारभार चालवला जाईल. कोणा एका व्यक्ती वा वर्गाकडून नव्हे, हे घटनाकारांना अपेक्षित होते.

भारतातील जनतेचा खऱ्या अर्थाने सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी घटनेत समाजवादी धोरणाचा विकास घडवून आणण्यासाठी घटनेत समाजवादी धोरणाचा स्वीकार केलेला आहे. जनतेचा आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकास घडवून आणण्यासाठी समाजवादाचे धोरण उपयुक्त आहे हे ओळखूनच ४२ व्या घटनादुरुस्तीने ''समाजवादी'' तत्वाचा अंगीकार केला आहे. तसेच धर्मनिरपेक्षतेचे तत्वही स्वीकारले गेले आहे. भारतीय घटनेने सर्व धर्मांना समान मानले आहे. प्रत्येकाला धर्माचे आचरण व प्रसार करण्याचे स्वातंत्र्य आहे. राज्याचा कोणताही अधिकृत धर्म नाही.

muquestions.in

१.३.५ संसदीय शासनपद्धती

भारतीय घटनाकारांनी संसदीय शासनपद्धतीचा स्वीकार केला आहे. इंग्लंडच्या धर्तीवर अशा पद्धतीचा स्वीकार केला आहे. इंग्लंडप्रमाणे भारतीय शासनपद्धतीत कार्यकारी मंडळ कायदे मंडळाला जबाबदार असते. भारतात लोकसभेतील बहुमतवाल्या पक्षाचा नेता पंतप्रधान बनतो. लोकसभेचा विश्वास असेपर्यंतच पंतप्रधान व मंत्रीमंडळ सत्तेवर राहू शकतात. मंत्रीमंडळातील सर्व मंत्री संसदेचे सदस्य असतात. अशा प्रकारची संसदीय शासनपद्धती भारताने स्वीकारली आहे. भारतात पंतप्रधान हा वास्तववादी सत्ताप्रमुख आहे आणि राष्ट्रपती नामधारी घटनात्मक प्रमुख आहे. इंग्लंडच्या राजाप्रमाणे राष्ट्रपतीचे पद नामधारी असले तरी भारताच्या राष्ट्रपतीला आणिबाणीसंदर्भात विशेष अधिकार देण्यात आले आहेत. थोडक्यांत भारतीय शासनपद्धतीत इंग्लंड व अमेरिकन शासनपद्धतीचा संगम आढळतो.

१.३.६ मूलभूत अधिकार

भारतीय घटनेच्या तिसऱ्या प्रकरणांत १४ ते ३५ या कलमांतर्गत मूलभूत अधिकारांचा समावेश करण्यात आला आहे. भारतीय घटनेने सात प्रकारचे हक्क नागरिकांना बहाल केले आहे. १. स्वातंत्र्याचा हक्क २. शोषणविरूद्ध हक्क ३. धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क ४. समतेचा हक्क ५. सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क ६. समतेचा हक्क ७. घटनात्मक उपाययोजनेचा हक्क.

अशा प्रकारे मुलभूत हक्क देवून राज्यघटनेने नागरिकांचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न केला आहे. हे मुलभूत हक्क न्यायालयीन बजावणी योग्य आहेत. मालमत्तेचा हक्क मात्र १९७६ च्या ४४ व्या घटनादुरुस्तीने मुलभूत हक्कांच्या यादीतून काढून टाकण्यात आला आहे.

१.३.७ मार्गदर्शक तत्वे

भारतीय घटनेच्या ४ थ्या प्रकरणात ३६ ते ५१ या कलमांद्वारे राज्याच्या धोरणासंबंधीच्या मार्गदर्शक तत्वांचा समावेश करण्यात आला आहे. सामाजिक व आर्थिक लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी राज्याने काय केले पाहिजे याचे दिग्दर्शन या तत्वामधून करण्यांत आले आहे. मात्र ही तत्वे मूलभूत हक्कांप्रमाणे न्यायालयीन बजावणी योग्य नाहीत. घटनेतील काही मार्गदर्शक तत्वे खालीलप्रमाणे सांगता येतात.

१. स्त्री-पुरूषांना उपजीविकेची साधने मिळवण्याचा हक्क असून त्यांना समान कामासाठी समान वेतन दिले जाईल.

२. १४ वर्षाखालील मुला-मुलींना सक्तीचे व मोफत शिक्षण दिले जाईल.

३. मागासवर्गीय तसेच अनुसूचित जाती-जमातीच्या लोकांना आर्थिक व शैक्षणिक सवलती देण्यांत येतील.

४. कामगारांना योग्य वेतन देवून त्यांना औद्योगिक व्यवस्थापनांत सहभागी करून घेतले जाईल. त्यांचे आरोग्य, शिक्षण, विश्रांती, निवृत्तीवेतन यांची काळजी घेण्यात येईल.

५. गरीबांना कायद्याचा मोफत सल्ला मिळण्याची व्यवस्था होईल.

६. आधुनिक व शास्त्रीय पद्धतीने शेती व पशुसंवर्धनाचे कार्य करण्याचा प्रयत्न राज्याकडून केला जाईल.

७. सार्वजनिक आरोग्य सुधारणे, मुलांच्या आरोग्याची काळजी घेणे, जनतेचे राहणीमान वाढवणे इ. बाबत राज्य प्रयत्न करील.

munotes.in

८. आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत शांतता प्रस्थापित करणे, राष्ट्राराष्ट्रांत मैत्रीसंबंध वाढवणे, आंतरराष्ट्रीय करारांचे, तहांचे पालन करणे इ. बाबत राज्यांकडून प्रयत्न केले जातील.

थोडक्यात कल्याणकारी राज्याचे ध्येय साध्य करण्याच्या हेतूने घटनाकारांनी नीतीनिर्देशक तत्वांचा घटनेत समावेश केला आहे.

१.३.८ धर्मनिरपेक्ष राज्य

भारतीय घटनेच्या सरनाम्यांत धर्मनिरपेक्ष राज्याचा पुरस्कार केलेला आहे. सुरुवातीस ''धर्मनिरपेक्ष'' राज्याचा स्पष्ट उल्लेख नव्हता. मात्र १९७६ मध्ये ४२ व्या घटनादुरुस्तीद्वारे धर्मनिरपेक्ष हा शब्द सरनाम्यांत योजून धर्मनिरपेक्ष राज्याचे उद्दीष्ट स्पष्ट करण्यात आले आहे. प्रत्येक नागरिकाला आपल्या धर्माचा प्रसार व आचरण करण्याचा अधिकार आहे. परंतु इतर धर्माच्या विरोधी प्रचार करता येणार नाही. तसेच धर्माच्या नावाखाली कोणालाही राजकारणांत हस्तक्षेप करता येणार नाही. सर्व धर्मांना समान न्याय असेल. भारतीय घटनेने नागरिकांना धार्मिक स्वातंत्र्य दिले असले तरी तिने या धार्मिक स्वातंत्र्यावर काही प्रमाणांत निर्बंधही घातले आहेत. सामाजिक हितास बाधक असे कोणतेच वर्तन नागरिकांना करता येत नाही. अशा प्रकारे भारत हे धर्मनिरपेक्ष राज्य आहे.

१.३.९ एकेरी न्यायव्यवस्था

भारतीय घटनेने न्यायालयाचे स्वातंत्र्य व श्रेष्ठत्व मान्य केले. त्यासाठी खास तरतुदी सुद्धा करण्यांत आल्या आहेत. ही न्यायदान पद्धती एकेरी स्वरूपाची आहे. न्यायमंडळाच्या नियंत्रणाखाली कनिष्ठ न्यायालये अशी न्यायालयाची एकेरी पद्धती आहे. सर्वोच्च न्यायालय हे अभिलेख न्यायालय असून या न्यायालयाच्या निर्णयाविरूद्ध कोठेही अपील करता येत नाही. सर्वोच्च न्यायालयाला न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार आहे.

१.३.१० एकेरी नागरिकत्व

भारतीय घटनेने एकेरी नागरिकत्वाचा पुरस्कार केलेला आहे. घटनेच्या ५ ते ११ या कलमांमध्ये भारतीय नागरिकत्वाच्या तरतुदी केलेल्या अहेत. अमेरिकाप्रमाणे भारतात दुहेरी नागरिकत्व नाही. अमेरिकन नागरिक एकाचवेळी राज्याचा व संघराज्याचा नागरिक असतो. तेथे राज्यांसाठी स्वतंत्र घटना अस्तित्वात आहे. भारतात विविध धर्माचे, जातीचे, पंथाचे, भाषाचे लोक राहतात. त्यामुळे राष्ट्रीय ऐक्य व एकात्मता यादृष्टीने एकेरी नागरिकत्वाचीच पद्धत उपयुक्त आहे. भारतातील घटकराज्यांना रशियाप्रमाणे संघराज्यातून फुटून निघण्याचा अधिकार नाही. त्यामुळे एकेरी नागरिकत्वाचा घटनेने पुरस्कार केला आहे.

१.३.११ एकात्म शासनपद्धती

भारतीय घटनेत 'संघराज्य' शब्दाचा कोठेही उल्लेख आढळत नाही. संघराज्य या शब्दाऐवजी राज्यांचा संघ असा उल्लेख आढळतो. भारतीय संघराज्यात शासनपद्धतीची वैशिष्ट्ये आढळून येतात. लिखित राज्यघटना, अधिकार क्षेत्राची विभागणी आणि सर्वोच्च न्यायालय ही संघराज्याची वैशिष्ट्ये शासन पद्धती आढळत असली तरी ती एकात्म पद्धतीची आहे. कारण केंद्र सरकार प्रबळ आहे. केंद्र व राज्य सरकार यांत अधिकारांची विभागणी केलेली असली तरी केंद्राकडे जास्त विषय सोपविण्यांत आले आहेत. शिवाय केंद्र व राज्य सरकारांच्या कायद्यांत विसंगती निर्माण झाल्यास केंद्र शासनाचा कायदा ग्राह्य मानला जातो. केंद्र शासनाला राज्यांमध्ये आणिबाणी जाहीर करता येते. त्यातच भारताने

munotes.in

एकेरी नागरिकत्वाचा पुरस्कार केला आहे. अशा प्रकारे भारतीय राज्य संघराज्यात्मक वाटत असले तरी ते प्रत्यक्षात एकात्म स्वरूपाचे आहे.

१.३.१२ अल्पसंख्यांक व मागासवर्गीयांना सवलती

भारतात सामाजिक न्याय आणि समता प्रस्थापित करण्याचा उद्देशाने घटनाकारांनी, अल्पसंख्यांक अनुसूचित जाती तसेच अनुसूचित जमातींसाठी खास तरतुदी करून ठेवल्या आहेत. विधिमंडळात अनुसूचीत जातीजमातींसाठी खास आरक्षण देण्यात आले आहे. केंद्र व राज्य सरकारी नोकऱ्यांमध्ये मागासलेल्या जातीजमातींना विशेष सवलत देण्यात आल्या आहेत. मागासवर्गीयांच्या आर्थिक व शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने चौकशी आयोग नेमण्याचा अधिकार राष्ट्रपतीला देण्यात आलेला आहे.

अशा प्रकारे भारतीय घटनेच्या वैशिष्ट्यांचा साकल्याने विचार केल्यानंतर भारतीय घटना आदर्श स्वरुपाची आहे काय? असा प्रश्न उपस्थित होतो. गेल्या ६९ वर्षाच्या घटनेच्या अंमलबजावणीचा अनुभव विचारांत घेतला असता भारतीय घटना काही प्रमाणांत स्थिर व यशस्वी झालेली आहे असे म्हणता येईल. आत्तापर्यंत झालेल्या सार्वत्रिक निवडणुका त्यातील जनतेचा सहभाग, संसदेचे कामकाज, न्यायालयीन निर्णय, केंद्र-राज्य संबंध, भाषा आयोग, अर्थ आयोग, राष्ट्रपतींचे आणीबाणी विषयक अधिकार, निवडणूक आयोग इ. चे कार्य, समाजवादी व कल्याणकारी राज्याची वाटचाल अशा विविध गोष्टींचा परमार्थ घेतला असता भारतीय राज्यघटना जनतेने मान्य केलेली आहे असे म्हणता येईल. ६९ वर्षांच्या प्रदीर्घ वाटचालीनंतर घटनेचा फेर आढावा घेण्यासाठी नुकताच आयोग नेमण्यात आला होता. यासंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना २६ नोव्हें. १९४९ रोजी आपल्या भाषणांत म्हटले आहे की, ''राज्यघटनेची अंमलबजावणी ही तिच्या स्वरूपावर अवलंबून नसते तर ती देशांतील जनता व राजकीय पक्ष यांवर अवलंबून असते''. जनता व राजकीय पक्ष कोणत्या मार्गानी जातील आणि कसे वागतील यावर घटनेचे भवितव्य अवलंबून असते.

१.४ आपली प्रगती तपासा – प्रश्न

१. भारतीय राज्यघटनेची ऐतहासिक पार्श्वभूमी स्पष्ट करा.

२. भारतीय राज्यघटनेची प्रमुख वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

३. भारतीय राज्यघटनेचा सरनामा (उद्देशपत्रिका) स्पष्ट करा.

४. भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्याने मूल्यांकन करा.

१.५ संदर्भ सूची

१. भोळे भा. ल., भारताचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे पब्लिशर्स, नागपूर

२. पाटील बी. बी., भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, फडके प्रकाशन, कोल्हापूर

३. जाधव तुकाराम आणि शिरापूरकर महेश, भारतीय राजकीय व्यवस्थेचा आकृतीबंध खंड १, युनिक ॲकॅडमी, पूणे २०११

४. नवलगुंदकर शं. ना., भारतीय गणराज्याचे शासन, निराली प्रकाशन, पुणे.

❖❖❖❖

munotes.in

नागरिक आणि राज्यघटना

प्रकरणाची रचना–

उद्दिष्टे

प्रस्तावना

२.१ भारतीय राज्यघटनेने दिलेले मूलभूत हक्क

२.२ राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्वे

२.३ मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्वे यातील संबंध

२.४ आपली प्रगती तपासा – प्रश्न

२.५ संदर्भ सूची

उद्दिष्टे

नागरिक आणि राज्यघटना व राज्यघटनेतील हक्कांची ओळख करुन घेणे.

प्रस्तावना

युरोपमध्ये घडून आलेल्या प्रबोधन व धर्मसुधारणेच्या (इ.स. १३ व ते १६ वे शतक) चळवळीमुळे युरोपीयन समाजात फार मोठे बदल घडून आले. या दोन महत्वाच्या चळवळीमुळे लोकांमध्ये जागृती घडून येवून व्यक्तिस्वातंत्र्याच्या मुक्त अविष्कार घडून येण्यासाठीची परिस्थिती निर्माण झाली. व्यक्तिस्वातंत्र्याचा विविध अंगानी विचार मांडला जाऊ लागला. व्यक्ति-समाज, व्यक्ति-राज्य, राज्य-समाज यातील संबंधची विविध अंगाने मांडणी होवू लागली. यातूनच 'मानवी हक्क' हा विषय ऐरणीवर आला.

जगातील सर्व मानवांना आणि सर्व राष्ट्रांना मानवी हक्कांच्या जाहीरनाम्यातील तत्वांचा लाभ घेता यावा या दृष्टीने सर्व स्तरातून प्रयत्न व्हावे, असे अवाहन जागतिक जाहिरनाम्यातून करण्यात आले. या आवाहनाला अनुसरुन भारत स्वतंत्र झाल्यानंतर घटनाकारांनी भारताच्या राज्यघटनेत मूलभुत हक्क समाविष्ट केले. भारताचा राष्ट्रीय स्वातंत्र्याचा लढा समता, स्वातंत्र्य, बंधुत्व आणि न्याय या मानवी मुल्यांसाठीच होता. राष्ट्रीय चळवळीच्या कोणत्या व्यासपीठावरुन या मुल्यांची घोषणा जरी झालेली दिसत नसली तरी, ब्रिटीश साम्राज्यवादाशी लढतांना भारताला स्वातंत्र्य हे या मानवी मूल्यांच्या व हक्कांच्या प्रस्थापणेसाठीच मिळावे असा त्या लढाईमागचा उद्देश होता. त्यामुळे भारतीयांना मूलभूत हक्क हे विनासायास मिळाले असे म्हणणे न्यायाला धरुन होणार नाही. भारतीयांनी स्वातंत्र्यासाठी क्रांतीची मशाल पेटवताना ज्या नियतीशी करार केलेला होता, त्या कराराशी बांधीलकी म्हणून 'मूलभूत हक्क' या स्वरुपात भारतीयांना राज्यघटनेने हे हक्क बहाल केले असे म्हणता येईल.

munotes.in

२.१ भारतीय राज्यघटनेने दिलेले मूलभूत हक्क

नागरिकांचे हक्क व स्वातंत्र्य हे लोकशाही व्यवस्थेचे मुख्य आधार होत. देशाच्या नागरिकांना लोकशाही प्रक्रियेमध्ये सहभागी होता यावे आणि स्वत:च्या व्यक्तिमत्वाचा विकास करण्याची संधी मिळावी यासाठी मूलभूत हक्काची नितांत आवश्यकता असते. नागरिकांच्या हक्कांना संरक्षण मिळाल्याशिवाय लोकशाही व्यवस्थेची प्रस्थापना होवू शकत नाही याची पूर्ण जाणीव संविधान कर्त्यांना होती. लोकशाही मूल्यांवरील या विश्वासातून संविधानकर्त्यांनी देशाची राज्यघटना तयार करताना मूलभूत हक्कांकडे विशेष लक्ष दिले.

भारतीय संविधानाने दिलेल्या मूलभूत हक्कांचे वैशिष्ट असे की, नागरिकांना मूलभूत हक्क देत असतानांच प्रत्येक हक्कावरील मर्यादाही स्पष्ट केल्या आहेत. त्याचप्रमाणे ज्या अपवादात्मक परिस्थितीत संसद कायदा करुन मूलभूत हक्क स्थगित करु शकते अशा परिस्थितीचा उल्लेखही केला आहे. तसेच शांतता व सुरक्षिततेच्या दृष्टीने देशाच्या काही भागात राहणाऱ्या व्यक्तीचे मूलभूत हक्क नियंत्रीत वा रद्द करण्याचा अधिकारही संविधानाने संसदेस दिला आहे. यावरुन संविधानकर्त्यांनी व्यक्तिंच्या हक्काप्रमाणेच देशाच्या शांतता व सुरक्षिततेलाही महत्व दिले आहे हे स्पष्ट होते.

भारतीय राज्यघटनेच्या भाग-३ मध्ये नागरिकांचे मूलभूत हक्क नमूद केले आहेत. संविधानाने मूलभूत हक्कांची ६ गटात विभागणी केली असून, मूळ राज्यघटनेत हे ७ प्रकारचे मूलभूत हक्क होते. १९७९ साली ४४वी घटनादूरुस्ती करुन संपत्तीचा हक्क मूलभूत हक्कांच्या यादीतून काढून टाकला आणि संविधानाच्या १२व्या भागात नवे ३००-क कलम टाकून त्यात हा हक्क नमूद केला. त्यामुळे संपत्तीचा अधिकार आता केवळ एक वैधानिक हक्क उरला आहे.

भारतीय संविधानाने दिलेल्या मूलभूत हक्काचे विवेचन पुढीलप्रमाणे करता येईल.

१) <u>समतेचा अधिकार (कलम १४ ते १८)</u>

शतकानुशतके समाजिक, आर्थिक विषमता नांदत असलेल्या भारतीय समाजव्यवस्थेत लोकशाही मुल्यांचे बिजारोपन करुन विषमतेची जळमटे दूर व्हावीत या उद्देशाने संविधानक त्यांनी मुलभूत हक्कांची सुरुवात समतेच्या अधिकारापासून करुन सामाजिक, आर्थिक, राजकिय समता प्रस्थापित करण्याचा प्राधान्य दिल्याचे दिसते. समतेच्या अधिकारा अंतर्गत पुढील कलमे आहेत.

१. कलम १४ :कायदयापुढे समानता.

कलम १४ नूसार, कोणत्याही व्यक्तीस भारताच्या राज्यक्षेत्रात कायदयापुढे समानता अथवा कायदयाचे समान संरक्षण लाभले आहे. कायदयापुढे समानता याचा अर्थ, सर्व व्यक्ती कायदयापुढे समान आहेत आणि कायदा सर्व लोकांना समान पध्दतीने लागू असेल तसेच कोणताही व्यक्ती कायदयाहून श्रेष्ठ नाही. जात, धर्म, लिंग, भाषा, वंश, संपत्ती अशा कोणत्याही आधारावर भेदभाव न करता कायदा सर्वांना समान असेल आणि सर्व व्यक्तिंना कायदयाचे समान संरक्षण लाभेल.

कायदयासमोर सर्व लोक समान असले तरी काही काही व्यक्तिंना यातून सूट किंवा अधिक संरक्षण दिले आहे. देशाचे राष्ट्रपती, राज्यपाल, परदेशी अधिकारी, खासदार आणि आमदार, प्रसार माध्यमांचे प्रतिनिधी, सैनिक इत्यादींना कायदयाद्वारे विशेष संरक्षण लाभले आहे.

२. *कलम १५ भेदभावास प्रतिबंध*

कलम १५ नूसार राज्य कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल होईल अशा प्रकारे केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या किंवा इतर कोणत्याही कारणावरुन भेदभाव करणार नाही. याच कारणावरुन कोणत्याही व्यक्तीस दुकाने, सार्वजनिक उपहारगृहे, हॉटेल, करमणूकीची ठिकाणे यात प्रवेश किंवा पुर्णत: किंवा अंशत: सरकारी पैशातून उभारण्यात आलेले तलाव, विहिरी, स्नानगृह, रस्ते, उदयाने याचा वापर करण्यास मनाई करता येणार नाही.

अपवाद

या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे महिला व बालके, सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्ग तसेच अनुसूचित जाती-जमातीकरीता कोणतीही विशेष तरतूद करण्यात राज्याला प्रतिबंध होणार नाहीत अल्पसंख्यांक शेक्षणिक संख्या खेरीज अन्य खाजगी शैक्षणिक संस्थांमध्ये-मग त्या राज्याकडून अनूदान प्राप्त असोत अगर नसोत प्रवेश देण्यासंबंधी कोणतीही विशेष तरतूद करण्यात राज्याला प्रतिबंध होणार नाही.

कलम १५तील उपवादाच्या कलमांमुळेच महिला व बालके यांच्यासाठी विशेष तरतूदी तसेच मागासवर्ग घटकांना शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशासंबंधीचे आरक्षण व शूल्कामध्ये सवलती म्हणजेच शैक्षणिक आरक्षणाचे तत्व प्रस्थापित झाले आहे.

३. *कलम १६: सार्वजनिक सेवा मध्ये संधीची समानता*

कलम १६ हे; धर्म, वंश, जात, लिंग, कूळ, जन्म, निवास या कोणत्याही आधारावर भेदभाव राज्य सार्वजनिक सेवा किंवा नोकरीमध्ये संधीच्या समानतेची तरतूद करते.

अपवाद

१) एखादे घटकराज्य किंवा केंद्रशासित प्रदेश यांच्या नियंत्रणाखाली सेवा किंवा नोकरीसाठी या प्रदेशात राहणाऱ्या उमेदवारासाठी आरक्षण देण्याची तरतूद संसद करु शकते.

२) राज्याच्या सेवा किंवा नोकरीमध्ये मागासवर्गाला राज्याच्या मते पर्याप्त प्रतिनिधित्व नाही अशा वर्गाकरीता पदे राज्य राखून ठेवू शकते.

३) एखाद्या धार्मिक किंवा सांप्रदायिक संस्थेच्या कारभाराशी संबंधित असलेल्या पदाचा किंवा प्रबंधन मंडळाचा कोणताही सदस्य हा त्या धर्माची वा पंथाचीच व्यक्ती असली पाहीजे, असा कायदा राज्याने केला तर, तो या हक्काचा भंग मानला जाणार नाही.

कलम १६ तील अपवाद करण्याच्या खंड ४, ४(क), ४(ख) या तरतूदीमुळे सरकारी नोकरीमध्ये आरक्षणाचे तत्व प्रस्थापित झाले आहे. सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षणाचे हे प्रमाण ५० पेक्षा जास्त असू नये, अशी मर्यादा घातली आहे.

४. *कलम १७: अस्पृश्यता निर्मूलन*

कलम १७ नुसार 'अस्पृश्यता' नष्ट करण्यात आली आहे. या कलमानुसार अस्पृश्यतेचे कोणत्याही स्वरुपातील आचरण निषिद्ध मानले आहे. अस्पृश्यतेतून उद्‌भवणारी कोणतीही नि:समर्थता लादणे हा कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध असेल.

munotes.in

५. *कलम १८: पदव्यांचे निर्मूलन*

स्वातंत्र्यपूर्वकाळात ब्रिटिश साम्राज्याशी निष्ठा दाखविणाऱ्या व्यक्तींना ब्रिटिशांकडून रावसाहेब, रावबहादूर, खानसाहेब अशा पदव्या दिल्या जात होत्या. अशा सेवाविषयक किंवा विद्याविषयक मानविशेष नसलेला कोणताही किताब वा पदव्या राज्याकडून प्रदान केल्या जाणार नाही. मग तो भारतीय असो वा परदेशी असो. हे कलम कोणत्याही परदेशी राज्यापासून भारतीय नागरिकाला पदवी स्वीकारण्यास मनाई करते. भारतातील किंवा परदेशातील कोणतीही व्यक्ति राज्याच्या नियंतत्रणाखालील लाभाचे व विश्वासाचे पद धारण करत असेल तर अशा कोणत्याही व्यक्तीला परकीय देशाकडून कोणताही किताब, भेट, आर्थिक लाभाचे, पद भारताच्या राष्ट्रपतीची संमतीशिवाय स्वीकारु शकणार नाही.

या कलमान्वये अनुवांशिक शीर्षके, उदा. महाराजा, दिवाण, रावबहादूर आणि अशा इतर पदव्या-किताबांवर बंदी घातली असली तरी नागरी, लष्करी किंवा खेळविषयक पुरस्कार, जसे भारतरत्न, अशोकचक्र, अर्जून पुरस्कार अशा व इतर पुरस्कारांना या कलमान्वये किताब म्हणून मानले जात नाहीत किंवा या पुरस्कारांचा उपसर्ग या कलमाला होत नाही.

(२) स्वातंत्र्याचा अधिकार (कलम १९ ते ३३)

कलम १९: सहा प्रकारचे स्वातंत्र्याच्या हक्कांचे संरक्षण:

कलम १९ नुसार, भारतीय नागरिकांना ६ प्रकारचे स्वातंत्र्याचे हक्क प्राप्त झालेले आहेत. तथापि, काही कारणास्तव राज्य या हक्कांवर वाजवी निर्बंध लादू शकते. भारतीय नागरिकांना मूलभूत हक्क या स्वरूपात ६ प्रकारचे स्वातंत्र्य जे प्राप्त झाले आहेत, ते पुढीलप्रमाणे

१. *कलम १९(१): भाषण व अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य:*

व्यक्तित्व विकासाच्या जडणघडणीत विचार किंवा मत प्रगटीकरणाला विशेष महत्व असते. व्यक्तिला विचार किंवा मत व्यक्त करण्याला पर्याप्त संधी मिळाली तर, व्यक्तीच्या अंगभूत गूणांच्या विकासाला चालना मिळते. त्यातून व्यक्ति स्वत:ची प्रगती तर करतोच पण त्याचबरोबर त्यातून समाजाची पर्यायाने राष्ट्राची प्रगती होते. हीच बाब लक्षात घेऊन संविधानकर्त्यांनी स्वांतत्र्याच्या अधिकाराचा विचार करतांना अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्याला अग्रक्रम देऊन या हक्काचे महत्व अधोरेखीत केले आहे.

भाषण किंवा अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य म्हणजे एक प्रकारे विचार किंवा मत प्रगट करण्याचे स्वातंत्र्य होय. व्यक्ति आपले विचार किंवा मत, लिखाण, भाषण, कला इत्यादीतून व्यक्त करु शकते. त्यामूळेच या स्वातंत्र्यामध्ये मुद्रण स्वातंत्र्याचा अधिकार अंतर्भूत आहे. वृत्तपत्रातील लिखाण किंवा साहित्यातील साहित्यिकांचे विचार किंवा हल्लीच्या काळात समाज माध्यमातून (उदा. व्हाटस् अप, फेसबूक, ट्विटर) व्यक्त होणारे विचार म्हणजे विचार स्वातंत्र्याची अभिव्यक्ती होय. सामाजिक-राजकीय घडामोडींवर स्वातंत्रपणे चर्चा करण्याचे, टीका-टीपणी करण्याचे स्वातंत्र्य नागरिकांना मिळालेले आहे. तथापि, संविधानात वृत्तपत्र स्वातंत्र्याचा स्पष्ट उल्लेख केलेला नाही. तरीपण वृत्तपत्र स्वातंत्र्य हे मत प्रदर्शनाच्या स्वातंत्र्यातच समाविष्ट केलेले आहे, असे मत श्री अय्यंगार यांनी मांडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मताला दुजोरा दिला त्यांच्या मते वृत्तपत्राचे संपादक हे भारतीय नागरिक आहेत, त्यामुळे त्यांना आपले विचार वृत्तपत्राद्वारे प्रगट करण्याचे स्वातंत्र्य आहे. अशाप्रकारे कोणत्याही माध्यमातून मत प्रगट करण्याचे स्वातंत्र्य भारतीयांना आहे हे स्पष्ट होते. त्यामुळे मुद्रण, वृत्तपत्र, समाजमाध्यम इत्यादी स्वातंत्र्याचा विचार करण्याची गरज नाही.

munotes.in

मर्यादा आणि निर्बंध

मुळ संविधानात स्वातंत्र्यावरील मर्यादांचा उल्लेख नव्हता. मात्र १९५१ मध्ये पहिला घटनादुरुस्ती तसेच विभिन्न काळात झालेल्या घटनादुरुस्तीतून या प्रत्येक स्वातंत्र्यावर मर्यादा किंवा निर्बंध घातले गेले आहे.

भाषण व अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्यावरील मर्यादा अशी की भारताची सार्वभौमत्व व एकात्मता, राज्याची सुरक्षितता, परकीय देशांशी मैत्रीचे संबंध, सार्वजनिक कायदा व सुव्यवस्था, सभ्यता किंवा नैतिकता, न्यायालयाचा अवमान करणे, बदनामी करणे आणि गुन्ह्यास प्रवृत्त करणे.

२. *१९(२) शांततेने व विनाशस्त्र एकत्र जगण्याचे स्वातंत्र्य*

सर्व नागरिकांना सार्वजनिक जागेत शांततेने आणि शस्त्र न घेता एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य आहे. यात सभा, सम्मलने, चर्चासत्रे, मोर्चे, निदर्शने, मिरवणूका इत्यादी गोष्टींसाठी शांततेने एकत्र जमू शकतात.

निर्बंध

देशाचे सार्वभौमत्व व एकात्मता, शांतता व सुव्यवस्था या कारणासाठी शासन या स्वातंत्र्यावर निर्बंध घालू शकते.

३. *१९(३) संघटना किंवा संस्था स्थापन करण्याचे स्वातंत्र्य*

सर्व नागरिकांना संस्था किंवा संघटना स्थापना करण्याचा हक्क आहे. यात राजकीय पक्ष, कामगार संघटना, स्वयंसेवी संस्था, कंपन्या, क्लब आणि इतर संस्था-संघटना स्थापना करण्याचा हक्क आहे.

निर्बंध

देशाचे सार्वभौमत्व व अखंडता याला आव्हन देणाऱ्या संघटना, बेकायदेशीर किंवा अनैतिक व्यापार करणाऱ्या संस्था, देशाची शांतता व सुव्यवस्था बिघडवणाऱ्या काही संस्था, दहशतवादी चळवळी व संघटना इत्यादींना शासन बेकायदेशीर घोषीत करुन त्यावर बंदी आणू शकते.

४. *१९(४) संचाराचे स्वातंत्र्य*

देशाच्या सर्व नागरिकांना भारतीय संघराज्याच्या कोणत्याही क्षेत्रात मुक्तपणे संचार करण्याचे म्हणजे हिंडण्या-फिरण्याचे स्वातंत्र्य आहे.

निर्बंध

भारताची शांतता व सुव्यवस्था, सार्वभौमत्व व अखंडत्व, तसेच सार्वजनिक सुरक्षा या कारणास्तव संचार स्वातंत्र्यावर शासन निर्बंध घालू शकते.

५. *१९(५) निवासाचे किंवा वास्तव्याचे स्वातंत्र्य*

भारतातील सर्व नागरिकांना भारतीय संघराज्याच्या कोणत्याही क्षेत्रात तात्पूरते किंवा कायमचे वास्तव्य करण्याचे स्वातंत्र्य आहे.

सर्वसाधारण जनतेच्या हिताच्या किंवा सुरक्षिततेच्या कारणास्तव अनुसूचित जमातीच्या हितसंबंधाच्या संरक्षणासाठी शासन कायदा करुन या स्वातंत्र्यावर निर्बंध घालू शकते.

munotes.in

६. *१९(६) कोणताही व्यवसाय, व्यापार, रोजगार किंवा धंदा करण्याचे स्वातंत्र्य*

भारतातील सर्व नागरिकांना कोणताही व्यवसाय, व्यापार, रोजगार किंवा धंदा करण्याचा हक्क आहे. भारतीय नागरिक स्वत:च्या इच्छेनुसार कोणताही व्यवसाय वा धंदा करु शकतो.

निर्बंध

जो पेशा किंवा व्यवसाय चालविण्यासाठी आवश्यक पात्रता किंवा तांत्रिक ज्ञान गरजेची असते, जो व्यवसाय किंवा व्यापार चालविण्यासाठी सामान्य नागरिकांना (पूर्णत: किंवा अंशत:) शासनाने मनाई केली आहे किंवा राज्याच्या नियंत्रणाखाली जे व्यवसाय आहे. उदा. शस्त्रास्त्र निर्माण करणे, सामाजिक स्वास्थाच्या दृष्टिने जे व्यवसाय करण्यास शासनाने मनाई केली आहे. अशा व्यवसायावर शासन निर्बंध घालू शकते. कलम १९ नुसार भारतीय नागरिकांना स्वांतत्र्यासंबंधीचे जे ६ अधिकार दिले आहे त्यांच्या संरक्षणासाठी कलम २०, २१ आणि २२ मध्ये तरतूदी करण्यात आल्या आहेत.

कलम २० अपराधांबद्दलच्या दोषसिद्धीबाबत संरक्षण

प्रत्येक व्यक्तिला आपली प्रतिष्ठा जपता यावी तसेच सर्व आरोपी आणि दोषी व्यक्तीच्या हक्कांचे संरक्षण व्हावे यासाठी घटनेच्या कलम २० मध्ये खालील तरतूदी दिल्या आहेत.

१. जे सत्य अपराध असल्याचा दोषारोप करण्यात आला असेल ते कृत्य एखाद्या व्यक्तीने करण्याच्यावेळी जो कायदा अस्तित्वात आहे त्या कायद्यानुसारच दोषी ठरविले जाईल. म्हणजेच पूर्वलक्षी प्रभावाने आजचा कायदा आधीच्या दोषासाठी लागू होणार नाही. तसेच एखादा अपराध करण्याच्या वेळी अंमलात असल्या कायद्यानुसार जी शिक्षा होऊ शकते त्यापेक्षा अधिक किंवा मोठी शिक्षा केली जाऊ शकत नाही.

२. एकाच अपराधाबद्दल एकापेक्षा अधिक वेळा कोणत्याही व्यक्तिवर खटला चालवला जाणार नाही आणि शिक्षा केली जाणार नाही.

३. कोणत्याही अपराधाचा आरोप असलेल्या व्यक्तिला स्वत:विरुद्ध साक्ष देण्याची सक्ती केली जाणार नाही.

कलम २० नुसार दिलेले वरीलप्रकारचे असे हक्क आहेत. जे अगदी आणीबाणीच्या काळात देखील निलंबित केले जाऊ शकत नाही.

कलम २१ जिवित व व्यक्तिगत स्वांतत्र्याचे संरक्षण

प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने व सुरक्षित जीवन जगता यावे यासाठी घटनेचे हे २१वे कलम अतिशय महत्वाचे आहे. हे कलम सर्व नागरिकांना आणि गैरनागरिकांना ही हमी देते की, कायद्याद्वारे प्रस्थापित केलेली कार्यपद्धती अनुसरल्याखेरीज कोणत्याही व्यक्तीस तिचे जीवित किंवा व्यक्तिगत स्वांतत्र्य यांपासून वंचित केले जाणार नाही.

हे कलम कार्यकारी आणि कायदेमंडळाच्या अनियंत्रित किंवा बेकायदेशीर कारवाईपासून संरक्षणाची हमी देते. 'कायद्याद्वारे प्रस्थापित केलेली कार्यपद्धत' संविधानाने निश्चित केलेल्या कायदे तयार करण्याच्या प्रक्रिया पूर्ण करुनच जीवित आणि व्यक्तिगत अधिकार निर्बंध घालू शकते. संसदेने उचित प्रक्रिया पूर्ण करुन केलेल्या कायद्यासाठी वैधता न्यायालयात ठरविता येणार नाही असे सर्वोच्च न्यायालयाने ए. के. गोपालन विरुद्ध मद्रास राज्य या खटल्याचा निर्णय देतांना स्पष्ट केले आहे. या कलमाद्वारे न्यायालय कार्यकारी मंडळावर नियंत्रण ठेवू शकते, कायदेमंडळावर नाही. अशी मर्यादा

munotes.in

नयायालयाने आपणहून स्वीकारली आहे. म्हणजेच संसदेने कायदा संमत केला तर त्याच्या योग्यायोग्यतेची तपासणी न्यायालय करणार नाही, मात्र कार्यकारी मंडळाने त्याची अंमलबजावणी योग्य केली की नाही हे ठरविण्याचा अधिकार न्यायालयाला आहे.

व्यक्तिला सन्मानाचे व सुरक्षित जीवन जगता यावे तसेच व्यक्तिला वैयक्तिक जीवन जगतांना कोणतेही अडथळे शासन किंवा अन्य कोणाकडूनही येवू नये यासाठी न्यायालयाने कलम २१ अंतर्गत कोणते हक्क येतात हे न्यायालयाने वेळोवळी निर्णय देतांना स्पष्ट केले आहे. नुकताच न्यायालयाने खाजगीपणाचा हक्क हा मूलभूत हक्क म्हणून जाहिर केलेला आहे. खालील हक्क कलम २१ अंतर्गत येतात.

सन्मान आणि सभ्यतेने वागवण्याबाबतच्या महिलांचा हक्क, आरोग्याचा हक्क, आपत्कालीन वैद्यकीय मदतीचा हक्क, शासकीय रुग्णालयात वेळेवर वैद्यकीय उपचार मिळण्याचा हक्क, खाजगी-पणाचा हक्क, निवाऱ्याचा हक्क, उदर निर्वाहाचा हक्क, प्रतिष्ठेने जगण्याचा हक्क, स्वच्छ पर्यावरणाचा आणि धोकादायक उद्योगांपासून संरक्षण मिळण्याचा हक्क, मोफत कायदेशिर मदतीचा हक्क, एकांतवासाच्या शिक्षेविरुद्ध हक्क, जलद खटल्याचा हक्क, माहितीचा हक्क, परदेशांत प्रवास करण्याचा हक्क, विलंबित अमंलबजावणी विरोधात हक्क, बेडया लावण्याविरोधात हक्क, अमानुष वागणूकीविरुद्ध हक्क, वेठबिगारीविरुद्ध हक्क, निष्पक्ष खटल्याचा हक्क, कैद्याला जीवनावश्यक गरजा पुरवायचा हक्क, सार्वजनिक फाशीविरुद्ध हक्क, सुनावणीचा हक्क, प्रतिष्ठेचा हक्क, राज्याच्या बाहेर न काढण्याचा हक्क, कोठडीतील छळाविरुद्ध हक्क.

कलम २१क: शिक्षणाचा हक्क

सन २००२ साली भारतीय संविधानात ८६वीं घटनादुरुस्ती करुन त्या अन्वये राज्यघटनेत कलम २१क हे कलम जोडण्यात आले. या कलमानुसार ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व मूलांना शिक्षण मोफत व सक्तीचे केले आहे. अशा प्रकारे या नव्या कलमाद्वारे प्राथमिक शिक्षणाला मूलभूत हक्क म्हणून मानले गेले आहे.

कलम २२ अटक व स्थानबद्धता यांपासून संरक्षण

कोणतेही कारण न देता ब्रिटिश सत्तेला आव्हान देण्याऱ्याला बेकायदेशीर अटक करणे आणि कोणताही खटला न चालविता लोकांना स्थानबद्ध करणे हे ब्रिटिश राजवटीच्या काळात सर्रास चालायचे. परंतु भारतीय संविधानाने भारतीय नागरिकांना बेकायदेशीर अटक व स्थानबद्धते पासून कलम २२ द्वारे संरक्षण दिले आहे. या कलमाचे दोन भागात विभाजन करण्यात आले आहे. कलम २२ मधील पोटकलम (१) (२) (३) (४) हे बेकायदेशीर अटकेपासून संरक्षणासंदर्भात आहे तर कलम २२(५) (६) आणि (७) ही पोटकलमे प्रतिबंधात्मक स्थानबद्धतेच्या कायद्यासंदर्भात आहेत.

अटकेपासून संरक्षण

अटक झाल्यानंतरही आरोपी व्यक्तिला संविधानाने काही मूलभूत अधिकार कलम २२ नुसार दिलेले आहेत.

१. अटक केलेल्या कोणत्याही व्यक्तिला अटकेची कारणे शक्य तितक्या लवकर कळल्याशिवाय त्याला कैद करता येणार नाही तसेच त्या व्यक्तिला आपल्या पसंतीच्या वकिलाचा सल्ला घेण्याचा किंवा बचाव करण्याचा हक्क नाकारता येणार नाही.

२. अटक केलेल्या व्यक्तिला २४ तासाच्या आत जवळच्या दंडाधिकाऱ्यापुढे हजर केले जाईल. दंडधिकारऱ्याच्या आदेशाशिवाय त्याला अटकेत ठेवता येणार नाही. (क) जी व्यक्ती परकीय

munotes.in

शत्रू गणला गेला असेल (२) जी व्यक्ति प्रतिबंधक स्थानबद्धतेच्या कायद्याखाली अटकेत असेल, त्या व्यक्तिबाबत हे अधिकार लागू होणार नाही.

प्रतिबंधात्मक स्थानबद्धता कायदा:

प्रतिबंधात्मक संविधानात देशाची सुरक्षा, शांतता व सुव्यवस्था, परराष्ट्रीय संबंध, घटकराज्यांची सुरक्षा इत्यादींना धोक निर्माण होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक स्थानबद्धतेच्या कायद्याची तरतूद कलम २२(५) (६) (७) नुसार केली आहे. संविधानातील हे कलम व्यक्ति स्वांतत्र्याला मारक ठरू शकते, कारण या कायद्याद्वारे कोणत्याही व्यक्तिला कोणतेही कारण न दाखविता अठक करण्याचा अधिकार सरकारला प्राप्त झाला आहे. कलम २२ (४) (५) (६) (७) नुसार खालील तरतूदी करण्यात आल्या अहेत.

कलम २२(४) : प्रतिबंधक स्थानबद्धतेच्या कोणत्याही कायद्याद्वारे दोन महिन्यांपेक्षा अधिक काळ स्थानबद्ध करण्याचा अधिकार नाही. मात्र उच्च न्यायालयाच्या सल्लागार मंडळाने दोन महिन्याची मूदत संपण्यापूर्वी दोन महिन्यांपेक्षा अधिक काळ स्थानबद्धतेचा पुरेशा कारणासह अभिप्राय दिला असेल तर स्थानबद्धतेचा काळ वाढू शकतो.

कलम २२(५) : कोणत्याही व्यक्तिला ज्या कायद्याखाली स्थानबद्ध केले असेल, अटक करणारा संबंधित अधिकारी शक्य तितक्या लवकर प्रतिबंधात्मक स्थानबद्धतेची कारणे त्या व्यक्तिला कळविल आणि त्या आदेशाविरुद्ध आपले म्हणणे मांडण्याची त्याला लवकरात लवकर संधी देईल.

कलम २२(६) : स्थानबद्ध करणाऱ्या अधिकाऱ्यास व्यक्तिस स्थानबद्ध करण्याची कारणे स्पष्ट करण्यास सार्वजनिक हिताच्या दृष्टीने अयोग्य वाटत असेल, तर स्थानबद्धतेची कारणे जाहिर करण्याचे बंधन त्या अधिकाऱ्यावर असणार नाही.

कलम २२(७) : प्रतिबंधात्मक स्थानबद्धतेची कालावधी सल्लागार मंडळाच्या शिफारसीने कायद्याची उचित प्रक्रिया पूर्ण करून संसदेला पाठविता येईल.

प्रतिबंधक स्थानबद्धतेची तरतूद म्हणजे व्यक्ति स्वातंत्र्यावरील जाचक मर्यादा मानली जाते. या कायद्यामुळे सरकारला वाटेल त्याला खटला न चालविता अटक करण्याचा अधिकार प्राप्त होतो. विशेष म्हणजे हे कायदे कितीही अनुचित वाटत असले तरी ते रद्द ठरविण्याचा अधिकार न्यायालयांना नाही. त्यामुळे 'कायद्याचे राज्य' आणि 'निष्पक्षपाती न्याय'या संकल्पनेशी ही तरतूद विसंगत आहे. घटना समितीने जेव्हा या तरतूदींचा समावेश होण्याचे कारण देशासमोरील आव्हानांचे गांभिर्य व परिस्थितीतील तणाव हे होते. घटना लागू होऊन आज सत्तर वर्षे होत आहेत. तरीही देशासमोरील ह्या समस्या सूटल्या नाहीत. देशविघातक कारवाईंपासून लोकशाहीचे संरक्षण व्हावे; देशात स्थैर्य, शांतता व सुव्यवस्था कायम रहावी यासाठी आजही या कायद्याचे महत्व असलेले दिसते.

१९५० पासून प्रतिबंधक स्थानबद्धतेचे कायदे संसदेने नूतनीकृत केले. पण पुढे १९५१ साली सरकारने अंतर्गत सुरक्षा (Maintenance of Internal Security Act&MISA) कायदा संमत केला. १९७५ नंतर या मिसा कायद्याने लोकशाही मूल्य पायदळी तूडवीली या कायद्याचा वापर आणीबाणीच्या काळात विरोधी पक्षाच्या नेत्यांना अटक करण्यासाठीच मोठया प्रमाणात झाला. १९७७ पर्यंत मिसा कायदा अस्तित्वात होता. त्यांनतर १९८० ते १९८५ रासूका (राष्ट्रीय सुरक्षा कायदा) आणि १९८५ ते १९९५ पर्यंत 'टाडा' यांसारखे कायदे करुन हजारोंना तुरुंगात डांबले. २४ ऑक्टोबर २००१ रोजी पोटो (प्रिव्हेन्शन ऑफ टेररिझम ऑर्डिनन्स दृ २००१)

munotes.in

चा अध्यादेश काढण्यात आला. दहशतवादाचा बिमोड करण्यासाठी सरकारने 'पोटो' चे 'पोटा' त (Prevention of Terrerism Act) रुपांतर केले. साररूपाने असे म्हणता येईल की, देशांत शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी, दहशतवाद-नक्षलवादासारख्या देशविघातक, फूटीरतावादी कारवायांना पायबद घालण्यासाठी या सर्व प्रतिबंधात्मक स्थानबद्धतेच्या कायदे तयार करण्यात आले. राष्ट्रीय सुरक्षेच्या कारणासाठी हे कायदे महत्वाचे असले आणि त्यासंबधी या कायद्यांनी महत्वाची कामगिरी बजावली असली तरी, या कायद्यांचा वापर गुन्हेगारांना वटनिवर आणण्यापेक्षा विरोधी पक्षाच्या लोकांना वठनीवर आणण्यासाठी मोठया प्रमाणात झाला. ऑगस्ट १९९४ मध्ये तत्कालीन गृहमंत्री शंकरराव चव्हाण यांनी संसदेत स्पष्ट शी कबूली दिली की, टाडा कायद्याचा राजकीय कारणांसाठी राज्याराज्यात गैरवापर झाला. याच महिन्यात मानवी हक्क आयोगाच्या राष्ट्रीय अध्याक्षानेही जाहीर केले की, सुमारे ६५ हजार व्यक्ती टाडाखाली पकडल्या गेले असून कोणत्याही चौकशी वाचून कारागृहात खितपत आहेत. विरोधकांच्या टीकेचा आणि मानवी हक्क आयोगाच्या नाराजीचा काहीही उपयोग झाल्याचे दिसत नाही. उलट या कायद्यांना विरोध करणारे विरोधक जेव्हा सत्तेवर आले तेव्हा त्यांनी प्रतिबंधक स्थानबद्धतेचे कायदे करण्याचे तसेच त्याचा राजकीय कारणांसाठी गैरवापर करण्याचे सोडले नाही.

३. शोषणाविरुद्ध हक्क (कलम २३ व २४)

शोषण मग ते कोणत्याही प्रकारचे असो, जोपर्यंत समाजामध्ये शिल्लक राहील तोपर्यंत कोणत्याही हक्कांना किंमत राहणार नाही. समता-स्वांतत्र्याचा हक्क विशिष्ट-पुढारलेल्या वर्ग अथवा व्यक्ति मिरासदारी बनेल. ही बाब हेरुनच संविधानकर्त्यांनी समता, स्वातंत्र्याच्या हक्कानंतर शोषणाविरुद्धच्या हक्काचा विचार करुन एकप्रकारे हक्कांच्या प्राधान्यक्रमाचे औचित्य साधलेले दिसते. भारतीय संविधान कलम २३ व २५ नुसार शोषणाविरुद्धचा हक्क भारतीय नागरिकांना पुढीलप्रमाणे मिळाला आहे.

कलम २३ माणसांचा अपव्यापार आणि वेठबिगारी यांना मनाई

१. माणसांचा क्रयविक्रय करण्याच्या व वेठबिगारी यांसारख्या सक्तीने काम करवून घेण्याच्या पद्धतीस बंदी करण्यात आली आहे. या तरतूदीचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन करणे कायद्यानुसार शिक्षापात्र गुन्हा ठरेल.

२. राज्य सार्वजनिक कारणांसाठी किंवा लष्करी सेवेसारख्या सेवेसाठी नागरिकांवर सक्ती करु शकते; मात्र त्यासाठी राज्याला केवळ धर्म, वंश, जात, वर्ग या कोणत्याही कारणावरुन भेदभाव करणार नाही.

कलम २४ बालकांना कामावर ठेवण्यास मनाई

१४ वर्षाखालील कोणत्याही बालकास कोणत्याही कारखान्यात अथवा खाणीत काम करण्यासाठी ठेवले जाणार नाही अथवा कोणत्याही धोकाच्या ठिकाणी कामावर त्यांना ठेवले जाणार नाही.

याचाच अर्थ असा की धोकादायक नसलेल्या ठिकाणी बालकांना कामावर ठेवणे प्रतिबंधीत नाही, पण सरकारद्वारे नियंत्रीत आहे. हॉटेल्स, रेस्टॉरंट, ढाबा, चहाची दुकाने, चित्रपटगृहे इत्यादी अशा धोकादायक नसलेल्या ठिकाणी सुद्धा बालकामगारांना ठेवण्यास कायद्याने बंदी घातली आहे.

munotes.in

४. धर्मस्वातंत्र्याचा हक्क (कलम २५ ते २८)

भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यांतच भारतीय गणराज्य हे धर्मनिरपेक्ष असल्याचे घोषित केलेले आहे. संविधानाच्या कलम २५ ते २८ मध्ये धर्म स्वांतत्र्याच्या संबंधी पुढील तरतूदी केल्या आहेत.

कलम २५ धर्माचे मुक्त प्रगतिकरण, आचरण व प्रचार करण्याचा हक्क

भारतातील प्रत्येक व्यक्तीला त्याच्या सद्सद्विवेकबुद्धीनुसार धर्म निवडण्याचा आणि आपल्या धर्मानुसार वागण्याचा किंवा धर्माचे मुक्त प्रगटीकरण करण्याचा तसेच आपल्या धर्माचे आचरण व प्रचार करण्याचा अधिकार आहे मात्र असे करतांना सार्वजनिक सुव्यवस्था, नीतिमत्ता व आरोग्य यांना बाधा येणार नाही याची काळजी त्याने घेतली पाहिजे.

आपल्या आवडीचा धर्म स्विकारण्याचा, त्याचे आचरण व प्रचार करण्याचा अधिकार या कलमाद्वारे मिळालेला असला तरी काही बाबतीत राज्यांना कायदे करण्याची तरतूद याच कलमाच्या (क), (ख) या उपक्रमामध्ये केली आहे.

(क) धर्माचरणाशी निगडीत असेल अशा कोणत्याही आर्थिक, वित्तीय, राजकीय वा अन्य धर्मिकेतर कार्याचे नियमन करणाऱ्या किंवा त्यावर निर्बंध घालणाऱ्या.

(ख) सामाजिक कल्याण व सुधारणा याबाबत किंवा सार्वजनिक स्वरुपाच्या हिंदु धार्मिक संस्था, हिंदुंचे सर्व वर्ग व पोटभेद यांना खूल्या करण्याबाबत.

यासंबंधी कायदे केल्यामुळे धार्मिक स्वातंत्र्याचा संकोच झाला असे कोणालाही म्हणता येणार नाही.

धर्म स्वातंत्र्याच्या हक्काचा वापर करुन व्यक्ती आपल्या धर्मश्रद्धांचे आचरण करण्याबाबत स्वतंत्र असला तरी समाजविघातक रुढी-परंपरा, अंधश्रद्धा यांचे पालनही धर्माचरण म्हणता येणार नाही. तेव्हा अशा समाजविघातक धर्माचरणाला आळा घालण्यासाठी सरकारला कायदा करता येईल. उदा. सतिप्रथा बंदी कायदा, महाराष्ट्र सरकारने केलेला अंधश्रद्धा निर्मूलन कायदा तसेच केंद्र सरकार करु इच्छित असलेला तीन तलाकवर बंदी आणणारा कायदा इत्यादी. धार्मिक स्वांतत्र्याच्या अधिकाराशी हे कायदे विसंगत आहेत व म्हणून ते अवैध आहेत, असा युक्तिवाद करण्यात आला होता. परंतु न्यायालयाने हा युक्तिवाद फेटाळून लावून असे कायदे वैध आहेत असे निर्णय दिले.

हिंदू व मुसलमानांचा विवाह विषयक कायदा तसेच वारसा विषयक कायदा हा धर्माचा भाग समजला जातो. 'हिंदु' या शब्दांत जैन, शिख, बौद्ध या धर्माचे लोक समाविष्ट आहेत. 'कृपाणे' धारण करणे व स्वत:बरोबर बाळगणे ही शिख धर्माची प्रगटीकरणाची बाब म्हणून मान्य केली आहे.

कलम २६ धर्मविषयक व्यवहारांची व्यवस्था पाहण्याचे स्वातंत्र्य

कलम २६ नुसार प्रत्येक धार्मिक संप्रदायास किंवा त्या संप्रदा यांतील एखाद्या गटास खालील अधिकार दिलेले आहेत.

(क) धार्मिक व धर्मदायी प्रयोजनांकरिता संस्था स्थापना करून त्या स्वखर्चाने चालविणे.

(ख) धार्मिक बाबतीत आपल्या व्यवहाराची व्यवस्था पहाणे.

(ग) जंग व स्थावर मालमत्ता मालकीची असण्याचा व ती संपादन करण्याचा हक्क.

mnotes.in

(घ) कायद्यानुसार अशा मालमत्तेचे प्रशासन करण्याचा हक्क.

म्हणजेच या तरतूदीनुसार धार्मिक संस्था स्थापन करुन त्याचा कारभार पाहण्याचा, त्याच्या खर्चासाठी संपत्ती बाळगण्याचा हक्क प्रत्येक धार्मिक संप्रदाय/गटाला आहे.

कलम २७ धार्मिक बाबतीत कर न देण्याबाबतचे स्वातंत्र्य

कलम २७ नुसार कोणत्याही व्यक्तिला कोणत्याही विशिष्ट धर्माच्या किंवा धार्मिक संप्रदायाच्या प्रचारासाठी किंवा त्या धर्माचे प्रचलन चालू ठेवण्यासाठी कोणताही कर देण्यास भाग पाडले जाऊ शकत नाही. म्हणजेच धार्मिक संस्थांना आपल्या धर्माच्या कार्यासाठी देणगी, वर्गणी गोळा करता येईल मात्र त्यासाठी कोणावरही सक्ती करता येणार नाही.

कलम २८ धार्मिक शिक्षण देयाचे स्वातंत्र्य

कलम २८ नुसार (१) ज्या संस्था पूर्णत: राज्याच्या पैशातून चालविल्या जातात अशा संस्थेत कोणतेही धार्मिक शिक्षण दिले जाणार नाही. (२) जर एखादी शिक्षणसंस्था धार्मिक न्यास किंवा ट्रस्ट खाली स्थापन झाली असेल आणि जिचा उद्देश धार्मिक शिक्षण देणे हा असेल तर, अशा संस्थेचे प्रशासन जरी राज्याकडे असले तरी त्या संस्थेला धार्मिक शिक्षण देण्याची मुभा असेल. (३) राज्याने मान्यता दिलेल्या किंवा राज्याच्या पैशातून सहाय्य मिळत असणाऱ्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत धार्मिक शिक्षण देण्याचा तसेच अशा जागेत उपासना चालविण्याचा हक्क आहे. मात्र अशा संस्थेत कोणत्याही व्यक्तीने किंवा ती अज्ञात असल्यास तिच्या पालकाची संमती असल्याखेरीज धार्मिक शिक्षणाची व उपासना/प्रार्थना इत्यादीत सहभागी होण्याची सक्ती केली जाणार नाही.

धार्मिक स्वातंत्र्याच्या अधिकाराबाबतच्या वरील तरतूदी भारत एक धर्मनिरपेक्ष राज्य म्हणून प्रस्थापित होण्यासाठी महत्वाच्या आहेत. धार्मिक स्वातंत्र्य आणि त्यावर उचित बंधने किंवा निर्बंध घालून व्यक्तिकडून धार्मिक अधिकाराचा अतिरेक होणार नाही. तसेच शासनसुद्धा सर्व धर्माशी समभावाने वागेल याची दक्षता घेतली आहे.

५. सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार (कलम २९ व ३०)

भारतातून विविधतेतून एकता निर्माण करण्याच्या दृष्टीने भारतीय नागरिकांना दिलेला सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार महत्वाचा आहे. भारतीय संस्कृती म्हणजे विविध धर्म, पंथ, भाषा, लिपी अशा विभिन्न घटकांचा एक मिलाप आहे. या विभिन्नतेतून एकात्म झालेला भारतीय संस्कृती टिकवून ठेवायची असेल तर या भारतीय समाजातील प्रत्येक सांस्कृतिक गटांच्या हक्कांचे संरक्षण होणे आवश्यक आहे. याच हेतूने कलम २९ ते ३० यात सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क दिलेले आहे. हे हक्क पुढीलप्रमाणे.

कलम २९ अल्पंसख्याकांच्या हिताचे संरक्षण

कलम २९ नुसार (१) भारतीय प्रदेशातील कोणत्याही भागात राहणाऱ्या नागरिक गटाला आपली स्वत:ची वेगळी भाषा, लिपी वा संस्कृती असेल तीचे जतन करण्याचा हक्क असेल (२) राज्याकडून चालविल्या जाणाऱ्या किंवा राज्याच्या निधीतून सहाय्य मिळत असलेल्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत धर्म, जात, वंश, भाषा या किंवा यापैकी अन्य कोणत्याही कारणावरुन कोणत्याही नागरिकांस प्रवेश नाकारला जाणार नाही.

munotes.in

कलम ३० अल्पसंख्यांक वर्गाचा शैक्षणिक संस्था स्थापन करणे व प्रशासन सांभाळण्याचा हक्क

(१) धर्म किंवा भाषा या निकषानुसार अल्पसंख्याक असलेल्या सर्व वर्गांना आपल्या पसंतीच्या शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा व त्यांचे प्रशासन सांभाळण्याचा हक्क असेल.

(२) शैक्षणिक संस्थांना सहाय्य देतांना राज्य, एखादी संस्था धर्म किंवा भाषा या निकषानुसार अल्पसंख्याक वर्गाच्या व्यवथापनाखाली आहे, या कारणावरुन तिला प्रतिकूल होईल असा भेदभाव करणार नाही.

परंतु सार्वजनिक हिताच्या सुरक्षिततेसाठी राज्य या संस्थांवर नियंत्रण ठेवू शकते.

कलम ३१ मालमत्तेचा हक्क

कलम ३१ नुसार संपत्तीचा अधिकार पूर्वी मूलभूत अधिकाराच्या यादीत समाविष्ट करण्यात आला होता. परंतू १९७८ च्या ४४ व्या घटनादुरुस्तीने हे कलम वगळण्यात आलेले असून मालमत्तेच्या किंवा संपत्तीचा हक्क केवळ कायदेशीर हक्क मान्य केलेला आहे. त्यासाठी राज्यघटनेमध्ये कलम ३१(क) संपत्तीचे संपादन करण्याकरिता तरतूद करणाऱ्या कायद्याची व्यावृत्ती, ३१(ख) विवादित अधिनियम व विनियम विधिग्राह्य करणे, ३१(ग) विवादित नितिनिर्देशक तत्वे अंमलात आणणाऱ्या कायद्यावी व्यावृत्ती, ३१(घ) राष्ट्रविरोधी कारवायांच्या बाबतीतील कायद्याची व्यावृत्ती. असे नवे उपकलमे या कलमाला जोडली आहेत आणि कोणत्याही व्यक्तिची मालमत्ता कायद्याच्या संमतीशिवाय हिरावून घेतली जाऊ नये अशी तरतूद कलम ३००(५) मध्ये केली आहे.

६. घटनात्मक उपाययोजनांचा अधिकार (कलम ३२ ते ३५)

भारतीय संविधानाने नागरिकांच्या सर्व मूलभूत हक्कांना न्यायालयीन संरक्षण देण्यासाठी न्यायालयात दाद मागण्याचा हक्क दिला आहे. आपल्या मूलभूत हक्कांवर कोणी अतिक्रमण केल्यास न्यायालयाकडे दाद मागून आपल्या हक्कांचे संरक्षण करु शकते. घटनात्मक उपाययोजनेच्या हक्काचे महत्व विषद करतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, "कोणत्या कलमावाचून घटना निरर्थक ठरली असती? असे कोणी कला विचारल्यास, मला प्रस्तूत हक्क देणाऱ्या कलमाखेरीज अन्य कलमाचा निर्देश करताच येणार नाही. हा हक्क म्हणजे भारतीय घटनेचा प्राण आहे".

कलम ३२ मूलभूत हक्कांच्या संरक्षणासाठी उपाय

नागरिकांच्या मूलभूत हक्कांना सुरक्षित करण्याच्या दृष्टिने विशिष्ट प्रकरणी न्यायालयाला पुढील ६ प्रकारचे आदेश काढता येतात.

१. *बंदीप्रत्यक्षीकरण किंवा देहोपस्थिती* –

कोणत्याही व्यक्तीला बेकायदेशीररित्या अटक केली असेल तर त्या व्यक्तिला किंवा तिच्या नातलगाला न्यायालयाकडे संविधानात्मक अर्ज करता येतो. यालाच बंदी प्रत्यक्षीकरणाचा अधिकार म्हणतात. याचा शाब्दिक अर्थ 'शारीरिकरित्या हजर करणे' असा होतो. अटक झालेल्या व्यक्तिला सर्वोच्च किंवा उच्च न्यायालयापुढे हजर करण्याची लेखी आज्ञा म्हणजे बंदी प्रत्यक्षीकरण. या लेखी आज्ञेचे उद्दिष्ट ताब्यात घेतलेल्या व्यक्तीला न्यायालयासमोर प्रत्यक्ष हजर करणे आणि ताब्याच्या कायदेशीरपणाची चौकशी करणे आहे. व्यक्तिची अटक बेकायदेशीर आहे असे न्यायालयास आढळल्यास अटक केलेल्या व्यक्तिस मुक्त करण्याचा आदेश न्यायालय देते. एक प्रकारे हा घटनात्मक उपाय म्हणजे बेकायदेशीर अटकेविरुद्ध वैयक्तिक स्वांतत्र्याला दिलेले संरक्षण आहे.

munotes.in

२. *महादेश किंवा परमादेश*

याचा शाब्दिश्क अर्थ आहे 'आम्ही आज्ञा देतो' हा वरिष्ठ न्यायालयाने कनिष्ठ न्यायालय, सरकारी अधिकारी किंवा संस्थेला केलेला हूकूम आहे, ज्यात त्यांचे सार्वजनिक कर्तव्य पूर्ण करण्याचे आदेश दिलेले असतात. एखाद्या व्यक्तीच्या मूलभूत हक्कांवर एखादी व्यक्ति, शासन किंवा शासन अधिकारी अतिक्रमण करीत असेल किंवा वैधानिक कर्तव्य पार न पाडल्यामुळे व्यक्तीयि मूलभूत हक्काची गळचेपी होत असेल तर, संबंधित अधिकारी, संस्था व व्यक्तीने आपली वैधानिक जबाबदारी पार पाडावी असा आदेश सर्वोच्च किंवा उच्चन्यायालय देते. न्यायालयाच्या या आदेशालाच महादेश किंवा परमादेश म्हणतात.

३. *प्रतिबंध (Prohibition)*

एखाद्या खटल्याची सुनावणी कनिष्ठ न्यायालयासमोर सुरु असेल आणि तो खटला चालविण्याचा कायदेशीर अधिकार त्या न्यायालयाला नाही, असे त्या खटल्याशी संबंधित व्यक्तीला वाटत असेल, तर ती व्यक्ती वरिष्ठ न्यायालयाकडे बंदीहूकूम वापरण्याची विनंती अर्ज करु शकते. अशावेळी संबंधित खटल्यात, तो खटला चालविण्याचा अधिकार कनिष्ठ न्यायालयाला नाही, असे वरिष्ठ न्यायालयाला आढळून आल्यास कनिष्ठ न्यायालयाला खटल्याची सूनावणी स्थगित करुन आपल्या अधिकार क्षेत्राचे उल्लंघन न करण्याचा आदेश देऊ शकते. कनिष्ठ न्यायालयाने आपल्या कार्यकक्षा ओलांडण्यास प्रतिबंध करणे, हा प्रतिबंधाचा उद्देश असतो.

४. *अधिकार पृच्छा किंवा क्वाधिकार (Quo Warrnto)*

कोणतेही सरकारी अगर सार्वजनिक पद, पात्रता नसतांनाही एखाद्याने धारण केलेले असेल आणि त्यामुळे एखाद्या व्यक्तीवर अन्याय होत असेल तर, संबंधीत अन्याय झालेली व्यक्ती न्यायालयाकडे अर्ज करु श्कते. अशावेळी अर्जदार व्यक्तीचा त्या पदाशी हितसंबंध असला पाहिजे आणि ते पद कायमस्वरुपी असून ते पद धारण करण्याऱ्या व्यक्तीला कोणत्याही मर्जीनुसार काढून टाकता येत नसले पाहिजे. असा अर्ज मंजूर करुन ती व्यक्ती त्या पदाला अपात्र अहे असे दिसून आले तर "आपण कोणत्या कायद्यानुसार या अधिकारपदावर आहात" अशी अधिकार पृच्छा न्यायालय त्या पदधारी व्यक्तीला करते. म्हणजेच एखादी कृती कोणत्या अधिकाराखाली केली आहे अशी विचारणा न्यायालयाने करणे म्हणजे अधिकार पृच्छा होय. खाजगी व्यक्ती किंवा संस्था, न्यायाधीश, विधिमंडळ सभापती, मंत्री, स्थानिक स्वराज्य संस्थेचे अधिकारी इत्यादीच्या बाबतीत अधिकार पृच्छेचा अर्ज करता येत नाही.

५. *प्राकर्षण किंवा उत्प्रेषण (Certiorari)*

कनिष्ठ न्यायालयाकडे चालविला जाणारा खटला हा वरिष्ठ न्यायालयाकडे चालविला जावा. अशी विनंती करणारा अर्ज म्हणजे प्राकर्षण किंवा उत्प्रेषण होय. एखादा खटला कनिष्ठ न्यायालयाच्या अधिकार क्षेत्राबाहेरचा आहे असे वरिष्ठ न्यायालयाच्या निर्देशनास आल्यास संबंधित खटल्याचे कामकाज बंद करुन तो सर्व खटला वरिष्ठ न्यायालयाकडे वर्ग करावा असा आदेश किंवा आज्ञा वरिष्ठ न्यायालय देते. कनिष्ठ न्यायालयाकडून आलेल्या कागदपत्र व पुराव्याच्या आधारे वरिष्ठ न्यायालय या खटल्याचा निर्णय देऊ शकते. खटला अधिकार क्षेत्राबाहेरचा आहे किंवा कनिष्ठ न्यायालय खटला चालविण्यास असमर्थ आहे असे आढळून आले तर वरिष्ठ न्यायालय, न्यायालयीन कामकाज जलदगतीने होण्यासाठी वरिष्ठ न्यायालय उत्प्रेषणाचा आदेश काढते.

mynotes.in

६. *प्राधिलेख (Writs)*

या अधिकाराद्वारे योग्य ते निर्देश वा अदेश काढण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयांना देण्यात आला आहे.

संविधान कलम ३२ नुसार दिलेला घटनात्मक उपाययोजनेचा हक्क म्हणजे मूलभूत हक्कांना दिलेले सुरक्षा कवच होय अणि त्यांचा समावेश मूलभूत हक्कांमध्ये करण्यात आलेला असल्यामुळे घटनादुरुस्ती करुनच ती काढता किंवा बदलता येवू शकतात. आणीबाणीच्या काळात मात्र ही संरक्षणे नाकारली जावू शकतात. जून १९७५ मध्ये लागू करण्यात आलेल्या आणीबाणीत बंदी प्रत्यक्षीकरणाचा आदेश काढण्याचा न्यायालयाचा हक्क निलंबीत करण्यात आला होता. लोकशाहीचा प्राण असलेला बंदीप्रत्यक्षीकरणाचा आदेश काढण्याविषयीचा न्यायालयांचा आदेश काएण्याचा अधिकार कोणत्याही राज्यकर्त्यांना, कोणत्याही कारणास्तव रद्द ठरवता येवू नये, अशी स्पष्ट तरतूद घटनेत ४४ व्या घटनादुरुस्तीद्वारे करण्यात आली. अनु.२० व अनु.२१ यांना अनु.३५९ खालील आणीबाणीतही निलंबित ठरवले जाऊ शकणार नाही अशी तरतूद घटनेत या दुरुस्तीने केली. एकूणच घटनेचे ३२वे कलम हे सर्व मूलभूत हक्काचे संरक्षण करण्याच्याबाबतीत निर्णायक ठरणारे असे कलम आहे. मूलभूत हक्काचा अतिरेक झाल्यास राज्यकारभारातील स्थर्य तसेच सामाजिक स्वास्थाला धक्का पोहोचतो. त्यामुळे हक्कांवर वाजवी बंधने घालण्याचा अधिकार राज्यसत्तेला असला पाहिजे. मात्र राज्यसत्तेने आणलेली बंधने ही घटनासंगत व कायदेशीर आहेत की नाही हे तपासने आणि ती मूलभूत हक्कांना बाधा आणणारे असतील तर त्याला चाप लावण्याचा अधिकार न्यायालयाला या ३२व्या कलमाद्वारे मिळालेला आहे.

२.२ राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वे (Directive Principles of State Policy)

देशातील सर्व नागरिकांना मूलभूत हक्क उपभोगायला मिळायचे असेल तर त्यासाठी देशात सामाजिक-आर्थिक परिस्थिती अनुकूल असणे आवश्यक असते. अशी परिस्थिती आज सर्वांना उपलब्ध नाही याची जाणीव संविधान कर्त्यांना होती. सामाजिक व आर्थिक परिस्थिती आणखी अनुकूल करण्यासाठी आणखी काही हक्कांचा मूलभूत हक्क देण्याची गरज संविधानकर्त्यांना वाटत होती. पण हे सर्व हक्क मिळतील अशी परिस्थिती त्याकाळी देशाची नव्हती. आर्थिक संसाधनाची कमतरता किंवा परिस्थिती अनुकूल नसली तरी, त्यादिशेने जाण्याचा प्रयत्न मात्र व्हायला हवा. म्हणून भविष्यात जेव्हा भारताची आर्थिक व सामाजिक परिस्थिती असे हक्क देण्याच्या बाबतीत अनुकूल होईल तेव्हा कोणत्या हक्कांचा प्राधान्याने विचार व्हावा याचे मार्गदर्शन तसेच भारत हे कल्याणकारी राज्य व्हावे. इथली राजकीय लोकशाही आर्थिक व सामाजिक लोकशाहीत रुपांतरित व्हावी यासाठी राज्याने कोणती ध्येय-धोरणे अंमलात आणण्याचा प्रयत्न करायला हवा याचे मार्गदर्शन नितीनिर्देशक तत्वे या मथळ्याखाली केले गेले आहे.

भारतीय राज्यघटनेच्या भाग-४ मध्ये कलम ३६ पासून ते ५१ पर्यंतच्या कलमात राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वे केली आहे. नावाप्रमाणेच ही तत्वे राज्यकारभाराची धुरा ज्यांच्या खांद्यावर आहे त्यांना मार्गदर्शन करणारी आहे. मार्गदर्शक तत्वे राज्यकर्त्यांनी राज्यकारभार करतांना कोणती सामाजिक आर्थिक, प्रशासकीय आणि परराष्ट्रसंबंधविषयी तत्वाची अंमलबजावणी करावी याचे दिशानिर्देश करते. उपलब्ध संसाधनाचा काळजीपूर्वक वापर करुन समाजातील सर्व घटकांचा संतूलित विकास घडून येईल आणि त्याद्वारे सामाजिक-आर्थिक न्याय प्रस्थापित होऊन राजकीय लोकशाही

सामाजिक-आर्थिक लोकशाहीत रुपांतरीत होईल या पद्धतीने राज्यकारभार सांभाळतांना मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी राज्यकर्त्यांना करायची अपेक्षा संविधानकर्त्यांनी केली आहे.

मार्गदर्शक तत्वांची वैशिष्ट्ये

मार्गदर्शक तत्वांची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील

१. मार्गदर्शक तत्वांचा उद्देश कल्याणकारी राज्याला प्रोत्साहन देणे हा आहे. समता, स्वातंत्र्य, बंधूत्व आणि न्याय ही संविधानाने स्विकृत केलेली मूल्ये प्रत्यक्षात अंमलात आणण्यासाठी मार्गदर्शक तत्वांची निर्मिती केली गेली आहे.

२. निकोप समाजवृद्धीसाठी तसेच समाजाच्या सर्वांगीण प्रगतिसाठी ही तत्वे मूलभूत आहेत. धोरण किंवा कायदे बनवितांना राज्यांनी ही तत्वे लक्षात ठेवावी अशी अपेक्षा आहे.

३. मार्गदर्शक तत्वांचे खास वैशिष्ट्य म्हणजे, ही तत्वे न्यायालयीन निर्णययोग्य नाहीत. याचा अर्थ त्याच्या उल्लंघनाबद्दल न्यायालयात दाद मागता येत नाही. त्यामुळे सरकारला त्यांची अंमलबजावणी करण्यास भागही पाडले जाऊ शकत नाही.

४. ही तत्वे कोणत्याही विचारसरणीचा पक्ष सत्तेवर आला तरी त्याला मार्गदर्शक ठरु शकतील अशी आहेत. राज्यकर्त्यांनी धोरण ठरवितांना किंवा कायदे करतांना ही तत्वे मूलभूत मानून चालावे अशी संविधानकर्त्यांची अपेक्षा आहे. त्यामुळे न्यायालयीन निर्णययोग्य नसलेल्या ४थ्या भागत ती समाविष्ट असली तरी त्यांचे महत्व संविधानाच्या अन्य कलमांपेक्षा थोडेही कमी नाही अशी त्यांची भूमिका होती.

मार्गदर्शक तत्वांचे वर्गीकरण किंवा प्रकार

संविधानाच्या कलम ३७ ते ५१ या कलमांमध्ये मार्गदर्शक तत्वे दिलेली आहेत. या तत्वांचे वर्गीकरण संविधानात केलेले नाही. मात्र ढोबळ मानाने या तत्वांचे आर्थिक, सामाजिक, राजयकीय, न्यायालयीन, परराष्ट्रसंबंध विषयक अशा प्रकारात केले जाते किंवा समाजवादी, गांधीवादी, उदारमतवादी असेही वर्गीकरण केले जाते. ध्येय प्राप्तीच्या दृष्टिने मार्गदर्शक तत्वांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे.

१) ***आर्थिक तत्वे:*** संविधानाया कलम ३९, ४१, ४२, ४३, ४३(क), ४८, ४८(क) मध्ये आर्थिक उद्दिष्ट्ये गाठण्याच्या दृष्टिने मार्गदर्शक तत्वे दिलेली आहेत. ही कलमे व त्यातील तरतूदी पुढीलप्रमाणे.

   १. कलम ३९ राज्य पुढील गोष्टी साध्य करण्याचे धोरण आखिल.

      क) उपजीविका पुरेसे साधन मिळण्याचा हक्क स्त्री व पुरुष यांना सारखाच असावा.

      ख) सामूहिक हिताला उपकारक होइल असे भौतिक संसाधनाचे स्वामित्व व नियंत्रण यांची विभागणी व्हावी.

      ग) आर्थिक यंत्रणा राबवितांना संपत्ती व उत्पादन साधने सामूहिक हितास बाधक होईल असे एकाच ठिकाणी केंद्रीत होऊ नये.

      घ) पुरुष व स्त्रिया या दोघांनाही समान कामासाठी समान वेतन मिळावे.

      ङ) स्त्री व पुरुष यांचे आरोग्य व ताकद किंवा शक्ती बघूनच काम द्यावे. नागरिकांचा आर्थिक गरजेपोटी त्यांचे वय, ताकद यास न पेलनाऱ्या व्यवसायात किंवा काम करण्यास भाग पाडू नये. बालकांच्या कोवळ्या वयाचा दुरुपयोग करुन घेऊ नये.

      च) बालकांना मुक्त वातावरणात आपला विकास करण्याची संधी व सुविधा दिल्या जाव्यात.

munotes.in

२. कलम ४१ नुसार सर्व नागरिकांना पुरेसे काम, शिक्षण मिळावयास हवे, बेकारी, म्हातारपण, आजार व विकलांगना आली असल्यास त्यांना सामाजिक मदत मिळेल अशी व्यवस्था राज्य करेल.

३. कलम ४२ नुसार राज्य हे कामाबाबत न्याय व मानवीय

४. परिस्थिती निर्माण करण्यासाठी व महिलांना प्रसूतिविषयक सहाय्यासाठी तरतूद करील. कलम ४३ नुसार राज्य कायदा करुन किंवा आर्थिक रचना करुन शेती, उद्योग धंदे किंवा इतर क्षेत्रांतील कामगारांना काम, निर्वाह वेतन, योग्य जीवनमान आणि फूरसतीचा वेळ, सामाजिक व सांस्कृतिक संधीच्या पूर्ण उपयोग याची श्स्वती देणारी अशी कामि परिस्थिती उपलब्ध करुन देण्यासाठी आणि विशेषत: वैयक्तिक किंवा सहकारी ग्रामीण भागत कूटीरउद्योगाचे संवर्धन करण्यासाठी प्रयत्नशील राहील.

५. कलम ४३(क) नुसार उद्योगधंद्याच्या व्यवस्थापनात कामगारांना सहभागी होता यावे याकरिता राज्य योग्य ते कायदे करील किंवा इतर उपाययोजना करील.कलम ४८ नुसार आधुनिक व शास्त्रीय रीतीने शेती व पशुसंवर्धन यांची व्यवस्था लावण्यासाठी राज्य प्रयत्न करेल आणि दुभत्या गाई, चांगली जनावरे यांचे जतन करुन त्यांच्यात सुधारणा करणे आणि त्यांच्या कत्तलीस बंदी घालणे यासाठी सरकार सर्वतोपरी उपाययोजना करील.

६. कलम ४८(क) नुसार देशाचे पर्यावरण सुरक्षित ठेवणे व त्यात वने व वन्य जीवसृष्टी यांची रक्षण करण्यासाठी प्रयत्नशील राहणे.

२) सामाजिक तत्वे

समाजात सामाजिक न्याय प्रस्थापित व्हावा यासाठी सामाजिक स्वरुपाची नीतिनिर्देशक तत्वे कलम ४५, ४६, ४७ व ४९ मध्ये स्पष्ट केलेली आहेत.

१. कलम ४५ नुसार राज्य सर्व बालकांसाठी त्यांच्या वयाची सहा वर्षे पूर्ण होईपर्यंत, प्रारंभिक बाल्यावस्थेतील देखभाल मान्य शिक्षण यांची तरतूद करण्याचा प्रयत्न करील.

२. कलम ४६ नुसार, राज्य समाजातील दुर्बल घटक मान्य विशेषत: अनुसूचित जाती व जनजाती यांच्या शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धनाची काळजी घेईल आणि सामाजिक अन्याय व सर्व प्रकारचे शोषण यांपासून त्यांचे रक्षण करील.

३. कलम ४७ नुसार, आपल्या जनतेचे पोषणमान व राहणीमान उंचाविणे आणि सार्वजनिक आरोग्य सुधारणे या गोष्टी राज्य आपल्या प्राथमिक कर्तव्यापैकी असल्याचे मानील आणि मादक पेय व आरोग्यास अपायकारक अशी अंमली द्रव्ये यांचे औषधीय कारणाखेरीज सेवन करण्यावर बंदी आणण्यासाठी राज्य प्रयत्नशील राहील.

४. कलम ४९ नुसार, संसदेने कायदा करुन राष्ट्रीय महत्वाचे म्हणून घोषीत केलेले कला व ऐतहासिक दृष्ट्या महत्वाचे स्मारक, स्थान, वस्तू यांचे लूट, विद्रूपण, नाश, विल्हेवाट किंवा निर्यात यांपासून संरक्षण करणे ही राज्याची जबाबदारी असेल.

३) राजकीय तत्वे

सर्व भारतीयांना राजकारणात सहभागाची संधी मिळावी यासाठी काही राजकीय स्वरुपाची मार्गदर्शक तत्वे कलम ४० व ५० मध्ये दिलेली आहेत.

munotes.in

१. कलम ४० नुसार, राज्य हे ग्रामपंचायत संघटित करण्यासाठी यात दाद मागता येऊ शकत नाही. त्यामुळे मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावाणी करणे हे राज्यावरील किंवा शासनावरील केवळ नैतिक बंधन आहे. याउलट मूलभूत हक्क हे न्यायालयीन विषय योग्य आहे मूलभूत हक्काचे संरक्षक म्हणून सर्वोच्च न्यायानय काम करते.

यामूळेच मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्वे यातील संबंध तणावपूर्ण बनलेले आहेत. अनेकदा संसदेने विशिष्ट मार्गदर्शक तत्वांच्या अंमलबजावणीसाठी कायदे केले. हे कायदे सामान्य लोकांच्या कल्याणाचे असले तरी, त्यामुळे काही व्यक्तीच्या मूलभूत हक्कांना धक्का पोहचतो. अशा प्रसंगी सुरुवातीच्या काळात न्यायालयाने मागदर्शक तत्वांपेक्षा मूलभूत हक्कांना महत्व दिले. चंपकम दोराईराजन खटला, १९५१ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने जाहीर केले की, मुलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्वांमध्ये संघर्ष झाल्यास मूलभूत हक्कांना प्राधान्य द्यावे लागेल. जमीनदारी निर्मूलनाचे अनेक कायदे याच भूमिकेतून न्यायालयांनी रद्द ठरविले. त्यातून मार्ग काढण्यासाठी संसदेने घटनेत पहिली घटनादुरुस्ती केली (१९५१) त्यानंतर पुढे १९७८ मध्ये संविधानात ४४वीं घटनादुरुस्ती करुन मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी करतांना मूलभूत हक्कांच्या (कलम-१४ किंवा कलम १९) विसंगत आहे म्हणून तो न्यायालयाला रद्द करता येणार नाही, अशी तरतूद केली.

तत्पूर्वी १९६७ साली गोलखनाथ खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने जाहीर केले की, मार्गदर्शक तत्वांच्या अंमलबजावणीसाठी संसद कोणतेही मूलभूत हक्क बदलू किंवा काढू शकत नाही. पंतप्रधान इंदिरागांधींनी बँकाचे राष्ट्रीयकरण करण्याचा निर्णय घेतला हा निर्णय संपत्तीचा हक्क भंग करणारा आहे अशी भूमिका घेतली. यावेळी केशवानंद भारती विरुद्ध केरळ राज्य खटला १९७३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने संविधानाची मूलभूत चौकट निर्धारीत केली.

इंदिरा गांधींच्या संपूर्ण कारकर्दीत मार्गदर्शक तत्वे आणि मूलभूत हक्क यामध्ये एक अंर्तविरोध निर्माण करण्यात आला. मूलभूत हक्कांचे समर्थन करणारे हे प्रतिगामी आम जैसे थे वादी आहेत, तर मार्गदर्शक तत्वांचे समर्थन करणारे पुरोगामी, समाजवादी व परिवर्तनवादी पुढाकार घेईल व त्यांना लोकशाहीचा मूलभूत घटक म्हणून कार्य करण्यास समर्थ करण्यासाठी आवश्यक असतील असे अधिकार बहाल करील.

२. कलम ५० नुसार, राज्य न्यायव्यवस्था व कार्यकारी व्यवस्था हे परस्परांपासून अलग ठेवण्याकरिता उपाययोजना करील.

४) न्यायालयीन तत्वे

संविधानाच्या कलम ३९(क) आणि ४४ मध्ये न्यायालयीन तत्वे सांगितलेली आहेते.

१. कलम ३९(क) नुसार राज्य, कायद्याची अंमलबजावणी करतांना समान संधीच्या तत्वावर न्यायाची अभिवृद्धी होईल याची निश्चिती करील. विशेषत: आर्थिक किंवा अन्य दुर्बलतेमुळे कोणत्याही नागरिकाला देण्यासाठी अनुरुप कायद्याद्वारे किंवा योजनांद्वारे वा अन्य मार्गाने कायदेविषयक सहाय्य मोफत उपलब्ध करुन देईल.

२. कलम ४४ नुसार, भारताच्या सर्व नागरिकांना सर्वत्र एकसारखा नागरी कायदा म्हणजेच समान नागरी कायदा लागू होईल यासाठी राज्य प्रयत्न करील.

५) परराष्ट्रसंबंधविषयक तत्वे

संविधानाच्या कलम ५१ मध्ये परराष्ट्र संबंध, अंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा या संबंधीची मार्गदर्शक तत्वे सांगितली आहेत.

mynotes.in

कलम ५१ नुसार, राज्य हे

क) आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा यांचे संवर्धन करण्यासाठी

ख) राष्ट्राराष्ट्रांमध्ये न्यायसंगत व सन्मानपूर्वक संबंध राखण्यासाठी

ग) नागरिकांच्या आपसांतील व्यवहारांमध्ये आंतरराष्ट्रीय कायदा व तहांची आंबंधने याबद्दल आदरभावना जोपासण्यासाठी.

घ) आंतरराष्ट्रीय तंटे लवादाद्वारे मिटविण्यास प्रोत्साहन देण्यासाठी, प्रयत्नशील राहील.

२.३ मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्वे यातील संबंध

मागदर्शक तत्वे ही न्याययोग्य नाहीत, म्हणजे या तत्वांची अंमलबजावणी केली नाही म्हणून शासनाविरुद्ध न्यायालय आहेत, असा युक्तिवाद उभा करण्यात आला. मूलभूत हक्क हे बहुसंख्य सामान्य जनतेला उपकारक ठरु शकणाऱ्या मार्गदर्शक तत्वांच्या आड येतात अशी भूमिका घेऊन तत्कालीन राज्यकर्त्यांनी मागर्दर्शक तत्वांना मूलभूत हक्कांपेक्षा श्रेष्ठ ठरविण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी संविधानात ४२वी घटनादुरुस्ती (१९७६) आणि ४४ (१९७८) अशा दोन घटनादुरुस्त्या करुन ३१(ग) कलम अंतर्भूत करुन मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी करणारा कोणताही कायदा हा कलम १४, कलम १९ यांनी प्रदान केलेल्या कोणत्याही हक्कांशी विसंगत असला तरी न्यायालयाला तो रद्द करण्याचा अधिकार असणार नाही, अशी व्यवस्था केली.

थोडक्यात मार्गदर्शक तत्वे ही सामान्या लोकांच्या कल्याणासाठी असल्यामुळे आ?णि त्याची अंमलबजावणी केल्याने बहुसंख्य लोकांच्या जीवनमानात बदल घडून येत असल्यामुळे जनतेचे प्र?तिनिधित्व करणाऱ्या संसदेने मार्गदर्शक तत्वांचया अंमलबजावणीवर भर देणे सहाजिक होते. तसे केल्याने राज्यकर्त्यांना निवडणूकीच्या राजकारणात फायदा सुद्धा होणार होता. याउलट मूलभूत हक्कांना व्यक्तिवादी ठरवून ते समाजातील मूठभर लोकांचे कल्याण करणारे आहेत, असे वातावरण निर्माण झाले. या प्रसंगी न्यायालयाने सुद्धा तटस्थ भूमिका घेतली नाही. कधी न्यायालयाने संस्थानिक, जमिनदार, सावकार व भांडवलदार यांच्या हिताची काळजी घेणारी मूलभूत हक्क रक्षणाची कडक भूमिका घेतली, तर कधी (इंदिरागांधी यांच्या काळात) राज्यकर्त्यांच्या दबावाखाली राहून न्यायालयाच्या अधिकर क्षेत्र मर्यादीत करणारी ४२ व ४४ वी घटनादुरुस्ती मान्य केली.

मात्र पुढील काळात परिस्थितीत पुष्कळ बदल झाला. न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वांविषयीचा दृष्टिकोनात बदल झाला. सर्वोच्च न्यायालयाने काही खटल्यांचा निर्णय देतांना तर राज्य सत्तेने मार्गदर्शक तत्वांकडे दुर्लक्ष केल्याचा ठपकाही ठेवला. उदा. १९८६ च्या शहाबानो खटल्यात तसेच १९९५ च्या आणखी एका खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने समान नागरी कायदा करण्यात राज्यकर्त्यांनी चालढकल करु नये असा इशारा दिला होता.

मूलत: संविधानकर्त्यांनी घटनेत मार्गदर्शक तत्वांची आखणी करतांना ही तत्वे मूलभूत हक्कांपेक्षा कमी किंवा जास्त महत्वाची अशी भूमिका नव्हती. तत्कालीन सामाजिक-आर्थिक परिस्थितीमूळे जे हक्क मूलभूत हक्क म्हणून अंमलात आणणे शक्य ते हक्क त्यांनी मार्गदर्शक तत्वांच्या यादीत टाकले. काही सकारात्मक स्वरुपाचे हक्क मात्र तात्काळ देणे राज्यव्यवस्थेला शक्य होते. म्हणून ते मूलभूत हक्काच्या यादीत टाकले. त्यामुळे मूलभूत आणि मार्गदर्शक तत्वे असे राज्यकारभाराच्या सोयीसाठी केलेले विभाजन होते. त्यात कमी महत्वाचे - जास्त महत्वाचे असा भाग नव्हता.

muhnotes.in

मार्गदर्शक तत्वांची उपयुक्तता / महत्त्व

भारतीय संविधानातील मार्गदर्शक तत्व ही देशाच्या सर्वांगीण विकासाचा मार्ग दाखविणारा एक दिपस्तंभ आहे. भारतात राजकीय लोकशाहीचे सामाजिक-आर्थिक लोकशाहीत रुपांतरण करण्याचा तो एक राजमार्ग आहे. त्यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मार्गदर्शक तत्वांचे महत्त्व अधोरेखित करतांना म्हटले होते की, ''मार्गदर्शक तत्वांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. कारण ती हे सुनिश्चित करतात, की भारतीय राज्यसंस्थेचे ध्येय 'आर्थिक लोकशाही' आहे आणि निव्वळ राजकीय लोकशाही पेक्षा हे वेगळे आहे''. भारताचे माजी सरन्यायाधीश न्या. एस. सी. छागला म्हणाले होते की, ''जर ही तत्त्वे पूर्णपणे अंमलात आणली तर आपला देश पृथ्वीवरील स्वर्ग बनेल''.

मार्गदर्शक तत्त्वांचे महत्त्व किंवा उपयुक्तता पुढील मूद्दावरुन स्पष्ट करता येईल.

१. मार्गदर्शक तत्वांनी देशाच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय उद्दिष्टांची मुळ संरचना निर्धारीत केली आहे. ही तत्वे राज्यकर्त्यांना राज्यकारभारासंबंधी दिशा-निर्देश करते, त्यामुळे ती सरकारचा मित्र, मार्गदर्शक आणि तत्वज्ञ म्हणून कार्य करते.

२. मार्गदर्शक तत्वांत समाजवादी, गांधीवादी, उदामतवादी, आंतरराष्ट्रीय शांतता इत्यादी सर्वसमावेशक तत्वांचा अंतर्भाव केला आहे. त्यांच्या अंमलबजावणीतून भारत एक कल्याणकारी राज्य तर बनु शकतेच पण त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय सहकार्य व सद्भावना उत्पन्न करणारे एक आदर्श राज्य बनु शकते.

३. ही तत्वे जलि किंवा गूंतागूंतीच्या परिस्थितीत कायद्याचा अर्थ लावण्यात न्यायालयांना मदत करतात.

४. निवडणूकीच्या प्रक्रियेतून देशात कूठली पक्ष सत्तेवर येवू शकतो. सरकार कोणत्याही पक्षाचे असो त्या सरकारच्या धोरणांना स्थर्य प्रदान करण्याचे कार्य मार्गदर्शक तत्वे करतात.

५. मार्गदर्शक तत्वे शासनाची कामगिरी मोजण्याचा एक मापदंड म्हणून काम करते. सरकारने मार्गदर्शक तत्वांची कितपत अंमलबजावणी केली यावरुन त्या सरकारचे मूल्यमापण जनतेला करता येते.

६. जर सत्ताधारी पक्ष मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी करण्यास मागे पडला, तर ही तत्वे त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी विरोधी पक्षाला उपयोगी पडतात. याउलट सत्ताधारी पक्ष आपण मार्गदर्दाक तत्वांची अंमलबजावणी कशी चांगली केली हे जनतेला पटवून देऊन विरोधी पक्षावर मात करू शकतो.

मार्गदर्शक तत्तवांवरील टीका/आक्षेप

१. मार्गदर्शक तत्वांवर मुख्य टीका ही केली जाते की, ही तत्वे अंमलबजावणी योग्य नाहीत. त्यामुळे कायद्याच्या दृष्टिने त्यांचे मूल्य शून्य आहे. कायदेशीर दृष्ट्या शासनाला या तत्वांची अंमलबजावणी बंधनकारक नाही. म्हणजेच या तत्वांची अंमलबजावणी सरकारने केली नाही म्हणून नागरिक न्यायालयाकडे दाद मागू शकत नाही.

२. दुसरी टीका अशी की, मार्गदर्शक तत्तवांची तरतूद निरर्थक आहे. कायद्याचे स्वरुप नसलेला एखादा भाग संविधानाता घालणे व त्याच्या अंमलबजावणीची व्यवस्था नसणे किंवा ते राज्यकर्त्यांच्या विवेकबुद्धीवर निर्भर ठेवणे हे तर्कसंगत नाही.

munotes.in

३. कोणतीही राजकीय विचार प्रणाली असलेल्या पक्षाला ही तत्त्वे अंमलात आणता यावीत असा संविधानकर्त्यांचा हेतू असल्यामुळे त्यांनी या तत्वांना काटेकोर स्वरुप देणे टाळले आहे. त्यामुळे जुन्या सनातन धारणांची नव्या आधुनिक धारणांनी सरमिसळ झालेली दिसून येते.

४. केवळ संविधानकर्त्यांचा आदर्शवादच स्मृतीरुपाने या मार्गदर्शक तत्वांच्या भागात आढळतो असे काही टीकाकारांना वाटते.

५. ही तत्वे हिकमती राज्यकर्त्यांना निवडणूकांमध्ये आश्वासने देण्यासाठी म्हणून कामाची आहेत. किमान गरजा भागविण्यासाठी रोजगाराची हमी, शिक्षणाचा अधिकार, समान नागरी कायदा अशा महत्त्वाच्या तत्वांची अंमलबजावणी फारच असमाधानकारक झालेले दिसते.

६. के. टी. शहा. म्हणतात, ''मागदर्शक तत्वे म्हणजे एक असा धनादेश (Cheque) आहे की, तो विटविता यायचा की नाही हे बँकेच्या ऐपतीवर अवलंबून आहे''.

अशाप्रकारे मार्गदर्शक तत्वांवर टीका केली जात असली आणि सर्व टीकांमध्ये तथ्यांश असला तरी, त्यामुळे मार्गदर्शक तत्वांचे महत्त्व कमी होत नाही. ही तत्वे भारतीय लोकशाहीच्या कल्याणकारी - समाजवादी राज्याच्या प्रस्थापनेसाठी आधारभूत ठरणारी आहेत. जे लोक आजही वंचिताचे - अभावाचे जीवन जगतात त्यांच्या मनात आशेचा किरण जागत ठेवरणारी आहे. म्हणून भारतीय लोकशाहीचे भवितव्य काय राहीत हे या तत्वांची अंमलबजावणी राज्यकर्ते कसे करतात यावर अवलंबून आहे हे निश्चित.

२.४ आपली प्रगती तपासा - प्रश्न

१) मूलभूत हक्काचे महत्व विशद करा.

२) समतेचा हक्क स्पष्ट करा.

३) स्वातंत्र्यांचा हक्काची चर्चा करा.

४) घटनात्मक उपाय योजनांचा अधिकाराची चर्चा करा.

५) राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे विशद करा.

२.५ संदर्भ करा

१. भारताचे संविधान; संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन भारत सरकारच्या वतीने मुद्रीत व प्रकाशित केले-२००६ पृ.११

२. देशमुख अलका: भारतीय शासन आणि राजकारण; श्री साईनाथ प्रकाशन नागपूर; २००९ पृ.६६

३. मेत्कली प्रविणकुमार; भारताची राज्यघटना, व्यावसायिक नीतिमूल्ये आणि मानवी हक्क ---------- प्रकाशन, नवी दिल्ली २०१७ पृ.२८

४. भोळे भा.ल.; भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण; पिंपळापूरे प्रकाशन दृ नागपूर-२०१० पृ.११०

५. डॉ. वा. भ. पाटील, भारतीय राज्यघटना, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगांव, जून २०१२.

❖❖❖❖

munotes.in

कायदेमंडळ व न्यायमंडळ

प्रकरणाची रचना –

उद्दिष्टे

प्रस्तावना

३.१. संसद

३.२ न्यायालयिन प्रणाली

न्यायमंडळाचे प्रारंभिक अधिकार क्षेत्र

प्राधिलेख अधिकार क्षेत्र

३.३. न्यायालयिन सक्रियता

३.४ सारांश

३.५ आपली प्रगती तपासा – प्रश्न

३.६ संदर्भसूची

उद्दिष्टे

भारतीय संसदेची रचना अधिकार आणि कार्य समजून घेणे त्याचबरोबर न्यायालयीन रचना अधिकार, कार्य आणि न्यायालयीन सक्रियता समजून घेणे.

प्रस्तावना

भारतात प्रतिनिधिक संस्थांची स्थापना १८८१ मध्ये करण्यात आली व क्रमाकमाने त्यांना अधिकाधिक प्रतिनिधिक स्वरुप बहाल करण्यात आले. १९३५ च्या भारत सरकार कायदयाद्वारे भारतात जवळपास लोकाभिमुख कायदयाची स्थापना करण्यात आली. कायदेमंडळाच्या पध्दतीची सुरुवात तत्पूर्वी म्हणजेच १९१९ च्या कायदयानूसार करण्यात आली. १९४६ मध्ये स्थापन करण्यात आलेल्या घटना परिषदेस १९४७ च्या भारत स्वातंत्र कायदयाप्रमाणे हंगामी मध्यवर्ती कायदे मंडळाची अतिरिक्त जबाबदारी सोपवण्यात आली. संसदेची स्थापना १९५२ मध्ये होईपर्यंत घटना परिषदेने मध्यवर्ती कायदेमंडळाची जबाबदारी पार पाडली.

३.१ संसद – संसदेची रचना

राज्यघटनेच्या कलम ७९ प्रमाणे संसदेची द्विगृही रचना करण्यात आली आहे. या दोन गृहांचे अनुक्रमे लोकसभा (House of People) व राज्यसभा (Council of States) असे नामकरण करण्यात आले आहे. लोकसभा भारतीय जनतेचे तर राज्यसभा घटकराज्यांचे प्रतिनिधित्व करते. या दोन गृहाव्यतिरिक्त भारताचे राष्ट्रपती संसदेचा अविभाज्य घटक आहेत. वैधानिक प्रस्तावास विधिनियमाचे स्वरुप देण्याकरीता संसदेच्या दोन गृहांची मान्यता व राष्ट्रपतींची संमती आवश्यक आहे. राष्ट्रपती संसदेच्या कोणत्याही सभागृहाचा सभासद नसला तरी त्यास राज्यप्रमुख या नात्याने व्यापक कायदेविषयक अधिकार देण्यात आले आहेत. संसदेच्या दोन गृहांची रचना करताना प्रत्येक

munotes.in

गृहास स्वत:चा असा विशिष्ट कार्यभाग सोपाविण्यात आला आहे. त्यामुळे प्रत्येक गृह आपापल्यापरीने श्रेष्ठ आहे. मात्र अंतिमता जनतेच्या प्रतिनिधिक गृहाचे (लोकसभेचे) श्रेष्ठत्व प्रस्थापित करण्यात आले आहे.

लोकसभा

लोकसभा प्रथम किंवा कनिष्ठ सभागृह आहे. राज्यघटनेच्या कलम ८१ प्रमाणे जास्तीत जास्त ५०० ठरविण्यात आली होती. १९५६ मध्ये ती वाढवून ५२० करण्यात आली. १९६२ मध्ये चौदाव्या दुरुस्तीने ती संस्था ५२५ झाली. १९७३ च्या ३१ व्या घटना दुरुस्तीने लोकसभेची सदस्य संख्या जास्तीत जास्त ५५० असेल आणि यात घटकराज्यांचे जास्तीत जास्त ५३० सदस्य व केंद्रशासित प्रदेशांचे जास्तीत जास्त २० सदस्य असतील अशी तरतूद करण्यात आली. दर १० वर्षानी घेण्यात येणाऱ्या खानेसुमारीनंतर (जनगणनेनंतर) सदस्य संख्या बदलली जात असे. लोकसभेत आंग्ल इंडियन जमातीस पुरेसे प्रतिनिधित्व मिळाले नाही असे राष्ट्रपतिंचे मत असल्यास या जमातीचे जास्तीत जास्त दोन प्रतिनिधी नियुक्त करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना आहे. म्हणजेच लोकसभेची एकूण सदस्यसंख्या ५३०+२०+२ असे एकूण ५५२ पेक्षा अधिक असणार नाही. २ सभासद लोकसभेवर निवडले जातात. महाराष्ट्रातून लोकसभेवर ४८ सभासद निवडले जातात.

लोकसभेच्या सभासदांच्या पात्रता व अपात्रतेच्या अटी खालीलप्रमाणे आहेत.

अ. पात्रतेच्या अटी:

१. तो भारताचा नागरीक असावा

२. त्याचे वय २५ वषपिक्षा कमी नसावे

३. संसदेने वेळोवेळी लावलेल्या अटी पूर्ण कराव्या

४. राखीव जागेतून निवडणूक लढविणारा उमेदवार हा ज्या जाती जमातीसाठी ती जागा राखीव असेल तर त्याच जाती जमातीचा असला पाहीजे.

ब. अपात्रेच्या अटी:

केंद्र किंवा राज्य सरकार यातील आर्थिक प्राप्ती होणाऱ्या पदावर तो नसावा. मंत्र्यांना सरकारी नोकर किंवा सरकार कडून आर्थिक लाभ घेणारे समजले जात नाहीत.

१. तो वेडसर आणि दिवाळखोर नसावा.

२. न्यायालयाने अपात्र ठरविलेल्या, संसदेने अपात्र ठरविलेल्या व्यक्तिस लोकसभेची निवडणूक लढविता येत नाही.

३. निवडणूक भ्रष्ट मार्गाचा अवलंब केल्याचे न्यायालयात सिध्द झाल्यास त्याला न्यायालयाचे आदेशानंतर ६ वर्षे निवडणूक लढविता येणार नाही.

४. तो परकिय असेल किंवा त्याने भारतीय नागरिकत्वाचा त्याग केला असेल तर त्यास निवडणूक लढविता येणार नाही.

लोकसभेचा कार्यकाल

लोकसभेचा कार्यकाल ५ वर्षे निश्चित असला तरी सभागृह मुदतीपूर्वी विसर्जित करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना असतो. सदस्यांनी केलेल्या पक्षांतरामुळे शासन अस्थिर झाले असल्यास किंवा मंत्री मंडळावर लोकसभेचा विश्वास राहीला नाही याची राष्ट्रपतींना खात्री पटल्यास ते लोकसभा विसर्जित करु शकतात. तसेच सामान्य परिस्थितीत पंतप्रधानांच्या सल्यानूसार राष्ट्रपती लोकसभा विसर्जित

munotes.in

करु शकतात. लोकसभा सदस्यांना, खासदारांना स्वइच्छेने राजीनामा देता येतो. १९८५ च्या ५२ व्या घटनादुरुस्तीनूसार पक्षांतराविरोधी कायदा अस्तित्वात आला त्यामुळे एखादयाने पक्षांतर केले तर त्याचे सभासदत्व/ खारदारकी रद्द होते. असे असेल तरी १/३ खासदांरांनी पक्षांतर केले तर ते पक्षांतर न मानता पक्षातील फुट असे मानले जाते.

राज्यसभा:

राज्यसभा हे संसदेचे दुसरे किंवा वरिष्ठ सभागृह आहे. घटकराज्यांना राज्यसभेत प्रतिनिधित्व देण्याची तरतूद असताना भारताच्या घटनाकारांनी अन्य संघराज्यात असलेली समान प्रतिनिधित्वाच्या तरतूदीचा स्विकार केलेला नाही. अमेरिकन कॉग्रेसच्या वरिष्ठ सभागृहात म्हणजेच सिनेटमध्ये ५० घटकराज्यांची प्रत्येकी दोन असे १०० सभासद आहेत. राज्यघटनेच्या कलम ८० प्रमाणे राज्यसभेची सदस्य संखा २५० पेक्षा अधिक असणार नाही. अशी तरतूद करयात आली आहे. या सभासदांपैकी १२ सभासदांची नियुक्ती करण्याचा अधिकार भारताच्या राष्ट्रपतीस देण्यात आला आहे. साहित्य, कला, शास्त्र, समाजसेवा इत्यादी क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या १२ सभासदांची नियुक्ती राष्ट्रपतीद्वारा मित्रमंडळाच्या सल्ल्यानुसार करण्यात येते. यामागची वैचारिक भूमिका म्हणजे या महनीय व्यक्ती पक्षीय राजकारणापासून अलिप्त असतात. आणि निवडनूकांच्या राजकारणात ते सहभागी होत नाहीत. त्यामुळे अशा महनीय व्यक्ती लोकसभेवर निवडणून येण्याची शक्यता अत्यल्प आहे. त्यामुळे या मान्वरांच्या ज्ञान व अनुभवाचा विधेयकासाठी फायदा होण्याकरीता त्यांची राज्यसभेवर सहा वर्षाच्या कालावधीकरीता नियुक्ती करण्यात येते. उर्वरीत जास्तीत जास्त २३८ सभासदांची निवड घटकराज्यांच्या आणि केंद्रशासीत प्रदेशांच्या विधिमंडळाद्वारा करण्यात येते. घटक राज्य व केंद्रशासित प्रदेशांच्यात करण्यात आलेल्या जागा वाटपाचा तपशील राज्यघटनेच्या चौथ्या परिशिष्टात देण्यात आला आहे. त्यानूसार उत्तर प्रदेशातून म्हणजे ३५ तर सिक्कीम, मिझोराम, गोवा, पोंदेचेरी इत्यादी लहान राज्ये व केंद्रशासीत प्रदेशातून पत्येक १ सभासद निवडला जातो. महाराष्ट्रातून १९ सभासद निवडले जातात.

निवडणूक पध्दती:

लोकसभेच्या सदस्यांची प्रत्यक्ष मतदारांकडून निवड होत असते. तर राज्यसभेचे सदस्य अप्रत्यक्षरीत्या निवडले जातात. मतदात्यांकडून राज्य व केंद्रशासित प्रदेशातील विधानसभेचे सदस्य निवडले जातात. प्रत्येक राज्य/ केंद्रशासित प्रदेशातील विधानसभा सदस्यांच्या निर्वाचक मंडळाकडून (Electoral college) राज्यसभेच्या सदस्यांची निवड करण्यात येते. राज्य विधानसभेचे राज्यपालद्वारा नियुक्त ॲग्लो इंडियन सदस्य आणि विधान परिषदेच्या सदस्यांचा निर्वाचन मंडळात समावेश नसतो. राज्यसभेच्या सदस्यांच्या निवडणूकीकरिता प्रमाणशिल प्रतिनिधित्वाच्या क्रमदेय मतदान पध्दतीचा (Proportional Representition by means of single transferable vote) अवलंब करण्यात येतो. थॉमस हेअर या ब्रिटिश गृहस्थाने ही संकल्पना १८५१ साली मांडली होती. आणि सूप्रसिध्द ब्रिटिश विचारवंत जॉन स्टुअर्ट मिल याने त्यास आपल्या प्रतिनिधिक शासन या ग्रंथात पाठिंबा दिला होता. प्रमाणशिर प्रतिनिधीत्वाच्या या पध्दतीची राज्यसभेच्या निवडणूकीच्या संदर्भात वैशिष्ट खालील प्रमाणे आहेत.

अ. बहुसदस्य मतदारसंघ:

क्रमदेय मतदान पध्दती उपयोगात आणण्याकरिता बहुसदस्य मतदार संघ आवश्यक आहेत. म्हणजेच एका मतदार संघातून एकापेक्षा अधिक सदस्य निवडले जावेत. राज्यसभेच्या द्वैववार्षिक निवडणुक महाराष्ट्रातून ६ किंवा ७ सदस्यांची निवड केली जात असते.

munotes.in

ब. एकच मतपत्र: पणक्रमाणे अनेक मते देता येतात.

निवडून दयावयाच्या प्रतिनिधीची संख्या जरी अधिक असली तरी प्रत्येक मतदाराला केवळ एकच मतपत्रिका दिली जाते. या मतपत्रिकेत उमेदवारांच्या नावासमोर आपला पसंतीक्रम म्हणजेच १,२,३,४ लिहावयाचा असतो. मतमोजणी करताना पहिल्या फेरित पहिल्या पसंतीनूसार उमेदवाराच्या प्राप्त मते निर्धारित केली जातात.

क. निवडून येण्याकरीता किमान आवश्यक मतसंख्या:

उमेदवारास निवडून येण्याकरीता किमान मते म्हणजेच मतांचा कोटा (Quota) प्राप्त होणे आवश्यक असते. तो खालील सूत्रानूसार निर्धारित करण्यात येतो.

$$\frac{\text{एकूण मतदरांची संख्या}}{\text{जागांची संखा + १}} + १$$

$$\frac{\text{महाराष्ट्र राज्य विधानसभा सदस्यांची संख्या}}{\text{जागांची संख्या ६+१=७}} + १ = ४२$$

म्हणजेच महाराष्ट्र राज्य विधानसभा मतदान मंडळातून राज्यसभेवर निवडून येण्याकरीता उमेदवाराला पहिल्या पसंतीची ४२ मते प्राप्त होणे आवश्यक असते. अशाप्रकारे ज्या उमेदवारांना निर्धारित मते प्राप्त झाली असतील तेवढया जागा भरल्या गेल्या नाहीत तर मतमोजणीची दुसरी फेरी आयोजित केली जाते.

३.१.८ पात्रता व अपात्रतेच्या अटी:

अ. पात्रेच्या अटी

१. तो भारताचा नागरिक असावा

२. त्याचे वय ३० वर्षापिक्षा कमी नसावे.

३. स्संदेने वेळोवेळी निर्धारित केलेल्या अटी पूर्ण कराव्यात.

४. ज्या राज्यातून उमेदवारांनी अर्ज केला असेल त्या राज्यात त्याचे कायम स्वरुपाचे वास्तव्य असावे आणि त्या राज्याच्या मतदार यादीत त्याचे नाव समाविष्ट असावे.

ब. अपात्रतेच्या अटी:

१. केंद्र किंवा राज्य सरकार यातील आर्थिक प्राप्ती होणाऱ्या पदावर नसावा. मंत्र्यांना सरकारी नोकर किंवा सरकारकडून आर्थिक लाभ घेणारे समजले जात नाही.

२. तो वेडसर किंवा दिवाळखोर नसावा.

३. न्यायालयाने व संसदेने अपात्र ठरविलेल्या व्यक्तिस राज्यसभेतील निवडणूक लढविता येत नाही.

४. निवडणूकित भ्रष्ट मार्गाचा अवलंब केल्याचे न्यायालयात सिध्द झाल्यास त्याच्या न्यायालयाच्या आदेशानंतर ६ वर्षे निवडणूक लढविता येणार नाही.

५. तो परकिय असल्यास किंवा त्याने भारतीय नागरिकत्वाचा त्याग केला असल्यास त्यास निवडणूक लढविता येणार नाही.

munotes.in

राज्यसभेचा कार्यकाल

राज्यसभा हे कायमचे म्हणजे स्थायी सभागृह आहे. हे कधीच विसर्जीत होत नाही. लोकसभा विसर्जित झाली तरी कायदेविषयक कार्य सभासदांचा कार्यकाल कायमचा नसून सहा वर्षाचा किंवा दर दोन वर्षानी राज्यसभेचे एक सभासद निवृत्त होतात व त्यांच्या जागी नवे सभासद निवडले जातात. कोणत्याही सभासदास राजीनामा देता येतो. पक्षांतरविरोधी कायदा राज्यसभा सदस्यांनाही लागू झाला आहे. पक्षांतराच्या कारणास्तव सभासदास अपात्र ठरविण्याचा अधिकार राज्यसभेच्या अध्यक्षास आहे.

संसद आणि संसद सदस्यांचे विशेषधिकार

ज्या अर्थाने ब्रिटिश संसद सार्वभौम आहे त्या अर्थाने जरी भारतीय सार्वभौम नसली तरी मर्यादीत अर्थाने संसद सार्वभौम आहे. कारण ती सार्वभौम भारतीय जनतेचे प्रतिनिधित्व करते. संसद आणि संसद सदस्यांची प्रतिष्ठा जोपासली जावी याकरिता राज्यघटनेत विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. या तरतूदी खालीप्रमाणे.

अ. संसदेचे विशेषधिकार:

संसदेला आपली कामकाज पध्दती निर्धारित करण्याचा अधिकार आहे. सभागृहाच्या कामकाजाचा वृत्तांत नोंदला जातो. वृत्तपत्रे आणि प्रसार माध्यमातून सभागृहाच्या कामकाजाचा कोणता भाग प्रसिध्द करु नये यासंबंधीचे आदेश सभापती संबंधीतांना देत असतात. सभागृहाची अवज्ञा करणाऱ्या व्यक्ती किंवा व्यक्ती समुदायात शासन करण्याचा अधिकार सभागृहास आहे. अवमानकारक किंवा दिशाभूल करणारा वृत्तांत वृत्तपत्रे किंवा प्रसार माध्यमात प्रस्तूत झाला असेल तर त्यांना समज देण्याचा आणि आवश्यक वाटल्यास शिक्षा फर्माविण्याचा अधिकार प्रत्येक सभागृहास असतो. मंत्र्यांकडून जर सभागृहाची दिशाभूल करण्यात आली असेल किंवा हेतूपरस्पर चुकीची माहिती सादर करण्यात आली असेल त्यांच्या विरुध्द हक्कभंगाचा प्रस्ताव सभागृहात सादर केला जातो आणि सभागृहाची हक्कभंग समिती त्यांची चौकशी करुन आपला अहवाल सभागृहासमोर सादर करते.

ब. सभासदांचे विशेषाधिकार

सभागृहाप्रमाणेच संसदेच्या सदस्यांना काही विशेषाधिकार राज्यघटनेच्या कलम १०५ प्रमाणे बहाल करण्यात आले आहेत.

१. त्यानूसार प्रत्येक सभासदास सभागृहात पूर्ण भाषण स्वातंत्र्य देण्यात आले आहे. सभागृहात व्यक्त केलेले विचार किंवा मत किंवा टिकाटीपन्नीत याबाबत कोणत्याही न्यायालयात त्यांच्या विरुध्द कायदेशीर कारवाई करता येणार नाही.

२. संसदेचे अधिवेशन चालू असताना सभापतीच्या परवानगीशिवाय कोणाही सभासदास अटक करता येणार नाही. मात्र गंभीर स्वरुपाच्या फौजदारी गुन्हयाबाबत जर त्यांना अटक करण्यात आली असेल तर त्याची माहिती सभागृहाच्या सभापतीस देणे आवश्यक ठरते.

संसदेचे कार्ये व अधिकार

भारतीय संसद हे केंद्रीय विधिमंडळ आहे. म्हणजेच विधिनियमाची निर्मिती हे संसदेचे प्रमुख कार्य आहे. वर नमुद केल्याप्रमाणे भारतीय संसद ही द्विगृही आहे. आणि राज्यघटनेच्या कलम ७९ प्रमाणे राष्ट्रपती संसदेचा अविभाज्य घटक असल्याने वैधानिक स्वरुपाची कार्ये पार पाडण्याकरीता लोकसभा, राज्यसभा आणि राष्ट्रपती यांच्यात सामंजस्य असणे आवश्यक आहे. आणखी एक उल्लेखनीय बाब म्हणजे भारताच्या राज्यघटनेचे संसदीय शासन पध्दती प्रस्थपित केली असल्याने पंतप्रधान व त्यांच्या

munotes.in

नेतृत्वाखालील मंत्रिमंडळ देखिल संसदेचा अविभाज्य घटक आहे. औपचारिक अर्थाने संसदेस जे अधिकार देण्यात आले आहेत त्यांचा बहूतांशी वापर मंत्रिमंडळाच्या पुढाकाराने व मार्गदर्शनाप्रमाणे केला जातो. असे असले तरीही राज्यघटनेने ज्या जबाबदाऱ्या संसदेकडे सोपवल्या आहेत त्या घटनात्मकदृष्टया संसदेची कार्ये आहेत. त्यांचे तपशीलवार विवरण खालीलप्रमाणे आहे.

१. कायदेविषयक अधिकार

कायदयाची निर्मिती हे संसदेचे प्रमुख कार्य आहे. याबाबतीत लोकसभेला राज्यसभेच्या बरोबरीचे अधिकार आहेत. संघराज्यात्मक व्यवस्थेत संघसूची आणि सामायिक सूचीत समाविष्ट ९७ व ४७ विषयांसंबंधी कायदे करण्याचा अधिकार संसदेस आहे. तर त्या कालखंडात त्या राज्यसूचितील विषयासंबंधी संसद कायदे करु शकते. नविन राज्याची निर्मिती करणे, राज्यांची नावे बदलणे, एखादया राज्यातील विधान परिषद रद्द करण्याविषयी कायदा करणे, सीमा तंटा सोडविणे, पाणी वाटपा संबंधी नियम करणे, राष्ट्रपती, पंतप्रधान, खासदार यांच्या सेवाशर्ती वेतन इत्यादी ठरविणे, न्यायालयातील रचनेच्या बाबतीत कायदे करणे, नागरिकत्वाच्या तरतूदीबाबत कायदे करणे इत्यादी अधिकार संसदेस आहे.

संसदेच्या दोन अधिवेशांच्या दरम्यानच्या काळात तातडीची उपाययोजना म्हणून राष्ट्रपतींनी जे अध्यादेश जारी केले असतील ते मान्यतेकरिता संसदेसमोर सादर केले जातात संसदेच्या मान्यतेनंतर त्यास कायदयाचे स्वरुप प्राप्त होत असते. या व्यतिरिक्त आणिबाणीच्या अध्यादेशानाही संसदेची मान्यता आवश्यक असते. राष्ट्रपतीद्वारा करण्यात असलेल्या युध्दाच्या घोषणेस संसदेची मान्यता आवश्यक असते. कोणतेही सर्वसामान्य विधेयक प्रथम कोणत्याही सभागृहासमोर मांडता येते. त्याचे निराकरण करण्याकरीता संसदेचे संयुक्त अधिवेशन आमंत्रित करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना असतो. म्हणजेच संसदेच्या दोन्ही सभागृहांचे विधिविषयक किंवा कायदेविषयक संबंधीचे अधिकार समान आहेत.

२. कार्यकारी वा प्रशासकीय स्वरुपाचे अधिकार

कार्यकारी व प्रशासकीय क्षेत्रात लोकसभा अधिकार राज्यसभेपेक्षा श्रेष्ठ आहेत. लोकसभेत बहूमत प्राप्त झालेल्या राजकीय पक्षाच्या नेत्याची पंतप्रधानपदी नेमणूक करण्याचा संकेत आहे. पंतप्रधान व त्याच्या नेतृत्वाखाली मंत्रीमंडळ लोकसभेला संयुक्तरित्या जबाबदार असते. तसेच प्रत्येक मंत्री वैयक्तिकरित्या लोकसभेला जबाबदार असतो. एखादया मंत्र्याविरुध्द निदाव्यंजक ठराव किंवा संपूर्ण मंत्रीमंडळावर अविश्वासाचा ठराव मंजूर करुन मंत्रिमंडळ पदच्युत करण्याचा अधिकार लोकसभेला आहे. ७ नोव्हेंबर १९९० रोजी अविश्वासाचा ठराव संमत करुन लोकसभेने व्हि. पी. सिंग सरकारला राजीनामा देण्यास भाग पाडले होते. एखादया सभासद मंत्र्यांना त्यांच्या खात्याच्या कारभाराबाबत प्रश्न, उपप्रश्न विचारु शकतात. विरोध प्रकट करण्यासाठी सभागृहात स्थगन प्रस्ताव आणता येतात. शासनाच्या धोरण व कार्यक्रमाची चर्चा करताना विधेयकांना मंजूरी देताना सरकारवर टिका करण्याचा अधिकार संसदेच्या दोन्ही गृहांच्या सभासदांना असतो.

३. आर्थिक स्वरुपाचे अधिकार

आर्थिक बाबतीत लोकसभेचे अधिकार अंतीम मानले जातात. सर्वसामान्य विधेयक हे संसदेच्या कोणत्याही सभागृहात प्रथम मांडले जात असले तरी धनविधेयक केवळ लोकसभेतच मांडली जातात. कारण लोकसभा जनतेचे प्रतिनिधित्व करणारे सभागृह आहे. अंदाजपत्रकावर लोकसभेची स्वीकृती मिळाल्यावर ते राज्यसभेकडे पाठविले जाते. राज्यसभेने ते १४ दिवसांत

munotes.in

मंजूर केले पाहिजे किंवा दुरुस्त्यांसह लोकसभेत परत पाठविले पाहिजे या मुदतीत राज्यसभेने विधेयक लोकसभेला परत पाठविले नाही किंवा मंजूरही केले नाही तरीही ते मंजूर झाले असे गृहीत धरले जाते व राष्ट्रपतींकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविले जाते.

या आर्थिक स्वरुपाच्या कामकाजात आकस्मित निधी निर्माण करणे, खर्च करणे, विविध करांची आकारणी आणि वसूली, राज्यांना कर्जाच्या अटी घालणे, वित्त आयोगाच्या शिफारशीवर निर्णय घेणे, पंचवार्षिक योजनांना मान्यता देणे इत्यादी बाबींचा समावेश होतो. एखादे विधेयक धनविधेयक आहे की नाही ते ठरविण्याचा अधिकार लोकसभेच्या सभापतींना असतो. मात्र धन विधेयक लोकसभेसमोर सादर करण्याकरीता राष्ट्रपतींची पूर्व संमती आवश्यक असते.

४. घटनादुरुस्तीविषयक अधिकार

राज्यघटनेच्या कलम ३६८ मध्ये विशद करण्यात आलेल्या कार्यपध्दतीनूसार राज्यघटेत दूरुस्ती करण्याचा अधिकार संसदेस आहे. घटनादुरुस्तीच्या बाबतीत राज्यसभेला लोकसभेच्या बरोबरीने अधिकार प्राप्त झाले आहेत. त्यासंबंधीचे विधेयक कोणत्याही सभागृहात मांडले जातात. घटनादुरुस्तीच्या बाबतीत दोन्हीही सभागृहांत स्वतंत्रपणे मंजूर करणे आवश्यक आहे. घटनादूरुस्तीच्या बाबतीत दोन्हीही सभागृहांत मतभेद झाल्यास संयुक्त अधिवेशन आमंत्रित करण्याची तरतूद नाही. १९८९ मध्ये लोकसभेने संमत केलेल्या ६३ व्या व ६४ व्या घटना दुरुस्तीस राज्यसभेत आवश्यक दोन तृतीयांश बहूमत प्राप्त न झाल्याने त्या फेटाळल्या गेल्या.

५. निर्वाचन अधिकार:

राष्ट्रपती तसेच उपराष्ट्रपती यांना निवडून देण्याचा अधिकार संसदेस आहे. लोकसभा, राज्यसभा व विधानसभेलाही निवडून आलेल्या सदस्यांचा एक मतदार संघ असतो. त्याच्याकडून राष्ट्रपतीची निवड होत असते. उपराष्ट्रपती फक्त लोकसभा व राज्यसभा यांच्याकडून निवडले जातात. म्हणून निवडणूक विषयीच्या कार्यात दोन्ही सभागृहांचे अधिकार समान आहेत.

६. न्यायविषयक अधिकार

राष्ट्रपती सर्वोच्य व उच्च न्यायालयांचे न्यायाधिश, मुख्य निर्वाचन आयुक्त इत्यादी उच्च पदस्थांविरुध्द बेसनदशीर वर्तणूक किंवा शारिरिक वा मानसिक अपात्रतेचे आरोपपत्र कोणत्याही सभागृहाच्या १/१० सभासदांनी दाखल केल्यास या आरोपांची चौकशी करुन आणि संबंधित उच्चपदस्थ दोषी आढळून आल्यास त्यास बडतर्फ करण्याचा अधिकार संसदेस आहे. या अधिकारास महाभियोग चालविण्याचा अधिकार असे म्हणतात.

३.२ भारतीय न्याय व्यवस्था / न्यायप्रणाली

प्रास्ताविक

प्राचिन व मध्ययुगात राज्यकर्ते व्यक्तीश: न्यायदानाची जबाबदारी पार पाडत असत. मात्र आधुनिक काळात कायदयांचे संहितीकरण घडून आल्याने व्यतिनिष्ठेतून उद्‌भवणारी विसंगती दूर करण्यात आली आहे. आणि वस्तूनिष्ठेने न्यायदान व्हावे याकरीता न्यायदानाची जबाबदारी विधीविधानात पारंगत असलेल्या न्यायाधिशांकडे सोपविण्यात आली आहे. न्यायदानाची जबाबदारी राजा किंवा सामंत वर्ग या व्यक्ती पार पाडत नसून न्यायमंडळ या संस्थेकडे ती जबाबदारी सोपविण्यात आली आहे. लोकशाहीच्या विकासाबरोबर सामान्य मानसाचे हित जोपासले जाणे या विचाराला महत्व प्राप्त झाले आहे. राज्यघटनेद्वारा सर्वसामान्य माणसास मुलभूत अधिकार बहाल करण्याची प्रथा १८ व्या

munotes.in

शतकाच्या अखेर प्रस्थापित झाली आणि त्यातूनच न्यायमंडळाच्या प्रचलित कार्यपध्दतीची सुरुवात झाली असे म्हणता येईल.

सर्वोच्च न्यायालयाची रचना

राज्यघटनेच्या कलम १२४ ते १४७ मध्ये करण्यात आल्या आहेत त्यातील सर्वोच्च न्यायालयाच्या रचनेशी संबंधीत तरतूदी पुढीलप्रमाणे आहे.

न्यायाधिशांची संख्या

अमेरिकेच्या संयुक्त संस्थानात सन १७८९ मध्ये न्यायाधिशांचीही संख्या ९ होती. त्यात गेल्या दोनशे वर्षात कोणताही बदल झाला नाही. भारताच्या राज्यघटनेतील तरतूदी अत्यंत लवचिक आहेत. राज्यघटनेच्या कलम १२४ प्रमाणे सरन्यायाधिश अशी सर्वोच्च न्यायालयाचीरचना करण्यात आली होती. भविष्यकाळातील गरजा लक्षात घेवून संसदेला सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांच्या संख्येत वाढ करण्याचा अधिकार देण्यात आला होता. संसदेने घटना दुरुस्त्यांद्वारा इतर न्यायाधिशांची संख्या १९५६ मध्ये १०, १९६० मध्ये १३, १९७७ मध्ये १७ व १९८६ मध्ये २५ अशी वाढवलेली आहे. राज्यघटनेच्या कलम १२७ प्रमाणे सरन्यायाधिशांस राष्ट्रपतींच्या संमतीने काही अतिरिक्त न्यायाधिशांची तात्पूरती नेमणूक (Adhoc Appointment) करण्याचा अधिकार आहे. तसेच कलम १२८ प्रमाणे सर्वोच्च न्यायालयाच्या सेवानिवृत्तीच्या न्यायाधिशांची मर्यादीत काळाकरीता प्रासंगिक नेमणूक करण्याचाही अधिकार सरन्यायाधिशांस आहे. अशा प्रकारच्या नेमणूकीकरिताही राष्ट्रपतीची संमती आवश्यक आहे.

न्यायाधीशांची नेमणूक

न्यायमंडळाच्या स्वातंत्र्याच्या दृष्टीने न्यायाधीशांची नेमणूक कशाप्रकारे केली जाते याला विशेष महत्व आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीश व इतर न्यायाधीशांची नेमणूक करण्याचा अधिकार भारताच्या राष्ट्रपतीस आहे. सरन्याधीशांच्या नेमणूकीबाबत सेवानिवृत्त होणाऱ्या सरन्याधीशाचा सल्ला घेणे व सर्वांत ज्येष्ठ न्यायाधीशांची सरन्याधीश म्हणून नेमणूक करणे या संकेताचं सर्वसामान्यपणे पालन केले आहे. मात्र १९७४ व १९७७ मध्ये जेष्ठ न्यायाधीशांना डावलून राज्यकर्त्यांशी वैचारिक साधर्म्य असलेल्या न्यायाधीशांची सरन्यायाधीशपदी नेमणूक करुन बांधिलकी असलेल्या न्याय व्यवस्था (Committed Judiciary) प्रस्थापित करण्याचा प्रयत्न तत्कालीन राज्यकर्त्यांनी केला होता. सर्वोच्च न्यायालयाच्या स्वातंत्र्याच्या दृष्टीने राज्यकर्त्या पक्षाचा अशा प्रकारचा हस्तक्षेप अनिष्ट असला तरी न्यायाधीशांच्या नेमणूकीत 'राजकारण' येणे अपरिहार्य व सार्वत्रिक असल्याचे आढळून येते. या अधिकाराचा गैरवापर होवू नये याकरीता अमेरिकेत संसदेच्या वरिष्ठ गृहांची न्यायाधिशांच्या नेमणूकीस मान्यता असावी अशी तरतूद करण्यात आली आहे. १९८३ साली सर्वोच्च न्यायालयाने न्यायाधीशांच्या नेमणूकीबाबत कार्यकारी मंडळाच्या "पुढाकारास" (Imitative) आपली अनुकुलता व्यक्त केली. १९८५ ते १९८८ या कालखंडात सर्वोच्च न्यायालयाच्या काही न्यायाधीशांची नेमणूक करताना तर न्यायाधीशांची सल्लामसलत करण्याचा साधा शिष्टाचारही पाळण्यात आला नव्हता. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची नेमणूक करण्याची प्रथा सुरु झाली होती.

पात्रतेच्या अटी

राज्यघटनेच्या कलम १२४/३ मध्ये भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाची पात्रता विशद करण्यात आली आहे ती पुढीलप्रमाणे आहे.

१. तो भारताचा नागरिक असावा

munotes.in

२. तो उच्च न्यायालयाचा कमीत कमी ५ वर्षे सतत न्यायाधीश राहिलेला असावा किंवा त्याने उच्च न्यायालयात कमीत कमी १० वर्षे सतत खाजगी वकिली केलेली असावी किंवा राष्ट्रपतींच्या मते ती व्यक्त सुप्रसिध्द कायदेपंडित असावी.

प्रत्यक्ष व्यवहारात सर्वोच्य न्यायालयाच्या न्यायाधीशांची नेमणूक उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांतूनच गेली ५४ वर्षे केली जात आहे.

कार्यकाल (Term of Office):

न्यायाधीश जोपर्यंत सद्वर्तनी आहे तो पर्यंत तो आपल्या पदावर असतो. (During Good Behaviour) न्यायाधीश सद्वर्तनी असला तरी तो वयाच्या ६५ व्या वर्षी सेवानिवृत्त होईल. तत्पूर्वीसूध्दा तो राष्ट्रपतीकडे राजीनामा पाठवून पदत्याग करु शकतो. न्यायाधीशाला पदभ्रष्ट करण्याची महाभियोगाची तरतूद राज्यघटनेत करण्यात आली आहे.

न्यायाधीशांना पदभ्रष्ट करण्याविषयीची महाभियोगाची अत्यंत कठीण प्रक्रिया घटनेत विशद करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे स्वातंत्र्य अबाधित रहावे म्हणूनच एवढी कठीण प्रक्रिया अवलंबण्याची तरतूद राज्यघटेत करण्यात आली आहे. सर्वोच्य न्यायालयाचे न्यायाधीश के. रामस्वामी यांच्या विरुध्द भ्रष्टाचाराच्या आरोपास्तव महाभियोगाची कारवाई १९९१ साली सुरु करण्यात आली होती. त्यासंबंधी ठरावाला आवश्यक ते दोन तृतीयांश बहूमत प्राप्त झाले नाही आणि महाभियोगाची कारवाई बारगळली असे असले तरी सर्वोच्य न्यायालयाच्या निष्कलंक प्रतिमेला त्यामुळे तडा गेला.

न्यायाधीशांना पदभ्रष्ट करण्याविषयींच्या तरतूदी

न्यायाधीशांना पदभ्रष्ट करण्याविषयीची अत्यंत कठीण प्रक्रिया घटनेत सांगितली आहे. राष्ट्रपतीच्या आदेशाशिवाय महाभियोगाचा प्रस्ताव संमत केल्यानंतरच काढु शकतात. विशिष्ट न्यायाधीशावर गैरवर्तुणूकीचा किंवा अक्षमतेचा आरोप ठेवून तसा ठराव संसदेच्या दोन्ही सभागृहांनी एकूण सभासद संख्येच्या बहुमताने व उपस्थित राहून मतदान करणाऱ्यांच्या दोन तृतीयांश बहुमताने मंजूर केल्यावरच राष्ट्रपतीला न्यायाधीशास पदभ्रष्ट करण्याचा आदेश काढता येतो. गेल्या ५४ वर्षात कोणत्याही न्यायाधीशास पदभ्रष्ट करण्यात आले नाही ही उल्लेखनीय बाब आहे.

सेवानिवृत्तीनंतर वकिली करण्यास बंदी

घटनेप्रमाणे सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाला सेवानिवृत्तीनंतर भारतातील कोणत्याही न्यायालयात वकिली करता येणार नाही. सर्वोच्च न्यायालयाची व त्या न्यायाधीशांची प्रतिष्ठा कायम ठेवण्याच्या दृष्टीने ही तरतूद आवश्यक आहे यात शंकाच नाही. न्यायव्यवस्थेच्या दृष्टीनेही असे बंधन योग्यच होय. अनेक सेवानिवृत्त न्यायाधीशांची शासनाने चौकशी आयोग, वित्त आयोग, भाषावार राज्य पुनर्रचना आयोग इ. वेगवेगळया पदयांवर नियुक्ती केल्याचे आढळून येते. टिकाकारांच्या मते अधिकार पदांवरील न्यायाधीशांना निवृत्ती नंतर अशा प्रकारच्या अधिकार पदाचे प्रलोभन शासनाकडून दाखविले जाते त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या स्वातंत्र्याचा संकोच होतो. या व्यतिरिक्त अधिकार पदावर असणाऱ्या किंवा निवृत्त होणाऱ्या किंवा निवृत्त झालेल्या न्यायाधीशांनी सक्रीय राजकारणात भाग घेतल्याचेही दिसून येते. म्हणजेच सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीशही जबाबदार आहेत.

कर्मचारी वर्ग

न्यायव्यवस्थेचे स्वातंत्र्य अबाधित रहावे म्हणून सर्वोच्च न्यायालयाला स्वतंत्र असा कर्मचारी वर्ग असतो. आपल्या अखत्यारातील सर्व अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या नेमणुका सरन्यायाधीशांमार्फत

होतात. त्यांचे वेतन व भत्ते संचित निधीतून दिले जातात की आदीच्या रुपाने न्यायालयाला मिळणारे उत्पन्न संचित निधीत जमा केले जात असते.

न्यायाधीशांना घटनात्मक संरक्षण

आपल्या पदांचा स्विकार करण्यापूर्वी न्यायाधीशाला राष्ट्रपतीसमोर न्यायालयीन स्वातंत्र्याची आणि नि:पक्षपती राहण्याची शपथ घ्यावी लागते. राज्यघटनेच्या कलम १२९ अनुसार सर्वोच्च न्यायालय व त्याच्या न्यायाधीशांचा अपमान करणाऱ्यास शिक्षा दिली जाते. बहुमतानुसारच हे निर्णय घेतले जातात त्याचप्रमाणे हे कामकाज खुल्या वातावरणात चालेल अशी तरतूद १४५/४ कलमान्वये करण्यात आली आहे. उदा. बॅंकेचे राष्ट्रीयीकरण, गोलकनाथ खटला इ. त्याचप्रमाणे सर्वोच्च न्यायालयांचे कामकाज कमीतकमी पाच न्यायाधीश ऐकतील आणि त्यावर निकाल देतील.

सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार क्षेत्र:-

अ. प्रारंभित सुनावणीचे अधिकार क्षेत्र (Original Jurisdiction)

काही विषय असे आहेत की, ज्यांच्या संबंधीचे खटले इतर कोणत्याही न्यायालयात सुनावणीस येवू शकत नाहीत, तर ते थेट सर्वोच्च न्यायालयापुढेच दाखल केले जातात. अशा खटल्यात पुढील प्रकरणांचा समावेश होतो.

१. केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्यामधील घटनात्मक स्वरुपाचे वाद.

२. दोन घटक राज्यांमध्ये निर्माण झालेला संघर्ष व त्यासंबंधीचा खटला.

३. ज्यामध्ये एका बाजुला केंद्र सरकार व एक किंवा काही घटक राज्ये आणि दुसऱ्या बाजुला काही घटक राज्ये असतील असा खटला.

४. राष्ट्रपती व उपराष्ट्रपती यांच्या निवडणुकीविषयी वाद निर्माण झाल्यास त्याबाबत सर्वोच्च न्यायालय देईल तो निर्णय अंतिम असेल व ही बाब अन्य कोणत्याही न्यायालयात नेता येणार नाही.

५. घटनेने नागरिकांना जे मुलभूत अधिकार दिलेले आहेत त्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी सर्वोच्च न्यायालयावर असते. विधिमंडळाने केलेल्या एखादया कायदयाने किंवा शासनाच्या एखादया आज्ञेने जर नागरिकांच्या मुलभूत हक्कांवर गदा येत असेल तर नागरिक सर्वोच्च न्यायालयाकडे दाद मागू शकतो. मुलभूत हक्कांचा भंग झाल्याबाबतचे हे दावे जसे सरळ ३२ व्या कलमान्वये सर्वोच्च न्यायालयात दाखल होवू शकतात. तसे ते १२६ व्या कलमानूसार उच्च न्यायालयातसुध्दा दाखल केले जातात. त्यानुसार घटनेची ३२ व्या कलमानूसार मुलभूत रक्षणासाठी बंदी प्रत्यक्षीकरण, परमादेश, प्रतिषेध, अधिकार पृच्छा आणि उत्प्रेक्षण सारखे आदेश काढण्याचा हक्क सर्वोच्च न्यायालयाचा असेल.

६. एखादया दाव्यामध्ये केंद्रीय व राज्यीय कायदयाच्या घटनात्मक वैधतेचा प्रश्न गुंतलेला असेल तर असा दावा फक्त सर्वोच्च न्यायालयामध्येच सुनावणीला येवू शकतो.

ब. पुननिर्णयाचे अधिकार क्षेत्र (Appellate Jurisdiction):

घटनेच्या १३२ व्या कलमात सर्वोच्च न्यायालयाच्या पुननिर्णयाच्या कार्यक्षेत्राचे स्पष्टीकरण केले आहे. त्यानूसार खालील दाव्यात पूननिर्णय किंवा अपिल दाखल करुन घेण्याचे अधिकार आहेत.

munotes.in

I) घटनात्मक न्यायालयीन दावे

सर्वोच्च न्यायालयाकडे घटनेच्या संरक्षणाची अर्थ लावण्याची जबाबदारी असल्यामुळे यासंबंधी असणारे सर्व खटले सर्वोच्च न्यायालयासमोर चर्चेसाठी मांडले जातात. घटनात्मक विश्लेषण यासाठी उच्च न्यायालयाच्या दाखल्यानंतरच सर्वोच्च न्यायालयात अपीलासाठी दाखल केले जातात. उच्च न्यायालयाच्या दाखल्याशिवाय सर्वोच्च न्यायालयाच्या खास परवानगीनेही काही खटले अपीलासाठी दाखल करुन घेतले जाऊ शकतात.

घटनात्मक दाव्याचा निकाल देत असताना सर्वोच्च न्यायालयाला अनेक बाबींचा विचार करावा लागतो. घटनेचे पावित्र्य राखणे, घटनाकाराने निर्माण केलेली घटनेची चौकट कायम राखणे, संसदीय कायदा घटनेविरुध्द जात असल्यास त्याला अवैध ठरवणे आदी गोष्टी निकाल देताना सर्वोच्च न्यायालयास विचारात घ्याव्या लागतात.

II) दिवाणी न्यायालयीन दावे

घटनेच्या कलम १३३ अन्वये दिवाणी दाव्यातील पूननिर्णयाच्या बाबतच्या तरतूदी करण्यात आल्या आहेत. खालील प्रकारच्या दिवाणी दाव्याचे अपीले सर्वोच्च न्यायालयात केले जाऊ शकतात.

III) प्रशासकीय न्यायालय

नागरी प्रशासनात काम करणाऱ्या सेवकांच्या संबंधी काही वाद निर्माण झाल्यास उच्च किंवा सर्वोच्च न्यायालयाचा वेळ वाया जाऊ नये म्हणून कौटुंबिक न्यायालये, कामगार, औदयोगिक न्यायालये असतात. तसेच प्रशासकीय न्यायालयांची व्यवस्था आहे.

३.३ न्यायालयीन सक्रियता/ क्रियाशिलता (Judicial Activism)

न्यायालयीन निर्णय

प्रक्रीयेचा एक आवश्यक भाग म्हणजे न्यायालयीन व्यवस्थेची क्रियाशीलता होय. जेव्हा एखादे न्यायालय संविधानातील कायदयांना बदलत्या परिस्थितीत सातत्य देण्याचा प्रयत्न करते तेव्हा न्यायालयीन सक्रीयतेचा प्रत्यक्ष येतो.

न्यायसंस्थेला संविधानाने आखुन दिलेल्या चौकटीत करण्यात आलेल्या कायदंयाचा अर्थ लावणे आणि अशा कायदयांचे उल्लंघन होत असल्यास त्यासंबंधी न्यायनिवाडा देणे ही मुख्य कामे करावी लागतात. तेव्हा त्यांच्या निष्क्रियतेवर उपाय म्हणून न्यायालयाने सक्रीय होणे आवश्यक बनलेले आहे. तेव्हा समता, सामाजिक न्याय, सामाजिक हित या दृष्टीने विचार केल्यास केवळ कायदेमंडळ वसरकार यांच्यावर अवलंबून न राहता न्यायसंस्थेने सक्रीय भूमिका स्वीकारणे ही काळाची गरज आहे.

संकल्पना – अर्थ

१३२ व्या कलमात असे स्पष्ट केले आहे की, भारतातील एखादया समाज घटकांवर अन्याय झाला असेल किंवा मुलभूत अधिकारांचे उल्लंघन होत असेल तर त्याविरुध्द न्यायालयात अर्ज करता येतो. जर देशातील शासन, कायदेमंडळ आणि प्रशासन व्यवस्था मुलभूत हक्कांची अंमलबजावणी करण्याचे नाकारत असेल तर त्यांची अंमलबजावणी करण्याचे आदेश देण्याचा अधिकार संविधानाने न्यायालयाला दिला आहे. स्टेटची/ शासनाची जी व्याख्या केली ती अशी की, स्टेट म्हणजे केवळ

munotes.in

राज्य नव्हे तर सर्व स्थानिक स्वराज्य संस्था अशाप्रकारे सर्वोच्च न्यायालयाकडून पहिली न्यायालयीन सक्रियता ही स्टेट च्या व्याख्येतून प्रकट झाली.

संविधानाच्या कलम ३४१ व ३४२ मध्ये अशी तरतूद करण्यात आलेली आहे की, अनुसुचित जाती, जमाती, तसेच शैक्षणिक व सामाजिक दृष्टया मागासलेल्या जमातीसाठी शिक्षणसंस्था व सार्वजनिक सेवांमध्ये राखीव जागा ठेवण्यात याव्या. एकीकडे कायदयासमोर सर्व समान, सर्वांना कायदयाचे समान संरक्षण व वागणूक हे व्यक्तीचे मुलभूत हक्क आहेत. तेव्हा सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागसलेले कोण हे कसे ठरवायचे, जातीय निकषांवर राखीव जागा भरल्या जातील तसेच राजकीय सोयीसाठी राज्यकर्ते या तरतुदींचा गैरफायदा घेतील असे होवू नये म्हणून १९७३ साली सर्वोच्च न्यायालयाने सक्रियतेच्या भूमिकेतून या तरतुदींसंबंधी नियम केले.

न्यायालयीन सक्रियतेची काही उदाहरणे

१. १९७३ मध्ये केशवानंद भारती खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने असे स्पष्ट केले होते की, संविधानाच्या ३६८ हया कलमानूसार संसदेला मुलभूत हक्कांच्या संदर्भात संविधानाच्या कोणत्याही कलमात बदल करण्याचा अधिकार बजाविताना संविधानाच्या मुलभूत स्वरुपात बदल करण्याचा अधिकार नाही. या खटल्यात न्यायालयीन सक्रियता सिध्द झाली असे म्हणावयास हरकत नाही.

२. १९७८ नंतरच्या काळात भारतीय न्यायालयीन व्यवस्था जास्त सक्रिय झाल्याचे आढळते. जीविताचा हक्क आणि व्यक्तिगत स्वातंत्र्याचा हक्क याची पुनर्बांधनी करण्याचे कार्य न्यायालय करीत आहे. तर राजकीय व्यवस्थेवरील विश्वास कमी होवू लागला आहे. कारण कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ यांच्याकडून संविधानातील तरतूदींची अंमलबजावणी योग्य प्रकारे होत नाही. समाजातील दृष्ट प्रवृत्तीचा प्रभाव शासन यंत्रणेवर होत असल्यामुळे तिच्यात निष्क्रीयता आलेली आहे. कायदयाची निर्मिती, अंमलबजावणी, कार्यवाही शासन व्यवस्थेकडून योग्यरितीने होत नसल्यामुळे न्यायालयाला त्यांच्या कार्यात हस्तक्षेप करावा लागत आहे.

जनतेची जागरुकता आणि जनतेची क्रियाशिलता ही देखील न्यायालयीन सक्रियेतेसाठी आवश्यक आहे. त्यासाठी जन आंदोलनाची आज गरज निर्माण झाली आहे. सामाजिक अन्याय, शोषण, भ्रष्टाचार यांच्याविरुध्द संघर्षाच्या भावनेतूनच आंदोलनाद्वारे जनजागृती निर्माण करतात. गुन्हेगारांना निवडणुकांपासून दूर ठेवण्यासाठी न्यायालयाने ०२/०५/२००२ ला निर्णय दिला.

अगदी अलीकडचे उदाहरण म्हणजे रस्त्यावरील अपघाताचे प्रमाण वाढलय. यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने केंद्रसरकारला आदेश दिला की, येत्या तीन महिन्यात रस्त्यांवरील अपघतांचे प्रमाण १०टक्के ने कमी करण्याकरीता उपाययोजना करा. त्याप्रमाणे गेल्याच महिन्यात केंद्र सरकारने सर्व राज्यांच्या सचिवांची बैठक घेवून रस्त्यावरील अपघात कमी करण्यासाठी उपाययोजनांची चर्चा केली. त्यानूसार सध्या ठिकठिकाणी पोलीसांची गरज आहे. हेल्मेट शिवाय, धूम स्टाईल, स्टंट बाजांना चांगलाच कायदयाचा बडगा दाखविला जात आहे. यातूनच न्यायालयीन सक्रियतेची उदाहरणे दिसतात.

३.४ सारांश

देशातील कायदेमंडळ किंवा कार्यकारी मंडळ जनतेच्या प्रती जागृत राहून असलेले प्रश्न सोडविणे व भविष्यात समस्या निर्माण होवू नये यासाठी दुरदृष्टीने व्यापक धोरण, कायदा निर्मिती व त्याच्या अंमलबाजवणीची गरज असते. पण काही वेळा राजकिय संस्था व प्रशासन संस्थातील उदासिनपणा

वाढीस लागत असल्यानेच न्यायसंस्था अधिक सक्रिय/जागृत होत आहे. हे भारतीय जनेच्या दृष्टीने न्याय व हितावह पण राजकिय व्यवस्थेच्या दृष्टीने शरमेची बाबत आहे.

३.५ आपली प्रगती तपासा – प्रश्न

१. भारतीय संसदेचे रचना व अधिकार स्पष्ट करा.

२. भारतीय संसदेतील वरिष्ठ सभागृह/राज्यसभा ची माहिती दया.

३. भारतीय न्यायव्यवस्थेवर निबंध लिहा.

४. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाची रचना व अधिकार स्पष्ट करा.

५. न्यायालयीन सक्रियता या विषयावर निबंध लिहा.

६. न्यायाधीशांना पदावरुन दुर करण्याच्या पध्दतीची चर्चा करा.

७. कोण कोणत्या विषयांवरुन न्यायालयाची क्रियाशिलता दिसून येते.

टिपा लिहा

१. राज्यसभेची मतदान पध्दती

२. खासदारांचे विशेष अधिकार

३. सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार क्षेत्र

४. न्यायाधीशांचे घटनात्मक संरक्षण

१.५ संदर्भ सूची

१. भोळे भा. ल., भारताचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर, २०१०.

२. डॉ. वा. भ. पाटील, भारतीय राज्यघटना, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगांव, जून २०१२.

३. जाधव तुकाराम आणि शिरापूरकर महेश, भारतीय राजकीय व्यवस्थेचा आकृतीबंध खंड १, युनिक ॲकॅडमी, पूणे २०११.

४. वराडकर र. घ. 'भारतीय शासन आणि राजकारण' निराली प्रकाशन पुणे, २०१६.

munotes.in

❖❖❖❖

कार्यकारी मंडळ

प्रकरणाची रचना –

उद्दिष्टे

प्रस्तावना

४.१ केंद्रीय कार्यकारी मंडळ : राष्ट्रपती

४.२ पंतप्रधान आणि केंद्रीय मंत्रीमंडळ

४.३ ७३ व ७४वीं घटना दुरूस्ती

४.४ आपली प्रगती तपासा – प्रश्न

४.५ संदर्भ सूची

४.१ केंद्रीय कार्यकारी मंडळ – राष्ट्रपती

उद्दिष्टे

संसदीय लोकशाही राजकीय व्यवस्थेचा प्रमुख म्हणून राष्ट्रपतीचे स्थान अत्यंत महत्त्व आहे. त्यांच्या पदासाठी आवश्यक असलेली पात्रता, निर्वाचन मंडळ, निवडणूक पद्धती व मतदारांचे मूल्य कसे ठरवले जाते, राष्ट्रपतीचे अधिकार व कार्य कोणती आहेत यासंबंधी विदयार्थ्यांना अद्यावत माहिती देणे ही या पाठाचे उद्दिष्टे आहेत.

प्रस्तावना

भारतीय राज्यघटनेच्या कलम ५२ ते ६२ या कलमांतर्गत भारताच्या राष्ट्रपतीची निवडणूक, कालावधी, राष्ट्रपती च्या निवडणुकीसाठी पात्रता, अटी, बडतर्फ (महाभियोग) इत्यादीसंबंधी, तरतुदी केलेल्या आहेत. भारत देशाचा संपूर्ण राज्यकारभार राष्ट्रपती च्या नावाने चालतो. राज्यघटनेच्या कलम ७४ मध्ये असे म्हटले आहे की, 'राष्ट्रपतीस सहाय्य व सल्ला देण्यासाठी एक मंत्रिपरिषद असेल राष्ट्रपती आपली कार्ये पार पडताना त्या सल्ल्यानुसार वागेल.' भारताने संसदीय शासन प्रणाली स्वीकारल्याने राष्ट्रप्रमुख आणि शासन प्रमुख असे या राजकीय व्यवस्थेत दोन प्रमुख असतात. म्हणून कलम ७४ प्रमाणे राष्ट्राचा कारभार राष्ट्रपती च्या नावाने चालत असला तरी प्रत्यक्षात या सर्व सत्तेचा वापर शासन प्रमुख म्हणजेच पंतप्रधान करतात. म्हणजेच राष्ट्रपतीचे पद हे नामधारी स्वरूपाचे असते. असे असले तरी ज्या वेळी संसदेत कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळत नाही, अशा वेळी राष्ट्रपतीला काही अधिकार प्राप्त होतात. किंवा देशाचा कारभार घटने प्रमाणे चालत नाही, किंवा देशात अंतर्गत यादवी, असंतोष इत्यादी प्रकारची परिस्थिती निर्माण झाली असल्यास मंत्रिमंडळाकडे संबंधित परिस्थिती संबंधी माहिती मागवणे व मंत्रिमंडळ सोबत काही बाबींवर चर्चा व निर्णय घेण्यास राष्ट्रपती सांगू शकतात. थोडक्यात भारताचा राष्ट्रपती हा इंग्लंडच्या राजाप्रमाणे निष्क्रिय नाही. तसेच अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षा इतका शक्तिशाली नाही. राज्यघटनेच्या कलम ५३ मध्ये असे म्हटले आहे की,'संघराज्याचे कार्यकारी अधिकार राष्ट्रपतीकडे निहित असेल आणि त्याच्याकडून प्रत्यक्षपणे किंवा त्याच्या हाताखालील अधिकाऱ्यांमार्फत या संविधानानुसार त्याचा (अधिकारांचा) वापर केला जाईल. थोडक्यात राष्ट्रपती हा कार्यकारी प्रमुख, तीनही सैन्यदलांचा

munotes.in

प्रमुख तसेच न्यायव्यवस्थेचाही प्रमुख असतो. म्हणून भारतीय संसदीय पद्धती मध्ये राष्ट्रपती पद हे केवळ शोभेचे पद नसून ते सर्वोच्च व जबाबदारीचे पद आहे.

राष्ट्रपती पदासाठी पात्रता

राज्यघटनेच्या कलम ५८ आणि ५९ मध्ये राष्ट्रपती पदाची निवडणूक लढवण्यासाठी तरतुदी स्पष्ट केलेल्या आहेत त्या अशा:-

(१) एक भारताचा नागरिक असावा.

(२) वयाची पस्तीस वर्षे पूर्ण केलेली असावीत.

(३) लोकसभेचे सभासद म्हणून निवडून येण्यासाठी आवश्यक असलेली पात्रता पूर्ण केलेलीअसावी.

(४) एखादी व्यक्ती भारत सरकारच्या किंवा कोणत्याही राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली अथवा उक्त सरकार पैकी कोणत्याही नियंत्रणाधीन असलेल्या कोणत्याही स्थानिक किंवा अन्य प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील कोणतेही लाभदायक पद धारण करत असेल, तर ती व्यक्ती राष्ट्रपती म्हणून निवडून येण्यास पात्र असणार नाही.

(५) राष्ट्रपती संसदेच्या कोणत्याही सभागृहाचा किंवा कोणत्याही राज्याच्या विधिमंडळाच्या सभागृहाचा सभासद नसावा. असे असेल तर राष्ट्रपती म्हणून निवड झाल्यानंतर सदर सभासदत्व आपोआप संपुष्टात येईल.

कालावधी

राज्यघटनेच्या कलम ५६ मध्ये असे स्पष्ट केले आहे की,

(१) राष्ट्रपती ज्या दिनांकास आपले अधिकार पद ग्रहण करतीन त्या दिनांकापासून पाच वर्षाच्या अवधीपर्यंत ते अधिकारपद धारण करतील.

(२) पाच वर्षाचा कालावधी संपण्यापूर्वी राष्ट्रपती राजीनामा देऊन ते पदमुक्त होऊ शकतो.

(३) राज्य घटनेचा भंग केला या कारणास्तव संसद महाभियोग द्वारे राष्ट्रपतीला बडतर्फ करू शकते.

(४) राष्ट्रपतींची मुदत संपली असता व नवीन राष्ट्रपती निवड झाली नसेल तर पुढील राष्ट्रपतीची निवड होईपर्यंत राष्ट्रपती त्या पदावर राहू शकतील.

राष्ट्रपतीची निवडणूक

(अ) राष्ट्रपती निवडणुकीसाठी निर्वाचन मंडळ

राष्टपतीच्या निवडणुकीच्या निर्वाचन मंडळात पुढील सभासदांचा मतदार म्हणून समावेश होतो. (कलम ५४)

(१) संसदेच्या दोन्ही सभागृहाचे निवडून आलेले सभासद

(२) सर्व राज्यांच्या फक्त विधानसभांचे निवडून आलेले सभासद

(३) केंद्रशासित प्रदेशांच्या विधानसभांचे निवडून आलेले प्रतिनिधी

(ब) राष्ट्रपतीच्या निवडीची निवडणूक पद्धती (कलम ५५)

राष्ट्रपतीची निवडणूक लोकसभा किंवा विधानसभे प्रमाणे केवळ प्रौढ मतदान व साध्या बहुमताने होत नाही तर त्यासाठी एक विशिष्ट निवडणूक पद्धती वापरली जाते. त्याला 'एकल संक्रमणीय मत

munotes.in

पद्धती' असे म्हणतात. राष्ट्रपतीच्या निवडणुकीत निवडून येण्यासाठी राष्ट्रपतीपदाच्या उमेदवाराला किमान मते प्राप्त करणे आवश्यक असते. त्याला कोटा पद्धती असे म्हणतात. या पद्धतीत मतपत्रिकेवर सर्व स्पर्धक उमेदवारांची नावे असतात. त्या नावाच्या पुढे अग्रक्रम नोंदवून मतदान करावयाचे असते. उदा.'अ''ब''क''ड' असे चार स्पर्धक उमेदवार आहेत, तर एक ते चार असे पसंती क्रमांक स्पर्धक उमेदवारांना द्यावयाची असतात मतमोजणीच्या वेळी जर एखाद्या उमेदवाराला मिळालेल्या एक क्रमांकाची मते किमान कोटा पूर्ण करणारी असतील, तर तो उमेदवार विजयी घोषित केला जातो. पहिल्या फेरीत अशी मते कोणाला मिळाली नाहीत तर पहिल्या पसंती क्रमांकाची सर्वात कमी मते मिळालेला उमेदवार स्पर्धेतून बाद केला जातो.व त्या उमेदवाराच्या मतपत्रिकेवर दुसरा पसंती क्रमांक असलेली मते विभागली जातात. अशा रीतीने कोटा पूर्ण होईपर्यंत ही प्रक्रिया सुरू असते. कोटा पूर्ण करणारा उमेदवार विजयी घोषित केला जातो.

(क) मतदारांच्या मतांचे मूल्य व कोटा पद्धती निश्चित करणारी सूत्रे

राष्ट्रपतीच्या निवडणुकीसाठी असलेल्या निर्वाचन मंडळात संसदेच्या दोन्ही सभागृहांचे निवडून आलेले सभासद व राज्यांच्या विधानसभांच्या सभासद यांचा समावेश होतो. परंतु काही राज्य मोठी, तर काही राज्य लहान आहेत. त्यामुळे खासदारांची व आमदारांची राज्यनिहाय संख्या कमी अधिक आहे. म्हणून त्यांच्या मतांचे मूल्य निर्धारित करून प्रत्येक राज्याला सामान्य देण्याचाही प्रयत्न केला आहे. त्यासंबंधीची काही सूत्रे पुढीलप्रमाणे:-

(१) विधानसभेच्या प्रत्येक मताचे मूल्य -

$$\frac{\text{राज्याची लोकसंख्या}}{\text{विधानसभेच्या प्रत्येक सभासदांची संख्या}} \times \frac{1}{1000} = \text{विधानसभेच्या प्रत्येक निवडून आलेल्या सभासदाचे मुल्य}$$

(२) वरील सूत्रानुसार राज्यातील विधानसभेच्या निवडून आलेल्या सभासदांना प्राप्त झालेली मते लोकसभा व राज्यसभेच्या निवडून आलेल्या सभासदांची संख्या याची तुलना करून लोकसभा व राज्यसभेच्या सभासदांचे मूल्य ठरविण्याचे सूत्र:-

$$\frac{\text{सर्व राज्यातील विधानसभा मध्ये निवडून आलेल्या सदस्यांना प्राप्त झालेली एकूण मते}}{\text{लोकसभा व राज्यसभा यांच्या निवडून आलेल्या सदस्यांची संख्या}} =$$

संसदेच्या प्रत्येक निर्वाचित एका सभासदाचे मूल्य

(३) एकल संक्रमणीय मतपद्धतीनुसार निवडून येण्यासाठी किमान मते किंवा कोटा पूर्ण होण्यासाठी वापरावयाचे सूत्र:-

$$\frac{\text{एकूण मतांची संख्या}}{\text{निवडायच्या प्रतिनिधींची संख्या} + १} + १ = \text{कोटा किंवा किमान मते}$$

अशाप्रकारे वरील तीनही सूत्रांचा आधार घेऊन राष्ट्रपतीच्या निवडणुकीची प्रक्रिया पार पाडली जाते व किमान मते किंवा कोटा पूर्ण करणारा उमेदवार विजयी घोषित केला जातो.

आपली प्रगती तपासा:-

प्रश्न :-

(१) राष्ट्रपतीच्या निवडणुकीची प्रक्रिया स्पष्ट करा.

mnotes.in

(२) राष्ट्रपतीच्या निवडणुकीसंदर्भात मतदारांचे मूल्य व मतमोजणी प्रक्रियेची थोडक्यात माहिती लिहा.

राष्ट्रपतीचे अधिकार व कार्य:-

राज्यघटनेच्या कलम ५३ नुसार राष्ट्रपतीचे अधिकार स्पष्ट केले आहेत. घटनेप्रमाणे सर्व अधिकार राष्ट्रपतीला दिले आहेत. हे अधिकार पंतप्रधान व मंत्रिमंडळ यांच्या सल्ल्याने वापरावयाचे आहेत. असे असले तरी राष्ट्राच्या घटनात्मक प्रमुख म्हणून सर्व प्रकारचे कायदे व धोरणांना राष्ट्रपतींची मान्यता आवश्यक असते. त्या दृष्टिकोनातून राष्ट्रपतीचे अधिकार व्यापक स्वरूपाचे आहेत. ते पुढीलप्रमाणे:-

(अ) कार्यकारी व प्रशासकीय अधिकार

या अधिकारा अंतर्गत विविध प्रकारच्या नियुक्त्या, शासनाचे संचालन,मंत्रिमंडळा संबंधित अधिकारी, परराष्ट्रसंबंध अधिकार, सैन्यासंबंधी अधिकार इत्यादी अधिकारांचा समावेश होतो.

(१) नियुक्तीसंबंधीचे अधिकार :- भारतीय संघराज्यातील महत्त्वाच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे, हा राष्ट्रपतीचा अधिकार आहे. उदाहरणार्थ. पंतप्रधान, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश, राज्यांचे राज्यपाल, राजदूत, महान्यायवादी, महालेखा परीक्षक, लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष अशा महत्त्वपूर्ण पदाधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्याशिवाय विविध प्रकारांच्या आयोगाची नियुक्ती करण्याचा राष्ट्रपतीला अधिकार आहे. उदा. निर्वाचन आयोग, वित्त आयोग, राज्य भाषा आयोग, योजना आयोग, मागासवर्गीय आयोग इत्यादी. कलम ७७ अनुसार भारताच्या केंद्र सरकारच्या संपूर्ण प्रशासनाची कार्यवाही राष्ट्रपती च्या नावाने चालते. राष्ट्रपती हा संपूर्ण प्रशासनाचा अध्यक्ष असून संसदेद्वारा घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करणे, हे प्रशासनाचे महत्त्वाचे कार्य आहे.

(२) मंत्रिमंडळ संबंधी अधिकार:- राष्ट्रपतीला पंतप्रधानांची व त्याच्या सल्ल्याने इतर मंत्र्याची नियुक्ती करण्याचा अधिकार आहे. मंत्र्यामध्ये कार्याचे विभाजन तसेच प्रधानमंत्री यांना बोलावून देशाच्या विविध समस्यांवर चर्चा करणे, मंत्रिमंडळात द्वारे घेतलेल्या निर्णय संबंधी माहिती करून घेणे, इत्यादी कार्ये राष्ट्रपतिद्वारा केली जातात. थोडक्यात केंद्रीय मंत्री मंडळाचे नेतृत्व करणे ही राष्ट्रपती ची जबाबदारी आहे.

(३) परराष्ट्रविषयक अधिकार:- राष्ट्रपती हा भारताचा घटनात्मक प्रमुख असल्याने आंतरराष्ट्रीय क्षेत्रात ते आपल्या राष्ट्राचे प्रतिनिधित्व करतात. विदेशात विविध देशात राजदुतांची नेमणूक राष्ट्रपती द्वारे केली जाते. इतकेच नव्हे तर परदेशात बरोबर केले जाणारे करार हे राष्ट्रपती च्या नावाने केले जातात. थोडक्यात परराष्ट्रसंबंध राजकारणाच्या संदर्भात राष्ट्रपती हेच आपल्या देशाचे प्रतिनिधित्व करतात.

(४) लष्कर विषयक अधिकार:- राष्ट्रपती हे भारताच्या भारतीय पायदळ, हवाई दल, नौसेना या तीनही लष्करी दलाचे प्रमुख असतात. सैन्यदल प्रमुखांच्या नियुक्त्या करणे, त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे, युद्ध घोषित करणे किंवा युद्धाची समाप्ती करणे, लष्करात सज्जतेचा आदेश देणे इ.कार्ये राष्ट्रपतिद्वारा केली जातात. अर्थात ही सर्व कामे प्रत्यक्षात पंतप्रधान, संरक्षण खात्याशी संबंधित मंत्री व अधिकारी यांच्या सल्ल्यानेच करावयाची असतात. संसद वेळोवेळी संरक्षण विषयक कायदे करीत असते, त्यांना राष्ट्रपती द्वारे मान्यता दिली जात. थोडक्यात लष्कर विषयक व्यापक अधिकार राष्ट्रपतीला असले तरी ते मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने वापरावयाचे असतात.

munotes.in

(ब) कायदेविषयक अधिकार

राष्ट्रपती हा संसदेचा घटनात्मक प्रमुख असतो. त्यामुळे राष्ट्रपतीला काही कायदेविषयक अधिकार प्राप्त झाले आहेत.

(१) **संसद विषयक अधिकार:–** कायदे करणे हा संस्थेचा अधिकार आहे. या संसदेचे अधिवेशन बोलाविणे दोन्ही सभागृहांच्या संयुक्त अधिवेशनात भाषण करणे, त्याद्वारे राज्य शासनाच्या धोरणांची माहिती देणे, संसदेचे विशेष अधिवेशन बोलावणे, असाधारण परिस्थितीत संसद विसर्जित करणे, इत्यादी अधिकार राष्ट्रपतीला आहेत.

(२) **विधेयकाला अंतिम मान्यता:–** विधेयकाचे कायद्यात रूपांतर होण्यासाठी राष्ट्रपतीच्या सहिची आवश्यकता असते. सर्वसाधारण विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहाच्या मंजुरीनंतर ते राष्ट्रपतींच्या मान्यतेसाठी पाठविले जाते. त्यांच्या . सहीशिवाय विधेयकाचे कायद्यात रूपांतर होत नाही. थोडक्यात विधेयकाला अंतिम मंजुरी देण्याचा अधिकार राष्ट्रपतीला आहे.

(३) **संसदेवर नियुक्ती:–** राज्यसभेवर १२ व्यक्तींची नियुक्ती करण्याचा अधिकार राष्ट्रपतीला आहे. ज्या व्यक्ती साहित्य, कला, विज्ञान, समाज सेवा इत्यादी क्षेत्रांना संसदेवर प्रतिनिधि मिळावे या उद्देशाने या क्षेत्रातील व्यक्तींची नियुक्ती केली जाते. याशिवाय लोकसभेवर अँग्लो-इंडियन लोकांच्या दोन प्रतिनिधींची नियुक्ती करण्याचा अधिकार राष्ट्रपतीला आहे.

(४) **वटहुकूम:–** विशिष्ट कायद्याची आवश्यकता असेल, आणि संसदेचे अधिवेशन सुरू नसेल किंवा तात्काळ अधिवेशन बोलावण्यात शक्य नसेल, तर अशा काळात असा कायदा लागू होण्यासाठी राष्ट्रपती वटहुकूम काढू शकतात. अर्थात अशा वटहुकुमाला संसदेचे अधिवेशन सुरू झाल्यानंतर सहा आठवड्याच्या आत संसदेची मान्यता घ्यावी लागते. अन्यथा सहा महिन्यानंतर त्या वटहुकुमाची वैधता नष्ट होते. उदा. सध्याच्या सरकारने तीन तलाक संदर्भात वटहुकूम काढला व त्यानंतर अधिवेशनात ते लोकसभेत मंजूर करून घेतले. सध्या ते राज्यसभेच्या मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे.

(क) न्यायविषयक अधिकार

राष्ट्रपती हा भारताचा घटनात्मक प्रमुख असून तो न्याय व्यवस्थेचाही प्रमुख आहे. त्यामुळे त्यांना न्यायविषयक काही अधिकार आहेत. उदा. सर्वोच्च व उच्च न्यायालय न्यायालयाच्या न्यायाधीशांची नेमणूक, नियुक्ती करणे, उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या कामकाजासंबंधी केलेल्या नियमांना मान्यता देणे. इत्यादी. याशिवाय सर्वोच्च न्यायालयाने अपराधला दिलेल्या शिक्षेत बदल करण्याचा अधिकार राष्ट्रपतीला आहे. उदा. फाशीची शिक्षा झालेल्या व्यक्तीने राष्ट्रपतीकडे दयेचा अर्ज केला तर त्याचा विचार करून फाशीऐवजी स्वामी शिक्षा देणे किंवा त्याची शिक्षा माफ करणे. इत्यादी. याशिवाय सार्वजनिक हिताच्या प्रश्नाच्या संदर्भात राष्ट्रपती सर्वोच्च न्यायालयाचा सल्ला मागू शकतात. अर्थात असा सल्ला राष्ट्रपतींनी मानलाच पाहिजे असे बंधन नाही.

(ड) आर्थिक अधिकार

राष्ट्रपतीला आर्थिक बाबतीत पुढील अधिकार आहेत. (१) राष्ट्रपतीच्या नावानेच प्रत्येक वर्षाच्या सुरुवातीला आर्थिक अंदाजपत्रक लोकसभेत मांडले जाते.कोणतेही आर्थिक विधेयक राष्ट्रपतीच्या मान्यतेशिवाय लोकसभेत माडंता येत नाही. प्रथम राष्ट्रपतीची व नंतर संसदेची स्वीकृती अशी अर्थ विधेयकाची प्रक्रिया असते. संसदेच्या पूर्व संमती शिवाय राष्ट्रपती आकस्मित निधीच्या खर्चाची संमती देऊ शकतो. नंतर संसदेची मान्यता घेतली जाते. वित्तीय आयोग स्थापन करण्याचा अधिकार

munotes.in

राष्ट्रपतीला आहे. केंद्राला मिळणाऱ्या उत्पन्नाची केंद्र व राज्य सरकारांमध्ये विभागणी करणे, किंवा मागासलेल्या राज्यांना अनुदानाच्या स्वरूपात विशेष आर्थिक मदत करणे, भारताच्या संचित निधी मधून रकमा काढणे, जमा करणे इत्यादी संबंधीचे अन्य बाबींची व्यवस्था करण्यासाठी नियम करण्याचा अधिकार राष्ट्रपतीला आहे. अर्थात संसद कायदे बनवण्याच्या स्थितीत नसेल अशा काळातच राष्ट्रपती असे नियम करू शकतात. इत्यादी अर्थविषयक अधिकार राष्ट्रपतीला आहेत.

(इ) घटक राज्य संबंधित अधिकार

राष्ट्रपती हा संघराज्याचा प्रमुख असल्याने त्याचे केंद्राबरोबरच राज्याच्या कारभारावर नियंत्रण असते. राज्याच्या राज्यपालांची नियुक्ती राष्ट्रपती द्वारे केली जाते.राज्यपाल हा राष्ट्रपतीचा प्रतिनिधी असतो. राज्यपाल राज्याचे एखादे विधेयक राष्ट्रपतीच्या स्वीकृतीसाठी पाठवू शकतो. केंद्राद्वारे राज्यांवर परिणाम करणारे कर लागण्यापूर्वी राष्ट्रपतीची संमती आवश्यक असते. काही वेळेस राष्ट्रपतिद्वारा संघराज्याची केंद्र सरकारची काही कार्य राज्य सरकारवर सोपवली जातात. याशिवाय एखाद्या घटक राज्यांच्या विभाजनाच्या किंवा नवीन घटक राज्याच्या निर्मितीच्या विधेयकावर ही राष्ट्रपतीच्या सहीची गरज असते. थोडक्यात घटक राज्यांवर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार राष्ट्रपतीला आहे.

(ई) आणीबाणी विषयक अधिकार

देशांमध्ये वेगवेगळ्या कारणामुळे काही विशिष्ट परिस्थिती निर्माण होते की, ज्यामुळे देशाच्या ऐक्याला अखंडतेला धोका निर्माण होतो. किंवा देशातील कायदा व सुव्यवस्था नष्ट झालेली असते. देशातील स्वातंत्र्य धोक्यात येते. अशा वेळी देशाची ऐक्य आणि अखंडता टिकवून ठेवण्यासाठी आणीबाणी म्हणजेच राष्ट्रपती राजवट लागू करण्याचा अधिकार राष्ट्रपतीला देण्यात आलेला आहे. आणीबाणी तीन प्रकारची असते.

(१) **राष्ट्रीय आणीबाणी:** राज्यघटनेच्या कलम ३५२ नुसार प्रत्यक्ष युद्ध, युद्धाची भीती, देशांतर्गत यादवी या सारखी परिस्थिती निर्माण झाल्यास संपूर्ण राष्ट्रात आणीबाणी जाहीर केली जाते. अर्थात त्यासाठी संसदेच्या दोन्ही सभागृहांतील उपस्थित सदस्यांच्या २/३ बहुमताची मान्यता आवश्यक असते. या काळात नागरिकांचे मूलभूत अधिकार स्थगित केले जातात.

(२) **घटक राज्यासाठी आणीबाणी:** ३५६ कलमानुसार विशिष्ट राज्यासाठी किंवा राज्याच्या विशिष्ट भागासाठी आणीबाणी लागू केली जाते. विशेषत: घटक राज्याचे सरकार अस्थिर असेल, त्याचा कारभार घटनेप्रमाणे चालत नसेल किंवा राज्यांतर्गत बंडाळी सुरू असेल, अशा वेळी अशी आणीबाणी जाहीर केली जाते.

(३) **आर्थिक आणीबाणी:** ३६० कलमानुसार विशिष्ट परिस्थितीत आर्थिक आणीबाणी लागू करण्याचा अधिकार राष्ट्रपतीला आहे. देशाची आर्थिक स्थिती वाईट असेल, सर्वसाधारण प्रयत्नाने त्यात सुधारणा होण्याची शक्यता नसेल, अशा वेळी देशाला आर्थिक संकटातून काढण्यासाठी आर्थिक आणीबाणी राष्ट्रपतिद्वारा जाहीर केली जाते. अशा वेळी नागरिकांचे आर्थिक अधिकार स्थगित केले जातात. कर्मचाऱ्यांच्या पगारात कपात केली जाते. इत्यादी.

अशाप्रकारे देशाच्या एकता,अखंडता, स्वातंत्र्य, शांतता, आर्थिक स्थिती यांना धोका निर्माण झाल्यास देशात, किंवा राज्यात आणीबाणी लागू करण्याचा अधिकार राष्ट्रपतीला आहे. अशाप्रकारे राष्ट्रपतीला घटनेने व्यापक अधिकार दिलेले आहेत. असे असले तरी हे सर्व अधिकार मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने वापरावयाचे आहेत. अर्थात राष्ट्रपती पदावर असणाऱ्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वावर त्याच्या

munotes.in

सदसद्विवेकबुद्धीवर राष्ट्रपतीला कोणत्या अधिकारांचा कसा वापर करावा याचे अधिकार मिळू शकतात.

आपली प्रगती तपासा:-

(१) राष्ट्रपती पदासाठी आवश्यक असलेली पात्रता कोणती?

(२) राष्ट्रपती च्या निवडणुकीच्या प्रक्रियेची माहिती लिहा.

(३) राष्ट्रपतीच्या निवडणुकीसाठी असलेल्या निर्वाचन मंडळातील मतदारांचे मूल्य कसे निर्धारित केले जाते?

(४) राष्ट्रपतीचे अधिकार व कार्य कोणती यांचे चर्चा करा.

४.२ पंतप्रधान आणि केंद्रीय मंत्रिमंडळ

उद्दिष्टे:- संसदीय शासन पद्धतित सत्ता व अधिकार यांचा प्रत्यक्ष वापर करण्याचा अधिकार पंतप्रधानांना आहे. त्यामुळे पंतप्रधान संदर्भात माहिती करून देणे हे या पाठाचे मुख्य उद्दिष्ट आहे. तसेच पंतप्रधानांचे अधिकार व कार्ये यांची माहिती करून घेणे हेही या पाठाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

पंतप्रधान आणि केंद्रीय मंत्रिमंडळ

भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून भारताने संसदीय शासन पद्धतीचा स्वीकार केलेला आहे. संसदीय शासन पद्धतीत दोन प्रमुख असतात. त्याप्रमाणे भारतीय संसदीय शासन पद्धतीत राष्ट्रपती व पंतप्रधान हे दोन प्रमुख आहेत. राष्ट्रपती हे नामधारी तर पंतप्रधान हे वास्तव प्रमुख आहेत. भारत राज्याचा कारभार राष्ट्रपती च्या नावाने चालत असला तरी प्रत्यक्षात सत्तेचा वापर पंतप्रधान हेच करतात. भारतीय राज्यघटनेतील कलम ७४ (१) मध्ये स्पष्ट केले आहे की, ''राष्ट्रपतीस सहाय्य व सल्ला देण्यासाठी एक मंत्रीपरीषद असेल व राष्ट्रपती आपली कार्ये पार पडताना त्या सल्ल्यानुसार वागेल.'' (४२ वी घटनादुरुस्ती प्रमाणे) अर्थातच मंत्री परिषदेचा प्रमुख पंतप्रधान असल्याने मंत्री परिषदेचे सर्व अधिकार हे पंतप्रधानांनाच असतात. मंत्रिमंडळाने घेतलेला निर्णय, प्रशासन व देशातील स्थिती संबंधीची माहिती पंतप्रधान राष्ट्रपतीला देतात. थोडक्यात भारतीय संसदीय पद्धतीत पंतप्रधान हाच वास्तववादी प्रमुख आहे.

पंतप्रधानांची नियुक्ती व कार्यकाळ

पंतप्रधानांची नियुक्ती राष्ट्रपतिद्वारा केली जाते.परंतु लोकसभेत बहुमत प्राप्त पक्षाला किंवा बहुमतासाठी आघाडी घेतलेल्या पक्षांनी निवडलेल्या नेत्यांचीच पंतप्रधान पदावर नेमणूक करावी लागते. कोणत्याही पक्षाला बहुमत मिळाले नसेल किंवा आघाडीबाबत निर्णय होत नसेल, तर अशा असाधारण परिस्थितीत पंतप्रधानाच्या नेमणुकीसाठी राष्ट्रपती सदसद्विवेकबुद्धीचा वापर करतात.

पंतप्रधानाचा आणि मंत्रिमंडळाचा कालावधी पाच वर्षाचा असतो, परंतु मंत्रिमंडळाने संसदेचा विश्वास गमावल्यास कालावधी पूर्ण होण्यापूर्वी त्याला राजीनामा द्यावा लागतो. किंवा मुदतपूर्व पंतप्रधान राजीनामा देऊन कार्यमुक्त होऊ शकतो.

पंतप्रधानाचे अधिकार व कार्य

पंतप्रधान हा वास्तववादी प्रमुख असल्याने पंतप्रधानांना सर्वात अधिक अधिकार व सत्ता मिळालेली आहे. पंतप्रधानांचे अधिकार व कामे पुढील प्रमाणे :-

munotes.in

(१) **लोकसभेचा नेता:-** लोकसभेत या पक्षाला किंवा पक्षाच्या आघाडीला बहुमत मिळालेले असते, त्या पक्षाद्वारे किंवा पक्षांच्या आघाडी द्वारे आपल्या नेत्याची निवड केली जाते. त्याचीच पंतप्रधान म्हणून राष्ट्रपती नेमणूक करतात. सरकारची महत्त्वपूर्ण धोरणे पंतप्रधानच संसदेत घोषित करतात. आपल्या सहकार्या द्वारे संसदेत दिलेल्या भाषणांचे स्पष्टीकरण पंतप्रधानच करतात. धोरण व कायदया संबंधीच्या सर्व कार्यावर पंतप्रधानाचे नियंत्रण असते. लोकसभेचे अस्तित्वच पंतप्रधानावर अवलंबून असते. पंतप्रधान राजीनामा देऊन लोकसभा विसर्जित करण्याचा सल्ला राष्ट्रपतीला देऊ शकतात.म्हणूनच पंतप्रधानांना लोकसभेचा नेता म्हटले जाते.

(२) **मंत्रिमंडळाची निर्मिती व खातेवाटप:-** पंतप्रधान हा मंत्रिमंडळाचा प्रमुख असतो कॅबिनेट मंत्री, राज्यमंत्री, उपमंत्री अशा सर्वच प्रकारच्या मंत्र्याची नेमणूक पंतप्रधानाच्या मर्जीवर अवलंबून असते मंत्रिमंडळात कोणाला घ्यावे कोणत्या मंत्र्याला कोणते खाते द्यावे याचा निर्णय पंतप्रधानच घेतात. असे असले तरी देशातील सर्व धर्म, प्रदेश,भाषा व जाती यांना मंत्रिमंडळावर प्रतिनिधित्व मिळेल, याची दक्षता पंतप्रधानांना घ्यावी लागते. त्यामुळे समाजातील सर्व घटकांना समान प्रतिनिधित्व देऊन राष्ट्रीय एकात्मता व सामंजस्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. असे असले तरी मंत्र्याच्या निवडीवर खाते वाटपावर पंतप्रधानांचा प्रभाव असतो.

पंतप्रधान जशी मंत्र्याची नेमणूक आपल्या मर्जीप्रमाणेप्रमाणे करतात तसेच एखाद्या मंत्राचे काम समाधानकारक नसेल किंवा त्यांच्या कामगिरीबद्दल पंतप्रधानांना शाशंकता निर्माण झाली असेल तर पंतप्रधान अशा मंत्र्याचा राजीनामा घेऊ शकतात.

(३) **मंत्रिमंडळाच्या बैठकांची अध्यक्षता व निर्णय:-**

पंतप्रधान हा मंत्रिमंडळाचा प्रमुख असल्याने मंत्रिमंडळाच्या बैठकी चे अध्यक्ष पंतप्रधान असतात. असाधारण परिस्थितीत पंतप्रधानांच्या अनुपस्थितीत मंत्रिमंडळाची बैठक घेण्याची वेळ आल्यास, सर्वात ज्येष्ठ मंत्र्याच्या अध्यक्षतेखाली अशी बैठक होते. असे असले तरी मंत्रिमंडळाच्या बैठकीतील सर्व कार्यवाहीवर, निर्णयावर पंतप्रधानाचे नियंत्रण असते. पंतप्रधानाच्या मर्जीविरुद्ध कोणताही निर्णय घेतला जात नाही. इतकेच नव्हे तर कोणतीही मंत्री पंतप्रधानांच्या मान्यतेशिवाय मंत्रिमंडळाच्या बैठकीत कोणताही प्रस्ताव मांडू शकत नाही.

(४) **मंत्रिमंडळ आणि राष्ट्रपती यातील दुवा:-**

राज्यघटनेच्या कलम ७८ नुसार संघराज्याच्या कारभाराच्या प्रश्नासंबंधी मंत्री परिषदेचे सर्व निर्णय व विधीविधाना करिता आलेले सर्व प्रस्ताव राष्ट्रपतीस कळविणे, हे पंतप्रधानाचे कर्तव्य आहे. किंवा राष्ट्रपती स्वत: तशी माहिती मागवू शकतात, किंवा राष्ट्रपती आवश्यकता वाटल्यास नतंर एखाद्याविषयी पंतप्रधानाच्या माध्यमातून मंत्रिपरिषदेच्या विचार-विमर्श साठी मंत्री परिषदेत मांडू शकतात. थोडक्यात राष्ट्रपतीचा निर्णय मंत्रिमंडळाला कळवणे, व मंत्रिमंडळाच्या कामकाज निर्णयाची माहिती राष्ट्रपतीला देणे हे पंतप्रधानाचे काम आहे. पंतप्रधानाच्या परवानगीशिवाय कोणताही मंत्री राष्ट्रपतीची एखाद्या प्रस्तावावर चर्चा करू शकत नाही, किंवा भेटू शकत नाही.

(५) **नियुक्तीचे अधिकार:-**

घटनात्मक दृष्टीने उच्च अधिकारी व इतर महत्त्वाच्या नेमणुका राष्ट्रपतिद्वारा केल्या जात असल्या तरी पंतप्रधानांच्या सल्ल्याशिवाय अशा नेमणुका होऊ शकत नाही. उदा. उच्च

न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश, न्यायाधीश, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश, महान्यायवादी, राजदूत, राज्यपाल, सैन्याचे सेनापती, विविध आयोगाचे अध्यक्ष इत्यादी. यांची नियुक्ती अप्रत्यक्षरीत्या पंतप्रधानच करीत असतात.

(६) नोकरशाहीवर नियंत्रण:-

सरकारच्या धोरणांच्या अंमलबजावणीची जबाबदारी प्रशासनावर असते. प्रशासनातील अधिकारी व नोकरवर्ग शासनाची एकनिष्ठ असेल, तर शासनाची धोरणे व योजना लोकांपर्यंत पोहोचू शकतात. थोडक्यात शासनाचे यशापयश प्रशासनाशी नोकरशाहीशी निगडीत असते. म्हणूनच नोकरशाहीवर नियंत्रण ठेवणे व त्यांची कार्यक्षमता वाढविणे ही पंतप्रधानांची जबाबदारी आहे.

(७) संसदेच्या उपक्रमांवर नियंत्रण:-

पंतप्रधान हा संसदेच्या लोकसभा या महत्त्वाच्या सभाग्रहात बहुमत असलेल्या पक्षाचा नेता असतो. त्यामुळे मंत्रिमंडळा बरोबरच कायदेमंडळाच्या कामकाजावर त्याचा प्रभाव नियंत्रण असते. संसदेत कोणते विधेयक मांडावयाचे याचा निर्णय पंतप्रधान घेतात. प्रसंगानुरूप लोकसभा विसर्जित करण्याचा सल्ला पंतप्रधान राष्ट्रपतीला देतो. थोडक्यात लोकसभेचे अस्तित्वच पंतप्रधानाच्या मर्जीवर अवलंबून असल्याने खऱ्या अर्थाने तोच संस्थेचे नेतृत्व करतो.

(८) आणीबाणी विषयक अधिकार:-

राज्यघटनेच्या कलम ३५२,३५६ आणि ३६० नुसार अनुक्रमे राष्ट्रीय, विशिष्ट राज्यात व आर्थिक आणीबाणी लागू करण्याचा अधिकार राष्ट्रपतीला आहे. परंतु हा अधिकार पंतप्रधान व मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानेच वापरावयाचा असतो. म्हणून आणीबाणी विषयीचा अधिकार हा पंतप्रधानांनाच आहे.

(९) युद्धाची घोषणा व समाप्ती:-

संकटकाळात काही निर्णय घेण्याचा अधिकार पंतप्रधानांना आहे. देशावर परकीय आक्रमणाचा धोका निर्माण झाल्यास, युद्ध घोषित करणे व परिस्थितीचा आढावा घेऊन युद्ध समाप्त करणे. हा पंतप्रधानांचे अधिकार आहे. अर्थातच युद्धातील यश-अपयशाला आला पंतप्रधानांनाच जबाबदार धरले जाते.

(१०) आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्व:-

आंतरराष्ट्रीय राजकारण आणि संबंध याविषयी चा कारभार पाहण्यासाठी परराष्ट्र मंत्रालय असते. असे असले तरी भारताचे परराष्ट्र धोरण कसे असावे कोणत्या देशाशी कसे संबंध असावेत याचा निर्णय पंतप्रधानच घेतात. महत्त्वाच्या परिसरांमध्ये उदा. राष्ट्रकुल, सार्क इत्यादींमध्ये ते व्यक्तिश: देशाचे प्रतिनिधित्व करतात. जगातील अन्य राष्ट्रप्रमुखांशी व शासन प्रमुखांशी संपर्क ठेवणे, तसेच आंतरराष्ट्रीय प्रश्नावर आपल्या सरकारचे मत किंवा प्रतिक्रिया पंतप्रधानाच व्यक्त करतात.

(११) पुरस्कार प्रदान करणे:-

राष्ट्रनिर्मिती, राष्ट्रबांधणी व विविध क्षेत्रात महत्त्वपूर्ण व असाधारण कामगिरी करणाऱ्या भारतीय नागरिकांना भारतरत्न, पद्मविभूषण, पद्मभूषण, पद्मश्री असे पुरस्कार दिले

munotes.in

जातात. त्यासाठी निवड समिती असली तरी प्रत्यक्ष व्यवहारात या सर्वांवर पंतप्रधानांचा प्रभाव असतो. त्यांच्या सल्ल्यानेच हे पुरस्कार वितरित केले जातात.

(१२) पक्षनेता व पक्षावर नियंत्रण:-

पंतप्रधान ज्या पक्षाचा असतो, तो त्या पक्षाचा अध्यक्ष असतोच असे नाही. किंवा पक्षाध्यक्ष इतर कोणी असू शकतो. परंतु या पक्षावर पंतप्रधानाचे नियंत्रण असते. संपूर्ण देशाची सत्ता पंतप्रधानाच्या हातात असल्याने, पक्षाचे वर्चस्व वाढवणे, पुढील निवडणुकीसाठी पक्षाला तयार करणे, पक्ष कार्यकर्त्यांत चेतना निर्माण करणे हे पंतप्रधानांचे कार्य आहे. म्हणूनच तो पक्षाचा नेता असतो.तसेच जनतेचाही नेता असतो. शांततेच्या तसेच संकटाच्या काळात जनतेचे मनोधैर्य कायम राखणे व उंचावणे ही पंतप्रधानांची जबाबदारी आहे.

सारांश:-

अशा प्रकारे भारतीय संघराज्यात संसदीय पद्धतीत पंतप्रधान हाच सत्ताधारी प्रमुख आहे. अर्थात पंतप्रधान पदावर असलेल्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व एकाच पक्षाचे बहुमत इत्यादी घटकांमुळे या पदाच्या अधिकारात वाढ होत असते. उदा. सध्याचे पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी आपल्या हातात अमर्याद सत्ता घेतलेली आहे. याउलट आघाडीचे किंवा अनेक पक्षांचे सरकार असेल तर पंतप्रधानांच्या अधिकारावर अनेक मर्यादा येतात.

आपली प्रगती तपासा :-

(१) पंतप्रधाना साठी घटनेने निश्चित केलेली पात्रता सांगा

(२) पंतप्रधानांचे अधिकार व कार्ये यावर सविस्तर लिहा.

(३) पंतप्रधान हा वास्तविक प्रमुख आहे हे विधान स्पष्ट करा.

केंद्रीय मंत्रिमंडळ

उद्दिष्टे

(१) धोरणाच्या निर्मितीत मंत्रिमंडळाची असलेली भूमिका अभ्यासणे.

(२) मंत्रिमंडळाच्या रचनेची माहिती करून घेणे.

(३) भारताच्या केंद्रीय मंत्रिमंडळाची वैशिष्टये आणि कार्ये यांचा अभ्यास करणे.

प्रस्तावना

भारतात संसदीय शासन पद्धती आहे. या शासन पद्धतीत एक घटनात्मक प्रमुख तर दुसरा सत्तेचा वास्तवात वापर करणारा वास्तववादी प्रमुख असे दोन प्रमुख असतात. भारतीय घटनेच्या ७४ व्या कलमानुसार राष्ट्रपतीला त्याच्या कार्यात मदत करण्यासाठी व सल्ला देण्यासाठी पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ असेल, अशी तरतूद आहे. ४४ व्या घटनादुरुस्तीनुसार प्रधानमंत्री व मंत्रिमंडळाचा सल्ला राष्ट्रपतींवर बंधनकारक आहे. अर्थात मंत्रिमंडळाने दिलेला सल्ला राष्ट्रपती मान्य करण्यापूर्वी तो सल्ला पुनर्विचारासाठी मंत्रिमंडळाकडे पाठवू शकतात. परंतु तो पुन्हा कोणताही बदल न करता जसाचा तसा पुन्हा राष्ट्रपतींच्या मान्यतेसाठी पाठवल्यास तो राष्ट्रपतीला मान्य करावाच लागतो. या सर्व विवेचनावरून हे स्पष्ट होते की, संसदीय शासन प्रणालीत पंतप्रधान व मंत्रिमंडळ अधिक शक्तिशाली आहे. देशाच्या सर्वच विकासासंबंधीची सर्व प्रकारचे धोरणे निश्चित करून, त्याची अंमलबजावणी करण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी पंतप्रधान व मंत्रिमंडळ यांची असते.

munotes.in

पंतप्रधान हा मंत्रिमंडळाचा प्रमुख आणि निर्माता असतो. मंत्रिमंडळाचे अस्तित्वही पंतप्रधानाच्या मर्जीवर अवलंबून असते. पंतप्रधानाचा राजीनामा म्हणजे संपूर्ण मंत्रिमंडळाचा राजीनामा असतो. म्हणून मंत्रिमंडळाची सर्व सत्ता पंतप्रधानाच्या हातात एकवटलेली असते. असे असले तरी या सर्व सत्तेचा कार्यक्षमतेने वापर करण्यासाठी मंत्रिमंडळाची निर्मिती केली जाते व मंत्रिमंडळात सत्तेचे वितरण केले जाते.

केंद्रीय मंत्रिमंडळाची रचना:-

केंद्रीय मंत्रिमंडळात पंतप्रधानांसह कॅबिनेट मंत्री व इतर मंत्र्यांचा समावेश होतो. पंतप्रधान व मंत्री यांची नियुक्ती करण्याचा घटनात्मक अधिकार राष्ट्रपतीला आहे, परंतु वास्तवात त्यांच्या या अधिकारावर काही मर्यादा आहेत. मंत्रिमंडळाच्या निर्मिती व रचनेसंबंधी महत्त्वाचे मुद्दे पुढीलप्रमाणे-

(१) **<u>कॅबिनेट आणि मंत्रिमंडळ</u>:-** साधारणपणे कॅबिनेट (Cabinet) आणि मंत्रिमंडळ (Counicil of ministers) असे अधिकाराच्या दृष्टीने दोन विभाग आहेत. परंतु या दोन्ही विभागांना एकत्रित मंत्रिमंडळ असे म्हटले जाते. मंत्रिमंडळात पंतप्रधानांसह कॅबिनेट मंत्री, राज्यमंत्री, उपमंत्री या सर्वांचा समावेश होतो. अधिकाराच्या व जबाबदारीच्या दृष्टीने हे प्रकार पाडण्यात आले आहेत.

(अ) कॅबिनेट मंत्री:- कॅबिनेट मंत्री हा त्या विशिष्ट खात्याचा प्रमुख मंत्री असतो. कॅबिनेटमध्ये अशा निवडक १५ ते २० मंत्र्यांचा समावेश होतो. हा मंत्रिमंडळाचा महत्त्वाचा भाग असतो. धोरण निर्मितीची जबाबदारी पंतप्रधानांसह कॅबिनेटची असते. मंत्री मंडळाचे सर्व अधिकार आणि सत्ता कॅबिनेट वापरत असते. पंतप्रधानाद्वारे मंत्री मंडळाच्या बैठकीसाठी कॅबिनेट मंत्र्यांना निमंत्रित केले जाते.

(ब) राज्यमंत्री:- हे दुसऱ्या दर्जाचे मंत्री असतात. यातील काही मंत्र्यांना एखाद्या स्वतंत्र विभागाचे प्रभारी म्हणून नेमले जाते. तर काही कॅबिनेट मंत्र्यांना सहकार्य करण्याचे काम करतात. आवश्यकतेनुसार पंतप्रधान त्यांना मंत्री मंडळाच्या बैठकीसाठी निमंत्रित करतात.

(क) उपमंत्री :- हे तिस-या दर्जाचे मंत्री असतात. हे कोणत्याही विभागाचे प्रमुख किंवा प्रभारी नसतात. कॅबिनेट मंत्री व राज्यमंत्री यांना सहाय्य करण्याचे ते काम करतात.

मंत्रिमंडळात वरील तीन प्रकारच्या मंत्र्यांशिवाय संसदीय सचिव, स्थायी सचिव, अतिरिक्त सचिव व अधीक्षक याचीही पंतप्रधानांकडून नियुक्ती केली जाते. स्थायी सचिव, अतिरिक्त सचिव व अधीक्षक हे कायमस्वरूपी अधिकारी असतात. अशाप्रकारे मंत्रिमंडळात वरील सर्वांचा समावेश होत असला तरी कॅबिनेट व इतर सर्व यामध्ये अधिकार व सत्तेच्या बाबतीत विषम विभागणी केली असून कॅबिनेट अधिक शक्तिशाली आहे.

(२) **<u>पंतप्रधानांची नियुक्ती</u>**:- राज्यघटनेच्या कलम ७४ प्रमाणे राष्ट्रपती हे पंतप्रधानांची नियुक्ती करतात ही तरतूद आहे. परंतु प्रत्यक्षात असाधारण परिस्थिती शिवाय राष्ट्रपतींना आपल्या मर्जीप्रमाणे पंतप्रधानाची नियुक्ती करता येत नाही. तर लोकसभेमध्ये ज्या पक्षाचे बहुमत आहे, त्या पक्षाने निवडलेल्या नेत्याची पंतप्रधान म्हणून नेमणूक करणे राष्ट्रपतींवर बंधनकारक आहे. परंतु जेव्हा लोकसभेत कोणत्याच पक्षाला स्पष्ट बहुमत मिळत नाही किंवा काही पक्ष एकत्र येऊन बहुमत सिद्ध करण्याचा कोणी दावा करत नाही किंवा बहुमत सिद्ध करण्यास कोणत्याच पक्षाचा प्रतिसाद मिळत नाही, अशावेळी लोकसभेत सर्वाधिक जागा मिळवणाऱ्या पक्षाच्या नेत्याला किंवा आपल्या सद्सद्विवेक बुद्धी नुसार राष्ट्रपती इतर कोणत्याही पक्षाच्या नेत्याला त्याच्या संमतीने पंतप्रधान पदावर नियुक्त करू शकतात.

munotes.in

(३) **<u>कॅबिनेट मंत्री व इतर मंत्र्याची नियुक्ती:-</u>** राज्यघटनेनुसार राष्ट्रपती पंतप्रधानांच्या सल्ल्यानुसार इतर मंत्र्याची नियुक्ती करतात. याचाच अर्थ मंत्रिमंडळातील सर्व प्रकारच्या मंत्र्यांच्या नियुक्तीचा सर्व अधिकार पंतप्रधानाचा आहे. पंतप्रधान मंत्र्यांची यादी तयार करून राष्ट्रपतीला सादर करतात. त्यानुसार राष्ट्रपती त्यांनी घटनेप्रमाणे शपथ देऊन, त्यांची मंत्री म्हणून नियुक्ती करतात. राष्ट्रपतीला आपल्या मर्जीनुसार एकाही मंत्र्यांची नियुक्ती करता येत नाही. असे असले तरी मंत्र्यांची नियुक्ती करताना संकेतानुसार पंतप्रधान यांनाही काही मर्यादांचे पालन करावे लागते. उदा. निवडणूकपूर्व आघाडी असेल तर सर्व पक्षांना मंत्रिमंडळात प्रतिनिधित्व देणे, देशातील सर्व घटक राज्यांना प्रतिनिधित्व देणे, सामाजिक धार्मिक सलोख्यासाठी सर्व समाज घटकांना प्रतिनिधित्व मिळेल अशा पद्धतीने मंत्र्यांची निवड करावी लागते. असे संकेत पाळताना अनेक वेळा पंतप्रधानाची इच्छा असून एखाद्या व्यक्तीला मंत्रीपद देता येत नाही.

(४) **<u>मंत्र्यांची पात्रता</u>**:- मंत्र्यांची शैक्षणिक पात्रते संबंधी राज्य घटनेत स्पष्ट उल्लेख नाही. परंतु मंत्रिपदावर ज्या व्यक्तीशी निवड करावयाची आहे, ती संसदेच्या दोन्ही सभागृहा पैकी एका सभागृहाची सभासद असणे बंधनकारक आहे. अर्थात पंतप्रधान मंत्री पदावर अशा व्यक्तीचीही नियुक्ती करू शकतात की, जी या दोन्ही सभागृहाची सभासद नाही. परंतु अशा व्यक्तीला नियुक्त केले त्या तारखेपासून पुढील सहा महिन्यात दोन पैकी एका सभागृहाचे सभासदत्व मिळवणे बंधनकारक आहे. अन्यथा कालावधी संपताच त्याचे मंत्रीपद संपुष्टात येते. थोडक्यात संसदेच्या दोन्ही सभागृहा पैकी एका सभागृहाचे सभासद असणे हीच मंत्री पदासाठी पात्रता आहे. इतर कसोटच्या कोणत्या असाव्यात हे पंतप्रधानावर अवलंबून आहे.

(५) **<u>मंत्रिमंडळातील मंत्र्यांची संख्या</u>**:- मंत्रिमंडळात किती सदस्य असावेत याबाबत निश्चितता नव्हती. परंतु २००३ मध्ये झालेल्या ९१ व्या घटनादुरुस्तीनुसार {७५(१क)} पंतप्रधान तसेच मंत्री यांची एकूण संख्या, लोकसभेतील एकूण सदस्यसंख्येच्या पंधरा टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही, अशी तरतूद करण्यात आली आहे.

(६) **<u>मंत्रिमंडळाचा कालावधी</u>**:- राज्यघटनेच्या कलम ७५(२) नुसार ''राष्ट्रपतींची मर्जी असेपर्यंत मंत्री अधिकारपदे धारण करतील''असे स्पष्ट केले आहे. परंतु वास्तवात मंत्रिमंडळ हे संसदेला जबाबदार असते. म्हणून जोपर्यंत लोकसभेचा मंत्रिमंडळावर विश्वास आहे, तोपर्यंत मंत्रिमंडळ सत्तेवर असते. जर लोकसभेने मंत्रिमंडळावर अविश्वास दर्शक ठराव मंजूर केला तर मंत्रिमंडळाला मुदतपूर्व राजीनामा द्यावा लागतो. साधारण परिस्थितीत लोकसभेच्या कालावधी इतका म्हणजेच पाच वर्ष हा मंत्रिमंडळाचा कालावधी असतो. परंतु मंत्रिमंडळातील मंत्री यांचा कालावधी पंतप्रधानाच्या मर्जीवर अवलंबून असतो.

(७) **<u>खातेवाटप</u>**:- कोणत्या खात्याचा कारभार कोणत्या मंत्र्याकडे सोपवावा याचा सर्व अधिकार पंतप्रधानांचा आहे. ते एका कॅबिनेट मंत्र्याकडे कडे एक किंवा अधिक खात्याचा पदभार देऊ शकतात. कार्यकाळ पूर्ण होण्यापूर्वी ते एखाद्या मंत्र्यांकडून एखाद्या खात्याचा पदभार काढून दुसऱ्या मंत्र्याकडे देऊ शकतात. थोडक्यात खाते वाटप करणे सर्वस्वी पंतप्रधानांच्या हातात असते.

(८) **<u>वेतन व भत्ते</u>**:- राज्यघटनेच्या कलम ७५(६) मध्ये स्पष्ट केले आहे की, ''मंत्र्यांचे वेतन व भत्ते संसद कायद्याद्वारे वेळोवेळी निर्धारित करील त्या प्रमाणे असतील'' थोडक्यात वेतन व भत्ते यासंबंधी संसदेला अधिकार दिलेले आहेत.

munotes.in

अशा प्रकारे केंद्रीय मंत्रिमंडळाची रचना असून केंद्रीय मंत्रिमंडळात सर्व शक्तिशाली पंतप्रधान हेच आहेत. असे असले तरी केंद्रीय मंत्रिमंडळावर संसदेचे नियंत्रण असते. पंतप्रधानांसह मंत्रिमंडळ घटनाबाह्य किंवा हुकूमशाही वृत्तीने काम करीत असेल तर त्यासंबंधी संसदेत सरकारला धारेवर धरले जाते. म्हणून घटनात्मक चौकटीचे पालन करूनच मंत्रिमंडळाला कार्य करावे लागते.

आपली प्रगती तपासा

केंद्रीय मंत्रिमंडळाची रचना स्पष्ट करा.

केंद्रीय मंत्रिमंडळाची वैशिष्टये:-

राष्ट्रपती,पंतप्रधान,मंत्रीमंडळ आणि संसद यांचा परस्पर संबंध असल्याने संसदीय शासन प्रणालीत केंद्रीय मंत्रिमंडळाची काही खास वैशिष्टये दिसून येतात. ती पुढीलप्रमाणे:-

(१) **पंतप्रधान हा मंत्रिमंडळाचा प्रमुख व निर्माता:-** घटनात्मक तरतुदीनुसार राष्ट्रपती पंतप्रधानाची नियुक्ती करून त्याच्या सल्ल्याने इतर मंत्र्यांची नियुक्ती करतो. परंतु वास्तवात मंत्रिमंडळातील मंत्र्यांच्या नियुक्तीचा सर्व अधिकार पंतप्रधानांनाच आहे. पंतप्रधान हा मंत्रिमंडळाचा प्रमुख असतो. तोच मंत्रिमंडळाची निर्मिती व प्रत्येक मंत्र्यांची जबाबदारी निश्चित करतो. पंतप्रधानांचा राजीनामा हा संपूर्ण मंत्रिमंडळाचा राजीनामा मानला जातो. मंत्रिमंडळातील सर्व मंत्र्यांना मार्गदर्शन करणे, योग्य त्या सूचना देणे, मंत्रिमंडळाच्या कार्यावर नियंत्रण ठेवणे,आवश्यकता वाटल्यास एखाद्या मंत्र्यांचा राजीनामाही मागणे इत्यादी मार्गाने पंतप्रधान मंत्री मंडळावरील आपले वर्चस्व अबाधित ठेवतात.

(२) **संसदेचे सभासदत्व सक्तीचे:-** पंतप्रधानांसह सर्व प्रकारच्या मंत्र्यांना मंत्रिपदावर राहण्यासाठी संसदेच्या दोन पैकी एका सभागृहाचे सभासद होणे सक्तीचे आहे. मंत्रिपदावर नियुक्तीच्या वेळी संबंधित व्यक्ती सभासद नसेल तर सहा महिन्याच्या कालावधीच्या आत त्याला कोणत्यातरी एका सभागृहाचे सभासदत्व घ्यावेच लागते अन्यथा कालावधी संपताच त्याला राजीनामा द्यावा लागतो. थोडक्यात मंत्रिमंडळाचा सभासद हा संसदेचा सभासद असावाच लागतो.

(३) **संयुक्त जबाबदारी:-** संयुक्त जबाबदारी हे संसदीय शासनपद्धती चे महत्त्वाचे वैशिष्टच आहे. राज्यघटनेच्या कलम ७५(३) मध्ये "मंत्रिपरिषद लोकसभेला सामुदायिकपणे जबाबदार असेल'' असे स्पष्ट केले आहे.याचा अर्थ असा की, लोकसभेचा मंत्रिमंडळावर विश्वास आहे तोपर्यंत ते सत्तेवर राहील. जर लोकसभेने मंत्रिमंडळावर अविश्वास ठराव मंजूर केला तर सर्व मंत्रिमंडळाचा तो राजीनामा असेल. मग यातील मंत्री लोकसभेचे किंवा राज्यसभेचे असले तरी ते मंत्री पदावर राहू शकत नाहीत. दुसरे असे की, मंत्रिमंडळाने घेतलेला निर्णय सर्व मंत्री यांच्यावर बंधनकारक असतो. मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेताना आपले विरोधी मत ते व्यक्त करू शकतात. परंतु अंतिमत: घेतलेला एखाद्या मंत्र्याला मान्य नसला तरी तो संपूर्ण मंत्रिमंडळाचा निर्णय असल्याने तो त्याला मान्य करावाच लागतो. अन्यथा निर्णयाला विरोध करणाऱ्या मंत्र्यांला राजीनामा द्यावा लागतो किंवा पंतप्रधान अशा मंत्र्यांचा राजीनामा मागू शकतात. थोडक्यात मंत्रिमंडळाच्या निर्णयाला संसदेत व संसदेबाहेर पाठिंबा द्यावाच लागतो. तिसरे असे की सामुदायिक जबाबदारीच्या सिद्धांतानुसार एखाद्या मंत्री आपल्या कार्यासाठी एकटाच जबाबदार नसतो. तर त्यासाठी संपूर्ण मंत्रिमंडळ जबाबदार असते. उदा. एखादे सरकारी विधेयक लोकसभेत मंजूर झाले नाही तर ते विधेयक मांडणाऱ्या मंत्र्याचे ते

अपयश नसून ते संपूर्ण मंत्रिमंडळाचे अपयश आहे. अशावेळी संपूर्ण मंत्रिमंडळाला राजीनामा द्यावा लागतो यालाच सामुहिक जबाबदारीचे तत्व असे म्हणतात.

(४) **संसदेच्या बहुमताचे प्रतिनिधित्वः-** मंत्रिमंडळ हे संसदेचे नेतृत्व करते संसदेच्या कनिष्ठ सभागृहात ज्या पक्षाला बहुमत मिळते त्या पक्षाच्या नेत्याची पंतप्रधान म्हणून राष्ट्रपती नियुक्ती करतात. अर्थात कोणत्याही पक्षाला बहुमत मिळाले नाही तर अनेक पक्षांची युती आघाडी करून बहुमत सिद्ध करावे लागते. म्हणजेच मंत्रिमंडळाच्या अस्तित्वासाठी बहुमत असणे आवश्यक आहे.त्याशिवाय मंत्रिमंडळ धोरणांची निर्मिती व त्यांची अंमलबजावणी करूच शकत नाही. याचा अर्थ असा की मंत्रिमंडळ हे संसदेतील बहुमताचे प्रतिनिधित्व करते.

(५) **गोपनीयताः-** सर्व मंत्रिमंडळातील बैठका तसेच कार्यवाही व निर्णय संबंधित गुप्तता पाळण्याचे बंधन मंत्र्यावर असते राष्ट्रपती मंत्र्यांना अधिकारपदग्रहण करण्यापूर्वी मंत्रिपदाची शपथ देतात. त्यात गुप्ततेच्या शक्तीचाही समावेश असतो राज्यघटनेच्या कलम ७५ (४) मध्ये तसा स्पष्ट उल्लेख आहे. या शपथेत असा उल्लेख आहे की,"..... संघराज्याचा मंत्री म्हणून माझ्या विचारार्थ आणली जाईल किंवा मला साथ होईल अशी कोणतीही बाब, असा मंत्री म्हणून माझी कामे यथायोग्य पार पाडण्यासाठी आवश्यक असेल ते खेरीज करून एरव्ही मी कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष कळवणार नाही किंवा त्यांच्याकडे उघड करणार नाही.'' थोडक्यात मंत्र्यांच्या कामकाजा खेरीज इतर बाबीसंबंधी गुप्तता पाळणे मंत्र्यांवर बंधनकारक आहे.

<u>विचारधारेतील समानताः-</u>

संसदेच्या कनिष्ठ सभागृहात ज्या पक्षाला बहुमत प्राप्त होते, त्याच पक्षाचे निवडून आलेले प्रतिनिधी मंत्रिमंडळात समाविष्ट केले जातात. प्रत्येक पक्षाची एक विचारधारा किंवा एक विचारसरणी असते. ती पक्षातील सर्वांना मान्य असते. म्हणून मंत्रिमंडळातील सर्व सभासद हे समान विचारधारेचे असतात. अनेक वेळा कोणत्याही पक्षाला बहुमत मिळाले नाही तर विविध विचारधारेचे राजकीय पक्ष एकत्र येऊन सरकार बनवितात. अशावेळी मंत्रिमंडळात विविध विचारधारेचे तर कधी परस्पर विरोधी विचारधारेचे पक्ष एकत्र येतात. अशावेळी यात समन्वय साधला नाही तर संघर्ष होतो. तो टाळण्यासाठी भिन्न विचार बाजूला ठेवून सर्वांना मान्य होतील अशा विचारांवर ते एकत्र येतात. त्या विचाराप्रमाणे धोरणे आखली जातात. यालाच 'किमान समान कार्यक्रम' असे म्हणतात. थोडक्यात सरकार एका पक्षाचे असो की अनेक पक्षांचे परंतु त्यांच्यात विचारधारेबाबत समानता असणे आवश्यक आहे.तरच मंत्रिमंडळ आपला घटनात्मक कार्यकाळ पूर्ण करू शकते.

अशाप्रकारे संसदीय शासन प्रणालीतील मंत्रिमंडळाची काही महत्त्वाची वैशिष्टये आहेत.

<u>आपली प्रगती तपासा</u>

केंद्रीय मंत्रिमंडळाची वैशिष्टये कोणती?

केंद्रीय मंत्रिमंडळाची कार्ये:-

राज्यघटनेनुसार कार्यकारी मंडळाचे घटनात्मक प्रमुख राष्ट्रपती असतात. त्यानुसार कार्यकारी मंडळाचे सर्व अधिकार राष्ट्रपतीला आहेत. परंतु प्रत्यक्षात हे सर्व अधिकार पंतप्रधानांना असून त्यांच्या सल्ल्यानेच राष्ट्रपतीला कार्यकारी मंडळाचे अधिकार वापरावयाचे आहेत. थोडक्यात मंत्रिमंडळाचा प्रमुख म्हणून पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाचे कामकाज चालते. मंत्रिमंडळाची महत्त्वपूर्ण कार्य पुढील प्रमाणे.

muroles.in

१) **धोरण निर्धारित करण:-** भारताच्या अंतर्गत आणि बाह्य अशा सर्वच बाबींविषयी धोरण ठरवण्याचा अधिकार मंत्रिमंडळाचा आहे. उदा. आर्थिक विकास संबंधीचे धोरण, सामाजिक सलोख्या विषयक उद्योग, व्यापार, शिक्षण, बेरोजगारी निर्मूलन विषयक धोरण अशा अंतर्गत धोरणा शिवाय परराष्ट्र संबंधीची धोरणे, युद्ध, शांतता, देशांचे संरक्षण इत्यादी विषयी धोरण निश्चित करण्याचा अधिकार पंतप्रधानांसह मंत्रिमंडळाचा आहे. अर्थात या धोरणांना संसदेची मान्यता मिळवावी लागते. कारण संसदेत लोकांचे प्रतिनिधी असतात. थोडक्यात धोरणे मंत्रिमंडळ ठरवित असले तरी अशी धोरणे लोकाभिमुक असावीत याची मंत्रिमंडळाला काळजी घ्यावी लागते.

(२) **धोरणांची अंमलबजावणी:-** मंत्रिमंडळाने संसदेची मान्यता घेऊन निश्चित केलेल्या धोरणांची अंमलबजावणी करणे हे मंत्रिमंडळाचे महत्त्वाचे कार्य आहे. धोरणांच्या अंमलबजावणीवरच त्या धोरणांचे यश-अपयश अवलंबून असते. केवळ धोरण चांगले असून चालत नाही, तर त्याची कार्यक्षमतेने अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी अधिकारी वर्ग दुयम अधिकारी व सेवक वर्ग, विविध समित्या तयार करून त्यावर अधिकाऱ्यांच्या नेमणुका करणे धोरणानुसार त्यांची विविध खात्यात विभागणी करून, त्या खात्याच्या मंत्र्यासह त्यांच्या सहकारी मंत्री व कर्मचारी यांच्याकडे कार्यवाहीचे अधिकार देणे. इत्यादी कार्य मंत्रिमंडळाला करावी लागतात.

(३) **कायदे विषयक कार्ये:-** कायदा करणे हे संसदेचे म्हणजेच कायदे मंडळाचे कार्य आहे. असे असले तरी विधेयक तयार करणे ते संसदेत मांडणे इत्यादी कार्य संबंधित खात्याच्या मंत्री यानांच करावे लागते. धोरणाची कार्यवाही करण्यापूर्वी ती धोरणे संसदेत मंजूर करून घेणेहे मंत्रिमंडळाचे कार्य आहे याशिवाय संसदेचे अधिवेशन बोलाविणे, राष्ट्रपतींचे भाषण तयार करणे महत्त्वाचे म्हणजे संसद विसर्जित करण्याचा अधिकारही मंत्रिमंडळाला आहे.

(४) **अर्थविषयक कार्ये:-** देशाची अर्थव्यवस्था सक्षम करण्याची जबाबदारी मंत्रीमंडळाची आहे. त्यादृष्टीने आर्थिक धोरणे निश्चित करणे, अंदाजपत्रक तयार करून ते संसदेकडून मंजूर करून घेणे, विविध प्रकारचे कर निर्धारित करणे व त्यांची वसुली करणे, कर्जरोखे इत्यादी स्वरूपात पैसा उभारणे, परकीय चलन वाढविणे, उद्योग व्यापाराला चालना देणारी धोरणे आखणे इत्यादी अर्थविषयक कार्ये कार्यकारी मंडळाला करावी लागतात.

(५) **परस्पर सहकार्य व समन्वय:-** धोरण निश्चित करणे हे जसे मंत्रिमंडळाचे कार्य आहे, त्याचप्रमाणे त्या धोरणाची अंमलबजावणी करणे हे सुद्धा मंत्रिमंडळाचे कार्य आहे. विशिष्ट धोरण हे विशिष्ट खात्याशी संबंधित असले तरी त्याच्या अंमलबजावणी वेळी त्याचा विविध खात्यांशी संबंधित येतो. म्हणून धोरणांची अंमलबजावणी करण्यासाठी विविध खात्यांमध्ये तसेच संबंधित सर्व मंत्र्यामध्ये योग्य सहकार्य व समन्वय साधणे आवश्यक आहे. त्यासाठी कॅबिनेटला समन्वय समिती द्वारे महत्त्वाचे कार्य करावे लागते.

(६) **परराष्ट्र धोरण विषयक कार्ये:-** आधुनिक काळात आंतरराष्ट्रीय राजकारण व आंतरराष्ट्रीय संबंध यांना महत्त्वाचे स्थान निर्माण झाले आहे.आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करणे हा भारताच्या परराष्ट्र धोरणाचा महत्त्वाचा भाग आहे. म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या परिषदांमध्ये सहभाग घेणे,शेजारील राष्ट्रांशी मैत्रीपूर्ण संबंध निर्माण करणे, आंतरराष्ट्रीय स्तरावर मित्रराष्ट्र जोडणे, आंतरराष्ट्रीय करार व्यापार, तसेच युद्ध, युद्ध समाप्ती, शांतता इत्यादी प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करणे. इत्यादी कार्ये मंत्रिमंडळाला

munotes.in

करावी लागतात.यासाठी प्रामुख्याने पंतप्रधान, परराष्ट्र खाते, संरक्षण खाते विशेष पुढाकाराने कार्य करते.

(७) **राष्ट्रपतीला सल्ला:-** राज्यघटनेच्या कलम ७४ प्रमाणे राष्ट्रपतीला त्याच्या कार्यात मदत करण्यासाठी व सल्ला देण्यासाठी पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ असावे, अशी तरतूद आहे. त्यामुळे राष्ट्रपतीला सल्ला देणे, तसेच मंत्रिमंडळात होणाऱ्या निर्णयाची माहिती राष्ट्रपतीला देणे ही कामे मंत्री मंडळाच्या वतीने पंतप्रधानांना करावी लागतात. काही वेळेस राष्ट्रपती स्वत: एखाद्या विषयावर मंत्रिमंडळाचा सल्ला मागू शकतात. अर्थात मंत्रिमंडळाने दिलेला सल्ला मानने राष्ट्रपतीवर बंधनकारक आहे.

(८) **नियुक्ती विषयक कार्ये:-** विविध कार्यांच्या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी विविध अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करण्याचा अधिकार मंत्रिमंडळाला आहे. उदा. महालेखापाल, लष्करातील प्रमुख व्यक्ती, प्रशासकीय सेवा, उत्तीर्ण झालेले प्रथम वर्गाचे अधिकारी इत्यादी या अधिकाऱ्यांच्या कार्यक्षमतेवरच शासनाची कार्यक्षमता ठरते.

(९) **घटक राज्य विषयक कार्ये:-** राज्यघटनेने संसदीय शासन प्रणाली स्वीकारली आहे, तशीच संघराज्य पद्धती स्वीकारली आहे. भारतातील संघराज्य पद्धती एकात्म स्वरूपाची आहे. राज्याचे मंत्रिमंडळे आपल्या क्षेत्रात स्वतंत्र असली तरी केंद्रीय मंत्रिमंडळाचे त्यावर वर्चस्व असते. राज्याच्या राज्यपालांची नेमणूक केंद्रीय मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने राष्ट्रपती करतात. त्याद्वारे केंद्रीय मंत्रिमंडळाला राज्याच्या कारभारात हस्तक्षेप करण्याचा अधिकार मिळतो. आणीबाणीच्या काळात केंद्रीय मंत्रिमंडळाच्या आदेशाप्रमाणे राज्याच्या मंत्रिमंडळाना कार्य करावे लागते याशिवाय जिल्हाधिकारी व इतर वर्ग एकचे अधिकारी हे केंद्रीय सरकारचे अधिकारी असतात. थोडक्यात घटक राज्याच्या कारभारावर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष नियंत्रण करण्याचे कार्य केंद्रीय मंत्रिमंडळाला करावे लागते.

(१०) **इतर कार्ये:-** वरील कार्याशिवाय विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देणे, उदा.पद्म, पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण, भारतरत्न इत्यादी याशिवाय क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल अर्जुन पुरस्कार, खेलरत्न पुरस्कार इत्यादी विविध क्षेत्रात प्रावीण्य प्राप्त करण्यास युवावर्गाला व इतरांना प्रोत्साहन मिळावे हा त्यांचा मुख्य उद्देश आहे. याशिवाय अपराध्यांना क्षमा करणे किंवा शिक्षा कमी करण्यासंबंधी राष्ट्रपतींना शिफारस करणे, पर्यटनाला प्रोत्साहन देणे, आंतरराष्ट्रीय पर्यटनासाठी पर्यटन स्थळांचा विकास करणे, ऐतिहासिक वास्तू, स्थळे, लेणी इत्यादींचे संरक्षण करणे इत्यादी कार्य केंद्रीय मंत्रिमंडळाला करावी लागतात.

सारांश :-

भारतीय संसदीय शासन प्रणालीत घटनात्मक अधिकार राष्ट्राच्या घटनात्मक प्रमुख म्हणून राष्ट्रपतीला अधिकार असले तरी प्रत्यक्षात या अधिकारांचा वापर पंतप्रधान व त्याच्या मंत्रिमंडळाकडून केला जातो. मंत्रिमंडळ हे सामूहिक रीत्या संसदेला जबाबदार असते.तसेच मंत्रिमंडळाचे अस्तित्व पंतप्रधानाच्या मर्जीवर अवलंबून असते, असे असले तरी कार्यकारी सत्तेचे विभाजन केल्याशिवाय त्यांची कार्यक्षमपणे अंमलबजावणी करता येणार नाही व हे सत्तेचे विकेंद्रीकरण व अंमलबजावणी करणारे केंद्रीय मंत्रिमंडळ हे महत्त्वाचे साधन आहे.

आपली प्रगती तपासा

प्रश्न:-

केंद्रीय मंत्रिमंडळाची कार्य स्पष्ट करा.

४.३ ७३ व ७४ वी घटना दुरुस्ती

उद्दिष्टे:-

सदर प्रकरणाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे:-

(१) ७३ घटना दुरुस्ती ची उद्दिष्टे व आशय समजून घेणे.

(२) ७४ व्या घटना दुरुस्ती चा अभ्यास करणे.

(३) या दोन्ही घटना दुरुस्तीच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.

७३ वी घटनादुरुस्ती

प्रस्तावना:-

भारतीय संविधानाच्या ३६८ व्या कलमाने भारतीय संसदेला भारतीय राज्यघटनेत दुरुस्ती करण्याचा अधिकार दिलेला आहे. भारतीय राज्यघटनेत आजपर्यंत १०४ घटना दुरुस्त्या झालेल्या आहेत. आर्थिक आधारावर आरक्षणाचे विधेयक मंजूर करण्यासाठी आठ जानेवारी २०१९ रोजी लोकसभेत तर ९ जानेवारी २०१९ रोजी राज्यसभेत हे विधेयक मंजूर करण्यात आले. त्यासाठी कलम १५ व १६ मध्ये दुरुस्ती करण्यात आली आहे.

याच आधारावर १९९२ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांना शक्तिशाली करण्यासाठी व त्यांना घटनात्मक व कायदेशीर दर्जा प्राप्त करून देण्यासाठी १९९३ मध्ये ७३वी व ७४ वी घटना दुरुस्ती करण्यात आली. संविधानाच्या दुसऱ्या भागातील राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वातील कलम ४० मध्ये असे स्पष्ट केले आहे की,''राज्य हे ग्रामपंचायती संघटित करण्यासाठी उपाययोजना करील व त्यांना स्वराज्याचे मूळ घटक म्हणून कार्य करण्यास समर्थ करण्यासाठी आवश्यक असतील असे अधिकार व प्राधिकार बहाल करील.'' या कलमाच्या आधारानेच ७३ व ७४ वी घटना दुरुस्ती करण्यात आली. राज्यघटनेत भाग-९ समाविष्ट करण्यात आला. त्यानुसार ७३ वी घटनादुरुस्तीतील काही महत्त्वपूर्ण तरतुदी पुढीलप्रमाणे:-

(१) ग्रामसभा:- कलम २४३ (A) या कलमानुसार ग्रामसभा स्थापन करणे, त्यांना अधिकार देणे. याशिवाय या कलमाने ग्रामसभेच्या जबाबदारीही निश्चित केल्या आहेत. या घटनादुरुस्तीने ग्रामसभेला घटनात्मक दर्जा प्राप्त झाला आहे.

(२) पंचायत राज व्यवस्था:- कलम २४३ (B) नुसार तीनही स्तरावर स्थानिक स्वराज्य संस्थेचा स्थापणेची तरतूद केली आहे.उदा. ग्रामस्तरावर ग्रामपंचायत, तालुका स्तरावर पंचायत समिती व जिल्हा स्तरावर जिल्हा परिषद. अर्थात महाराष्ट्रात अशी पद्धती यापूर्वीच म्हणजे १९६२ मध्येच लागू करण्यात आली होती.

(३) लोकांकडून लोकप्रतिनिधींची प्रत्यक्ष व प्रौढ व गुप्त मतदानाद्वारे निवड:- कलम २४३ (C) नुसार ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद या तीनही ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लोकप्रतिनिधीची एक सदस्य मतदारसंघाद्वारे प्रत्यक्ष, प्रौढ, गुप्त मतदानाद्वारे निवड केली जाईल अशी तरतूद करण्यात आली आहे. ज्यामुळे सत्तेचे व अधिकारांचे विभाजन ग्रामीण पातळीपर्यंत होईल.

(४) राखीव जागांची तरतूद:-७३ व्या घटना दुरुस्ती पूर्वी ग्रामपंचायत व इतर दोन्ही स्तरावर महिला व मागासवर्गीय प्रतिनिधी निवडून आला नाही तर त्यांचा एकेक प्रतिनिधी स्वीकृत

munotes.in

केला जात असे. परंतु घटनादुरुस्तीनंतर कलम २४३(I) नुसार अनुसूचित जाती व जमाती यांना या तीनही स्तरावर त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व देण्यात आले आहे. तसेच महिलांना तीनही स्तरावर एकूण निर्वाचित जागांपैकी १/३ जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत. इतकेच नव्हे तर या तीनही स्तरांवरील पदाधिकाऱ्यांच्या जागाही चक्राकार पद्धतीने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व महिला यांना राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत. यामुळे समाजातील सर्व घटकांना सत्ता व अधिकार क्षेत्रात सामावून घेतले जात आहे.

(५) कार्यकाळ:- ७३ व्या घटना दुरुस्ती पूर्वी स्थानिक स्वराज्य संस्था कार्यकाळ अनिश्चित होता दर पाच वर्षांनी निवडणुका व्हाव्यात असा संकेत असला तरी, स्थानिक स्वराज्य संस्था बाबत तो पाळला जात नसे. या संस्थांना सतत मुदतवाढ दिली जात असे.परंतु या घटनादुरुस्तीने कलम २४३(E) नुसार तीनही संस्थांवरील संस्थांचा सामान्य कार्यकाळ पाच वर्षाचा करण्याची तरतूद केली आहे. काही कारणांमुळे या संस्था मुदतपूर्व बरखास्त केल्या तर, कोणत्याही परिस्थितीत उर्वरित काळासाठी सहा महिन्याच्या आत निवडणुका घेणे राज्य शासनावर बंधनकारक केले आहे.

(६) पंचायत संस्थांची कार्ये:- २४३ (४(I) नुसार राज्यघटनेतील तरतुदीनुसार विधिमंडळा द्वारे कायदे करून स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिकार दिले जातील अशी तरतूद आहे. राज्यघटनेच्या ११ व्या परिशिष्टात या कार्याची यादी दिलेली आहे.

(७) उत्पन्नाची साधने:- कलम २४३(H) नुसार कायद्याच्या मर्यादा सांभाळून विविध प्रकारचे कर आकारणे व त्यांची वसुली करणे व निधी गोळा करून त्यातून खर्च करण्याचा अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात आला आहे. स्थानिक स्वराज्य संस्था आर्थिक दृष्टीने सक्षम होण्यास त्याची मदत होत आहे.

(८) राज्य वित्त आयोग:- राज्याच्या आर्थिक स्थितीचे परिक्षण करून शिफारशी करण्यासाठी राज्यपाला द्वारे वित्त आयोगाची स्थापना करण्याची तरतूद कलम २४३(I) मध्ये केलेली आहे

(९) निवडणूक आयोग:- पंचायत राज्यातील संस्थांच्या निवडणुका निर्धारित वेळेप्रमाणे व्हाव्यात, तसेच निवडणुका घेण्यासाठी आवश्यक ती सर्व कार्य व कार्यवाही करण्यासाठी २४३ (K) नुसार राज्य निवडणूक आयोगा संबंधित तरतुदी केल्या आहेत.

<u>सारांश:-</u>

अशाप्रकारे स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा प्राप्त करून देणे,समाजातील सर्व घटकांच्या लोकांचा राजकीय व्यवस्थेत सहभागी करून घेणे, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारात पारदर्शकता आणणे इत्यादी उद्देशाने ७३ वी घटनादुरुस्ती करण्यात आली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा मिळाल्याने त्यासंबंधीच्या कायद्यांचे उल्लंघन करता येत नाही त्यामुळे या तरतुदींची कार्यक्षमतेने अंमलबजावणी होत आहे.

<u>आपली प्रगती तपासा</u> :-

प्रश्न:-

(१) ७३ व्या घटना दुरुस्ती चे उद्देश व महत्त्व सांगा.

(२) ७३ व्या घटना दुरुस्ती ची सविस्तर माहिती लिहा.

munotes.in

७४ वी घटनादुरुस्ती

७३ वी घटनादुरुस्ती या उद्देशाने केली त्याच उद्देशाने ७४ वी घटना दुरुस्ती करण्यात आली आहे. ७३ वी घटनादुरुस्ती ही ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था संबंधी आहे. यात ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद यांचा समावेश होतो. तर ७४ वी घटनादुरुस्ती शहरी म्हणजेच नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संदर्भात आहे. लहान शहरातील नगरपालिका, महानगरपालिका,नगरपरिषद, नगरपंचायत, औद्योगिक नगर वसाहत, प्राधिकरण, कँटोन्मेंट बोर्ड इत्यादी या संस्थांच्या पारदर्शक कारभारासाठी, या संस्थांच्या आर्थिक स्थिरता, या संस्थांच्या निवडणुका व निवडणूक आयोग या संस्थांचा कार्यकाळ, त्यांच्या अधिकार संबंधीच्या तरतुदी, त्यांच्या उत्पन्नाचे साधनाबाबतच्या तरतुदी, या संस्थांमधील राखीव जागा, वित्त आयोग लेखापरीक्षण विषयक तरतुदी, तसेच निवडणूक आयोग आणि न्यायालयाच्या हस्तक्षेपास प्रतिबंध करणाऱ्या तरतुदी केलेल्या आहेत. ज्याप्रमाणे ७३ व्या घटनादुरुस्तीने ज्या तरतुदी ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थासंबंधी केल्या आहेत त्याच तरतुदी ७४ व्या घटनादुरुस्तीने शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांना लागू केल्या आहेत व दोन्ही घटना दुरुस्तीचे उद्देशही समानच आहेत. साधारणपणे राज्यघटनेच्या कलम २४३(O) ते २४३(Z) आणि २४३(Z-A),२४३(Z-**B**),२४३(Z-G), या कलमांतर्गत शहरी स्थानिक स्वराज्य संस्था विषयी तरतुदी केलेल्या आहेत. तसेच सर्व संस्थांच्या कार्याविषयी ची यादी घटनेच्या १२ व्या परिशिष्टात नोंदवलेली आहे.

७४ व्या घटना दुरुस्तीमध्ये शहरांच्या विकासासाठी तेथील नागरिकांना या संस्थांच्या माध्यमातून समाविष्ट केले आहे. व सत्ता व अधिकार यांच्या केंद्रीकरणाला चालना दिलेली आहे. तसेच शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार पारदर्शक असावा, शहरांचा नियोजनबद्दल पद्धतीने विकास व्हावा, लोकशाही सक्षम व्हावी इत्यादी उद्देशाने ७४ वी घटनादुरुस्ती करून काही महत्त्वाच्या तरतुदी केल्या आहेत. थोडक्यात ७३ व ७४ वी घटना दुरुस्ती लोकशाही हे मजबूत करण्यासाठी, अधिकार व सत्तेचे विकेंद्रीकरण करुन प्रशासन लोकाभिमुख करण्यासाठी हे ऐतिहासिक पाऊल होते. त्याची प्रचिती स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षम कारभारावरून येते.

४.४ आपली प्रगती तपासा – प्रश्न

१) ७४ व्या घटना दुरुस्तीचा उद्देश स्पष्ट करा.

२) ७४ व्या घटना दुरुस्तीची थोडक्यात माहिती लिहा.

४.५ संदर्भ सूची

१. भा. ल. भोळे, स्थानिक स्वराज्य संस्था.

२. भोळे भा. ल., भारताचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर, २०१०.

२. डॉ. वा. भ. पाटील, भारतीय राज्यघटना, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगांव, जून २०१२.

३. जाधव तुकाराम आणि शिरापूरकर महेश, भारतीय राजकीय व्यवस्थेचा आकृतीबंध खंड १, युनिक ॲकॅडमी, पूणे २०११.

४. वराडकर र. घ. 'भारतीय शासन आणि राजकारण' निराली प्रकाशन पुणे, २०१६.

❖❖❖❖

munotes.in